मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर,
विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | मंगळवार, १ जुलै २०२५ | वर्ष: १ | अंक:३३ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## मुख्य सचिवपदी राजेश कुमार

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

राज्याच्या मुख्य सचिवपदी ज्येष्ठ सनदी अधिकारी राजेश कुमार यांची नियुक्ती झाली असून त्यांनी सोमवारी मावळत्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून पदभार स्वीकारला. यावेळी मंत्रालयातील अनेक सनदी अधिकाऱ्यांनी राजेश कुमार यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या. मुख्य सचिवपदी नियुक्त झालेले राजेश कुमार ४९ वे सनदी अधिकारी आहेत. पहिल्या महिला मुख्य सचिव होण्याचा मान मिळालेल्या सुजाता सौनिक आज नियत वयोमानुसार सेवानिवृत्त झाल्या. त्यामुळे राज्य सरकारने त्यांच्या जागी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेशकुमार यांची नियुक्ती केली आहे. राजेश कुमार हे १९८८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी आहेत. पुढील दोन महिन्यात म्हणजे ऑगस्ट २०२५ मध्ये ते सेवानिवृत्त होणार आहेत. त्यामुळे मुख्य सचिव म्हणून काम करण्यास राजेश कुमार यांना जेमतेम दोन महिन्यांचा कालावधी मिळणार आहे.

# मेळाव्यात राजकीय लेबल लावायचे नाही - राज ठाकरे

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**



शालेय शिक्षणात पहिलीपासून हिंदी सक्तीबाबतचा शासन निर्णय सरकारने रविवारी मागे घेतला. सरकारच्या या निर्णयानंतर राज ठाकरे पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली. ५ जुलै रोजी सर्वपक्षीय मोर्चाचं आयोजन करण्यात येणार होतं. मात्र सरकारच्या निर्णयानंतर काय होणारा याची प्रतीक्षा सर्वांना होती. 5 जुलै रोजी विजयी मेळावा होणार, असं राज ठाकरे यांनी जाहीर केलं. विजयी मेळाव्याची घोषणा करताना, विजय मेळावा कुठे आणि कसा होणार याबाबत सर्वांचा चर्चा करुन निर्णय घेतला जाईल असं देखील राज ठाकरे यांनी सांगितलं.

राज ठाकरे यांनी म्हटलं की, "काल महाराष्ट्र सरकारने हिंदी सक्तीचे दोन्ही जीआर रद्द केले. रद्द करायला त्यांना भाग पाडले. त्यासाठी मी तमाम महाराष्ट्रातील जनतेचे अभिनंदन करतो. सर्व बाजूंनी रेटा आला. खरतरं काही गरज नसताना हा विषय आला होता. तो रद्द करावा लागला. त्याबद्दल मी मराठी जनांचे, साहित्यिकांचे आणि मोजक्या कलाकारांचे आभार मानतो."

"हा विषय काही श्रेयवादाचा नाही. मात्र हा विषय समोर आल्यानंतर आम्ही त्याला विरोध केला. मागच्यावेळी पाठवलेली तिन्ही पत्रे मी वाचून दाखवली होती. आम्हाला उद्धव ठाकरेंची शिवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी, काँग्रेस यांनी पाठिंबा दिला. ५ तारखेला आम्ही मोर्चाचे आयोजन केले होते. हा मोर्चा निघाला असता तर न भुतो न भविष्य निघाला असता. संयुक्त महाराष्ट्राचा काळ आठवला असता. सरकारला मराठी माणसाची ताकद कळाली असती," असं राज ठाकरे यांनी म्हटलं.

मला संजय राऊत यांचा कॉल आला की विजयी मेळावा करावा. तो मेळावा जरी झाला तरी त्यात राजकीय लेबल लावायचे नाही. कारण तो मराठी माणसांचा मेळावा आहे. मराठी भाषा या विषयावर कोणतीही तडजोड होता कामा नये. त्यासाठी सतर्क राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, दादा भुसे आले तेव्हा मी सांगितलेलं तुमचे ऐकून घेईन पण ऐकणार नाही. यामध्ये कोणतेही तडतोड होणार नाही. त्यांनी हा प्रयत्न केला मात्र तो त्यांच्याच अंगलट आला. त्यांनी समिती नेमावी, त्याच्याशी आमचे काही देणेघेणे नाही, मात्र परत हा निर्णय होणार नाही. त्याची काळजी घ्यावी,.असं देखील राज ठाकरे म्हणाले.

## मराठी माणसाची एकजूट यापुढेही अशीच कायम राहिली पाहिजे- उद्धव ठाकरे

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**



मातृभाषेचे प्रेम हे पक्षाच्या पलिकडे असायला हवे, असे स्पष्ट करत आता मुंबईत ५ जुलै रोजी विजयी मेळाव्यात मराठी माणसाच्या एकजुटीचे दर्शन घडेल, असा विश्वास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, प्राथमिक शिक्षणात हिंदी सक्तीविरोधात संपूर्ण महाराष्ट्रात मराठी माणसाची एकजूट दिसून आली. शिवसेनेसोबत ज्या ज्या पक्षांनी पक्ष भेद विसरून एकत्र आले नसते तर हिंदी सक्तीची जीआर रद्द केला नसता. ५ जुलै रोजी मोर्चात अजित पवार गटातलेही सहभागी होणार होते.

प्राथमिक शिक्षणात हिंदी सक्तीबाबत राज्य सरकारने नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. सरकारने अशी थट्टा करू नये शिक्षणाच्या समितीवर अर्थतज्ञ बसवला आहे, असा टोला लगावत आता सक्तीवर पुढे काहीही सरकारने करू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

मराठी माणूस विखुरला आहे हे लक्षात आल्यावर मराठी द्रोही एकत्र आले. आता आम्ही त्यांचा फणा दाबला आहे. आता त्यांनी मराठी माणूस एकवटू नये म्हणून त्यांना जीआर रद्द करावा लागला, असा दावाही त्यांनी केला.

राजकीय भूमिका वेगवेगळी असली तरी जे राजकीय पक्ष आमच्यासोबत आले, त्यांचे आम्ही कौतुक करतो. सरकारने संबंधित जीआर (शासन निर्णय) तात्पुरता रद्द केला असून, तो रद्द केला नसता तर ५ जुलै रोजी सरकारला मोठे आंदोलन पाहायला मिळाले असते. हिंदी सक्तीचा जीआर राज्य सरकारने मागे घेतला आहे. आता आम्ही ५ जुलै रोजी विजयोत्सव साजरा करणार आहोत. मराठीद्वेष्ट्यांना आम्ही दणका दिला आहे आणि ही एकजूट यापुढेही अशीच कायम राहिली पाहिजे," असे आवाहनही उद्धव ठाकरे त्यांनी केले.

पाच जुलै रोजी आम्ही विजयी रॅली काढणार आहोत. याला संपूर्ण महाविकास आघाडी एकत्रित असेल. पाच जुलै रोजी होणाऱ्या मोर्चात मनसेचा देखील सहभाग होता. त्यामुळे आता विजयी रॅलीत देखील त्यांनी यावे असे आम्ही त्यांना आवाहन करतो," अशी प्रतिक्रिया आदित्य ठाकरेंनी दिली आहे.

## अग्रलेख – खरीखरी

### भाग्य हे आमुचे बोलतो मराठी

काल मराठीचा पाया मजबूत करण्यासाठी आम्ही आवाहन केले होते. सध्या तरी मराठी आणि महाराष्ट्र गौरवासाठी अनेक कवींनी वर्णलेल्या, 'सुंदर देशा पवित्र देशा' किंवा बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा किंवा दगडांच्या देशा वगैरे सारखे वर्णन वाचून आपल्याला आपल्याच मराठी भाषेचा अभिमान तार स्वराने दिसत असला. तरी अभिजात झालेली किंवा तसा दर्जा मिळालेली आपली मराठी भाषा दिवसेंदिवस आपला झेंडा इंच इंच फडकवित ठेवणार आहे का, हाच खरा प्रश्न आहे. संपूर्ण भारतात मोगलांच्या विरुद्ध किंवा इतर परकीयांच्या विरोधात लढणारे फक्त मराठीच होते आणि ते महाराष्ट्रातील होते. हे सत्य कधीच नाकारता येणार नाही. देशाच्या अनेक भागात आजही मराठ्यांच्या विजयोत्सवाच्या खुणा दिसून येतात. ग्वाल्हेरचे सिंदिया हे महाराष्ट्राचे शिंदे आहेत. बडोद्याचे गायकवाड गुजराती नसून मराठीच आहेत. इंदूरच्या अहिल्याबाई होळकर यांच्या कर्तृत्वाला संपूर्ण देश नमन करतो. देशातील इतर अनेक प्रांतात आपल्या मराठीची आणि मराठ्यांची तलवार तळपत होती. ही सर्व मराठी असलेल्या आणि महाराष्ट्रातील लढाऊ असणाऱ्या मराठ्यांची एका प्रकारची अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या भारताची निशाणी होती. मराठी सत्तेचे पाऊल दरम्यानच्या काळात कधीतरी थोडेसे वाकडे पडले. त्यानंतर इंग्रजांनी पुण्यावर आपला युनियन जॅक फडकवला आणि मग देशावर इंग्रजी अंमल सुरू झाला. 1818 सालापूर्वी दुसऱ्या बाजीरावांनी हाराकिरी केली नसती. त्याउलट आपल्या पूर्वजांच्या पावलावर पाऊल टाकून मराठी बाणा दाखवून दिला असता. तलवार गाजवली असती. तर इंग्रजांचे राज्य अजिबात आल्याचे दिसले नसते. सध्याच्या युगात जर तरला काही अर्थ नाही. त्यामुळे ते जाऊ द्या. इंग्रज आले आणि इंग्रज गेले. इंग्रज गेल्यावर दिल्लीत जी सत्ता स्थापन झाली. त्यात मराठी जनांचा अजिबात बोलबाला नव्हता. हे मान्य केलेच पाहिजे. किंबहुना महाराष्ट्राकडे सातत्याने सावत्रपणाने पाहणे सुरू होते. त्यातच भाषिक राज्य स्थापन व्हावीत. असे ठरल्यावर आंध्र प्रदेशच्या निर्मितीसाठी पोट्टी श्रीरामलू यांनी आपले प्राण अर्पित केले. त्यामुळेच मग तत्कालीन मद्रास पासून आंध्र प्रदेश वेगळा झाला. त्यानंतर सुद्धा तत्कालीन सरकारने महाराष्ट्र आणि गुजरात यांना मुंबई राज्यात समाविष्ट केले होते. १९५६ सालात मध्य प्रदेशची राजधानी असलेले नागपूर संपूर्ण विदर्भासह मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये सामील झाले. नागपूरची राजधानी गेली. स्वातंत्र्योत्तर काळात राजधानी गेल्याचे हे एकमेव उदाहरण आहे. अनेक नवनवीन राजधान्या नागपूरला वाकुल्या दाखवीत आहेत. 1960 साली अखेर महाराष्ट्रातील सर्व पक्ष नेत्यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे. यासाठी आंदोलन उभे केले. कॉम्रेड भाई डांगे, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, एसेम जोशी आणि इतर अनेक मराठी नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी जोरदार रणशिंग फुंकले होते. अखेर मराठी जनांच्या एकजुटीला वंदन करून महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन राज्ये एक मे १९६० रोजी स्थापन झाली. पण त्यानंतरही महाराष्ट्र सारख्या श्रीमंत राज्यात मराठीला हवे ते महत्त्व मिळाले नाही. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या लढाईत काँग्रेस विरुद्ध सर्वपक्षीय तरीही पक्षनिरपेक्ष मराठी प्रेमी पक्षांची आघाडी स्थापन झाली होती. तसाच सध्याच्या परिस्थितीमध्ये मराठी जनांच्या मनाचा आवाज गेल्या काही दिवसापासून हिंदी भाषा विरोधात दुमदुमू लागला होता. मध्यंतरी अगदी प्राथमिक शाळेतील बालकांनी हिंदी गीत गावे म्हणून फतवा निघाला होता. काल मराठी मनांचा आणि जनांचा आवाज एकून आपल्या समंजस मुख्यमंत्र्यांनी हिंदी सक्तीचे दोन्ही जीआर रद्द केले. त्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे त्रिवार अभिनंदन करून त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. मराठी जनांमध्ये हिंदी भाषेबद्दल आकस नाही. पण हिंदी मावशीच्या प्रेमापोटी मराठी आईला घराबाहेर काढण्याचे पाऊल कोणत्याही मराठी प्रेमीला धोकादायक वाटले. मुख्यमंत्र्यांनी नेमक्या याच जनतेच्या भावना ओळखलेल्या आहेत. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्या जीआर चे म्हणजेच अध्यादेशाचे फाडून फाडून बरेच तुकडे केले. त्यामुळे मराठी मन आणि मराठी जन सुखावलेले आहेत. या निर्णयाबद्दल आपले मुख्यमंत्री अभिनंदनास पात्र आहेत. त्यांना धन्यवाद. जय मराठी! जय महाराष्ट्र!!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## शिवसेनेच्या मुख्य नेतेपदी पुन्हा शिंदे



**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

शिवसेना पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. खरंतर संघटनात्मक पदांच्या निवडणुका, संघटनात्मक बदलाचे प्रस्ताव, या सोबतच पक्षाचे राजकीय ठराव कार्यकारणी मध्ये मांडले जातात. शिवसेनेच्या या कार्यकारणीमध्ये प्रामुख्याने एकनाथ शिंदे यांच्या मुख्य नेते पदाचा प्रस्ताव मांडला गेला. त्यामुळे एकनाथ शिंदे यांची पुन्हा एकदा शिवसेना पक्षाच्या मुख्य नेतेपदी निवड झाली आहे.

शिवसेना पक्ष फुटीपूर्वीच्या पक्षामध्ये मुख्य नेते पदाच्या वरती पक्षप्रमुख पद होते. मात्र शिवसेना फुटीनंतर शिंदेंच्या शिवसेनेने पक्षप्रमुख पद निर्माणच केले नाही. शिंदेंच्या शिवसेनेत मुख्य नेतापद हेच सर्वोच्च पद असणार आहे. आणि याच पदावर एकनाथ शिंदे यांची पुन्हा नियुक्ती करण्यात आली. यासोबतच या कार्यकारणीमध्ये पक्ष सचिवांच्या नियुक्ती बद्दल काही ठराव मांडले गेले. कार्यकारणी आणि कार्यकारणीच्या माध्यमातून घेण्यात आलेली अंतर्गत निवडणूक ही संघटनात्मक वार्षिक प्रक्रिया आहे. शिवसेना पक्ष फुटीपूर्वी उद्धव ठाकरे यांनी ही प्रक्रिया राबवली नव्हती. पक्ष फुटीनंतर उद्धव ठाकरे यांनी पक्षप्रमुख निवडीसाठी कार्यकारिणी घोषित केली होती खरी मात्र त्यानंतर पक्ष कुणाचा हा निर्णय निवडणूक आयोगाच्या गोठात गेला. निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि चिन्ह याबाबतचा निर्णय एकनाथ शिंदे यांच्या बाजूने दिला. त्यामुळे शिवसेना पक्षाच्या कायदेशीर पेचात उद्धव ठाकरे अडकले. अशा प्रकारचे कायदेशीर पेच शिंदेनसमोर निर्माण होऊ नये म्हणून शिंदेंच्या शिवसेनेच्या माध्यमातून दरवर्षी न चुकता राष्ट्रीय कार्यकारणी आयोजित करून काही महत्त्वाचे ठराव संमत केले जातात.

## तेलंगणात केमिकल फॅक्टरीत स्फोट, 10 ठार

**संगारेड्डी , दि. ३० वृत्तसंस्था**



तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील पस्मिलाराम औद्योगिक क्षेत्रात एक भीषण अपघात घडला आहे. सिगाची केमिकल फॅक्टरीमध्ये आज सोमवारी सकाळी रिॲक्टर (अणुभट्टी) फुटल्यानं भयंकर स्फोट झाला, यानंतर संपूर्ण कारखान्यात गोंधळ उडाला. या अपघातात आतापर्यंत १० कामगारांचा मृत्यू झाला आहे. तर २० हून अधिक कर्मचारी जखमी झाल्याची माहिती आहे. प्रत्यक्षदर्शींच्या मते, रिॲक्टरमधील स्फोटाचा आवाज अनेक किलोमीटर अंतरावर ऐकू आला. हा स्फोट इतका तीव्र होता की, अनेक कामगार १९९ मीटर अंतरावर उडून पडले. इमारतीचा उत्पादन विभाग पूर्णपणे कोसळला, तर दुसऱ्या इमारतीचंही मोठं नुकसान झालं आहे.

या अपघातात आतापर्यंत १०कामगारांचा मृत्यू झाला आहे. यापैकी ५ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर ५ जणांचा रुग्णालयात दाखल केल्यानंतर मृत्यू झाला. २० हून अधिक कर्मचारी जखमी झाले आहेत, त्यापैकी अनेकांची प्रकृती गंभीर आहे. सर्वांना जवळच्या सरकारी आणि खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

घटनेनंतर ११ अग्निशमनाच्या गाड्या आणि मदत पथकं घटनास्थळी पोहोचली. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. ढिगाऱ्यात अनेकजण अडकल्याची शक्यता आहे. संगारेड्डीचे जिल्हाधिकारी प्रवीण्य आणि एसपी परितोष यांनी घटनास्थळाची पाहणी केली आणि बचाव पथकाला आवश्यक सूचना दिल्या. घटनेची माहिती देताना त्यांनी सांगितलं की, "अपघाताची चौकशी करण्यासाठी एक विशेष पथक तयार केलं जाईल. हे पथक अणुभट्टीच्या स्फोटामागील खरं कारण शोधून काढेल".

## हिमाचल प्रदेशात भूस्खलनामुळे १२९ रस्त्यांवरील वाहनांची वाहतूक थांबली

**शिमला, दि. ३० वृत्तसंस्था**

हिमाचल प्रदेशात रविवारपासून मुसळधार पाऊस पडत आहे. भूस्खलनामुळे राज्यातील १२९ वरील वाहनांची वाहतूक थांबली आहे. पावसाळ्यापासून आतापर्यंत राज्यात ३९जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या २४ तासांत ३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. सोमवारी सकाळी हिमाचलच्या मंडी-कुल्लू राष्ट्रीय महामार्गावरील थलौतच्या भुभू जोत बोगद्याजवळ भूस्खलन झाले. यामुळे रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला आहे. अनेक वाहने बोगद्यातही अडकली आहेत. सतर्कतेमुळे आज हिमाचलच्या ४ जिल्ह्यांमध्ये शाळा बंद आहेत. दुसरीकडे, बिहारमधील भोजपूर, बक्सर आणि नालंदा येथे वीज कोसळून ५ जणांचा मृत्यू झाला. त्याच वेळी रविवारी गया येथील इमामगंज येथील लागुरही धबधब्यात अचानक पाणी वाढले. जोरदार प्रवाहात ६ मुली वाहून गेल्या.

## ५० हजार कोटींचा ढपला पाडण्यासाठीच शक्तिपीठ महामार्गाचा अट्टाहास- राजू शेट्टी

**पुणे, दि. ३० प्रतिनिधी**

शक्तिपीठ महामार्गाला कॅबिनेट मंजुरी देण्यात आल्यानंतर राज्यांमध्ये एल्गार सुरूच आहे. शक्तिपीठ महामार्ग विरोधात शेतकरी संघटनांसह राजकीय पक्षही एकवटले आहेत. या महामार्गाला कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यासह १२ जिल्ह्यातून कडाडून विरोध सुरूच आहे. मात्र, सरकारकडून शक्तीपीठ होणारच अशी भूमिक भूमिका घेतली जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी उद्या (१ जुलै) शेतकरी दिनी पुणे बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर पुलाची शिरोली येथील पंचगंगा पुलावर रास्ता रोको आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनामध्ये हजर आणि संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन राजू शेट्टी यांनी केलं आहे. दरम्यान शेट्टी यांनी कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी तसेच साखर कारखानदारांनी शक्तीपीठ विरोधी भूमिका स्पष्ट करावी अन्यथा काळ आपल्याला माफ करणार नाही असा इशारा दिला आहे. तुमच्या मिशीला खरकटं लागलं नसेल तर तुम्हाला सरकारला घाबरण्याची काहीच गरज नाही. निवडणुकीपूर्वी तुम्ही या संदर्भात पत्र दिले होते आणि आता तुम्ही भूमिका स्पष्ट करत नसल्याकडे राजू शेट्टी यांनी लक्ष वेधलं. राजू शेट्टी यांनी शक्तिपीठ महामार्ग ५० हजार कोटींचा ढपला पाडण्यासाठीच असल्याचा आरोप केला.



राजू शेट्टी यांनी पोस्ट करत म्हटलं आहे की महाराष्ट्रातील जनतेवर ८६००० कोटींचा बोजा टाकणारा शक्तीपीठ महामार्ग हा रत्नागिरी नागपूर महामार्गास समांतर आहे. या दोन्ही महामार्गातील कमीत कमी अंतर दोन किमी व जास्तीत जास्त अंतर तीस किमी आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील बारा जिल्ह्यातून जाणारे दोन्ही महामार्ग कसे समांतर आहेत हे या नकाशावरून दिसून येईल. भविष्यात गरज पडल्या सध्या असणारा रत्नागिरी नागपूर महामार्ग चौपदरी, सहा पदरी किंवा आठ पदरीकरण सहज शक्य असताना शक्तिपीठ महामार्गाचा अट्टाहास कशासाठी? ५० हजार कोटींचा ढपला पाडण्यासाठीच असा आरोप राजू शेट्टी यांनी केला आहे.

## भाई जगताप, नसीम खानांना डावलत काँग्रेसची महापालिका समिती जाहीर

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**



मुंबई महापालिका निवडणुकांसाठी काँग्रेसने मोठी घोषणा करत 34 सदस्यांची निवडणूक व्यवस्थापन आणि समन्वय समिती जाहीर केली आहे. मात्र माजी अध्यक्ष भाई जगताप, नसीम खान आणि खासदार चंद्रकांत हंडोरे यांना समितीबाहेर ठेवण्यात आल्याने पक्षात नाराजीची लाट उसळली असून, ही नाराजी थेट दिल्ली दरबारी पोहोचली आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी शहराध्यक्ष वर्षा गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीत माजी मंत्री अस्लम शेख, आमदार अमीन पटेल, ज्योती गायकवाड, अमरजीत मनहास, मधू चव्हाण, अशोक जाधव, सचिन सावंत, गणेश यादव यांचा समावेश आहे. तसेच, उपेंद्र दोशी, शीतल म्हात्रे, अजंठा यादव, सुरेश कोपरकर यांसह अनेक माजी नगरसेवकांचाही समावेश आहे.

भाई जगताप आणि नसीम खान यांना डावलण्यामागची कारणमीमांसा सुरू असून, यामुळे पक्षातील गटबाजी पुन्हा उफाळण्याची चिन्हे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत या निर्णयाचा फटका काँग्रेसला बसण्याची भीती व्यक्त होत आहे, विशेषत: मुंबई महापालिका जिंकण्यासाठी काँग्रेसच्या एकजुटीवरच मोठा भर असताना अशा प्रकारची नाराज की ही पक्षाला येणाऱ्या काळात अडचणीत घालू शकते असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

## त्यांनी एकत्र यावे आणि क्रिकेट खेळावे - देवेंद्र फडणवीस

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

आम्ही निर्णय घेताना कोणत्याही पक्षाचं हित पाहणार नाही, आम्ही महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचं हित पाहणार. त्यामुळे कुणाच्याही दबावाखाली न येता योग्य तोच निर्णय घेऊन असं राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. दोन ठाकरे बंधू एकत्र येऊ नये असा काही जीआर आम्ही काढला नाही, त्यांनी एकत्र यावं आणि क्रिकेट खेळावं, जेवण करावं. आम्हाला त्याचा काही फरक पडणार नाही असंही मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषेसंबंधी काढण्यात आलेले जीआर राज्य शासनाने रद्द ठरवले. हा मराठी माणसाच्या एकजुटीचा विषय असल्याचं ठाकरे बंधूंनी सांगितलं. त्यावर मुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांचा उजवा हात समजल्या जाणाऱ्या नेत्याने हिंदी सक्तीची करा अशी शिफारस केली होती. तो अहवाल उद्धव ठाकरेंनी स्वीकारला. त्यामुळे हिंदीचा निर्णय त्यांच्या कार्यकाळातच झाला होता. हे दुटप्पी लोक आहेत. याचं सत्तेतले रुप वेगळं आणि विरोधातले रुप वेगळं आहे."

ठाकरे बंधू एकत्र न येण्यासाठी भाजप प्रयत्न करतंय का असा प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "ठाकरे बंधूंनी एकत्र येऊ नये म्हणून मी जीआर काढला नाही. दोन भावांना एकत्र येण्यासाठी मी रोखलंय का? त्यांनी एकत्र यावे, क्रिकेट खेळावं, टेनिस खेळावं, जेवण करावं, काहीही करावं आम्हाला काहीही फरक पडत नाही." देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "राज्यात त्रिभाषा सूत्र स्वीकारायचं की नाही यावर आम्ही एक समिती नेमली आहे. ती समिती आता ठरवेल. आम्ही कुठल्याही पक्षाचं हित पाहणार नाही. आम्ही महाराष्ट्रातल्या विद्यार्थ्यांचं हित पाहणार. कुणाच्याही दबावाखाली झुकणार नाही."

### रविंद्र चव्हाणांनी भरला प्रदेशाध्यक्षपदाचा अर्ज



दरम्यान, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदासाठी रवींद्र चव्हाण यांनी अर्ज भरला आहे. आम्ही सगळ्यांनी त्यांना पाठिंबा दिला आहे. किरेण रिजेजू हे मंगळवारी संध्याकाळी पाच वाजता महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी कुणाची निवड झाली हे नाव जाहीर करतील अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसंच रवींद्र चव्हाण यांचाच अर्ज आला आहे हेदेखील त्यांनी सांगितलं. त्यामुळे भाजपाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी रवींद्र चव्हाण यांची निवड निश्चित मानली जाते आहे.

## पंढरपूरला निघालेल्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**दौंड, दि. ३० प्रतिनिधी**

आषाढी वारी हा संपूर्ण महाराष्ट्राचा एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक व आध्यात्मिक उत्सव मानला जातो. या काळात संपूर्ण राज्यात भक्तीमय वातावरण, उत्साह आणि चैतन्याची लहर पाहायला मिळते. वारीच्या निमित्ताने संतांच्या पालख्या पंढरपूरकडे मार्गस्थ झाल्या आहेत. लाखो वारकरी 'माऊली-माऊली'चा जयघोष करत विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे निघाले आहेत. आता या वारीतून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांना अडवून लुटल्याची घटना समोर आली आहे. तसेच एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्यात आला आहे. दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली येथे ही धक्कादायक घटना घडली आहे. पंढरपूरकडे जाताना वारकरी वाटेत चहासाठी थांबले होते. त्यानंतर गाडीत बसताना दोन जण गाडीवरून आले. या दोन जणांनी वारकऱ्यांच्या गळयाला कोयता लावला.

यानंतर दोन जणांनी वारकऱ्यांना लुटून नंतर अल्पवयीन मुलीला काही अंतरावर नेले आणि तिच्यावर अत्याचार केले आहेत. या घटनेमुळे दौंडमध्ये एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. पोलीस अज्ञातांचा शोध घेत असून या आरोपींना जेरबंद करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# सप्तश्रृंगी गडावरील निसर्गाचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची वाढली गर्दी

**सप्तश्रृंग गड ।** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान व उत्तर महाराष्ट्राचे कुलदैवत व पर्यटन स्थळ समजल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र सप्तशृंगी गडावर दररोज हजारो भाविक दर्शनासाठी व पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी करताना दिसत आहेत.

गेल्या बऱ्याच दिवसांपासून संततधार पाऊस धारा कोसळत असल्याने निसर्ग पर्यटनात वाढ होत आहे शनिवार व रविवार आला की गडाला जणू यात्रेचे स्वरूप प्राप्त होते नांदुरी ते सप्तशृंगी गड दहा किलोमीटरचा रस्ता घाट असल्याने नागमोडी वळणे सर्वत्र हिरवेगार दाट जंगल उंच उंच हिरवेगार डोंगर जणू डोंगराने हिरव्या रंगाचे मखमली शाल पांघरली की काय असा भास जाणवतो डोंगरावरून पडणारे असंख्य धबधबे ठिकठिकाणी कोसळताना दिसत आहे यामुळे निसर्ग सौंदर्य बहरु लागले आहे तसेच छोट्या-मोठ्या धबधब्याखाली उभे राहून पर्यटक भिजण्याचा आनंद घेताना दिसत आहे तसेच घाटात दाट धुके असल्यामुळे पर्यटकांना व भाविकांना दिवसा गाडीची लाईट सुरू करून प्रवास करावा लागत आहे या दाट धुक्यामुळे जणू स्वर्गातच आल्याचा भास पर्यटकांना जाणवत आहे तर लहान बालगोपाळांना ढगात आल्यासारखे वाटत असल्याने निसर्गप्रेमी पर्यटक पर्यटनाचा आनंद लुटत आहेत घाटाच्या मध्यभागी पिकनिक पॉईंट असल्याने या ठिकाणी हजार ते दीड हजार फूट खोल दरी असल्याने दरीमधून पांढरे शुभ्र धुके वरती येत असल्याने तसेच समोर उंच मार्कंडे पर्वत पर्यटकांना खुणावत आहे या ठिकाणी हजारो पर्यटक निसर्गाचा आनंद घेत सेल्फी काढताना दिसत आहेत. सतत पाऊस सुरू असल्याने वाहने चालविताना छोटे-मोठे खळखळणारे धबधबे आवाज करत आहेत तसेच पिकनिक पॉईंट जवळच हजारो फुट उंचावरून पांढराशुभ्र धबधबा कोसळताना दिसत असून पर्यटक हा खास धबधबा बघण्यासाठी गर्दी करत आहे येथे येणारे पर्यटक गरमागरम कांदा बटाटा भजी कणीस वडापाव चहा कॉफी याचा आस्वाद घेत आहेत. त्यामुळे येथील हॉटेल छोटे मोठे व्यवसायिकांना सुगीचे दिवस आलेले पाहायला मिळत आहे. त्याचप्रमाणे गडावर मोठ्या प्रमाणावर रात्रंदिवस धुक्याचे साम्राज्य असल्याने रोपवे ट्रॉली भाविकांसाठी आकर्षण ठरत आहे या धुक्यामधून वर जाणारी रोपवे ट्रॉली जणू स्वर्गातच नेते की काय, असा भास पर्यटकांना जाणवत आहे.



**घाटाच्या मध्यभागी रस्त्यावरच मोठा धबधबा असल्याने दुचाकी, चारचाकी वाहनांची गर्दी होते दुतर्फा मोठ्या प्रमाणात असल्याने बऱ्याच वेळा वाहनांच्या या गर्दीमुळे वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. धबधब्याच्या ठिकाणी वाहने लावू नये, असे फलक लावावेत किंवा एखादा सुरक्षाकर्मी नेमवावा.**






## रेल्वे मंत्रालयाचा 'एक स्टेशन एक उत्पाद' उपक्रम सर्वत्र यशस्वी

**मनमाड ।** स्थानिक कला, संस्कृती आणि उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने सुरू केलेल्या 'एक स्टेशन एक उत्पाद' या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत, भुसावळ रेल्वे विभागातील मनमाड, नाशिक रोडसह एकूण २५ स्थानकांवर हा उपक्रम सध्या यशस्वीपणे राबवला जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या "व्होकल फॉर लोकल" या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने देशभरात या योजनेची अंमलबजावणी सुरू केली आहे. योजनेचा प्रमुख उद्देश म्हणजे स्थानिक कारागिर, स्वयं-सहायता गट व पारंपरिक कला-कौशल्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे व त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे. भुसावळ विभागातील मनमाड, नाशिक रोड, भुसावळ, जळगाव, शेगाव, अकोला, बडनेरा, अमरावती, चाळीसगाव, मलकापूर, बुरहानपूर, खंडवा, देवळाली, लासलगाव, पाचोरा, नांदुरा, निफाड, नांदगाव, वरणगाव, मुर्तिजापूर, नवी अमरावती, रावेर, नेपानगर, धुळे आणि जळंब अशा २५ प्रमुख रेल्वे स्थानकांवर या योजनेअंतर्गत स्टॉल्स उभारण्यात आले आहेत.

या स्टॉल्सवर स्थानिक आदिवासी हस्तकला, मातीची भांडी, अजिंठा-एलोरा थीमवर आधारित वस्तू, प्लास्टिकच्या चटया, स्थानिक खाद्यपदार्थ, वारली चित्रकला, पारंपरिक वस्त्र, ज्यूट आणि बांबू हस्तकला, हातमाग वस्त्रप्रकार, कुम्हार काम व इतर स्थानिक ओळखीच्या उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री केली जात आहे.

या योजनेमुळे कारागिरांना केवळ त्यांच्या उत्पादनांचे प्रदर्शन करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होत नाही तर ग्राहकांशी थेट संवाद साधण्याची संधीही मिळत आहे. यामुळे त्यांचे उत्पन्न वाढण्यास हातभार लागतोय. रेल्वे प्रशासन स्थानिक उत्पादकांना नाममात्र टोकन शुल्कावर १५ दिवसांच्या कालावधीसाठी हे स्टॉल्स उपलब्ध करून देत आहे

या उपक्रमात सहभागी होण्याची इच्छा असलेल्या स्थानिक कारागिरांनी अथवा स्वयं-सहायता गटांनी संबंधित स्थानक व्यवस्थापक अथवा मुख्य विभागीय वाणिज्य निरीक्षकांशी संपर्क साधावा. ही प्रक्रिया पारदर्शक असून स्थानिक उत्पादनांना चालना देण्यासाठी रेल्वे प्रशासन पूर्ण सहकार्य करत आहे.

रेल्वे स्थानकांवरील प्रवाशांची सततची वर्दळ, ही स्थानिक उत्पादकांसाठी एक मोठी संधी ठरत असून, पारंपरिक कलांना नवसंजीवनी मिळत आहे. 'एक स्टेशन एक उत्पाद' ही योजना ग्रामीण व आदिवासी भागातील कला-कौशल्याचा राष्ट्रीय पातळीवर प्रचार करत असून, भविष्यात अनेक स्थानकांवर हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचे उद्दिष्ट आहे.

## लोहोणेर जनता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस. यू. सागर यांचा सेवापूर्ती कार्यक्रम संपन्न



**देवळा ।** लोहोणेर येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जनता विद्यालय,अभिनव बालविकास मंदिर आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय लोहोणेरच्या मुख्याध्यापिका एस. यू. सागर यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्र समाज संस्थेचे चिटणीस दिलीप दळवी होते. प्रमुख पाहुणे म्हणून मविप्र महिला संचालिका शालनताई सोनवणे, बागलाण तालुका संचालक डॉ. प्रसाद सोनवणे, देवळा तालुका संचालक विजय पगार, माजी संचालक डॉ. विश्राम निकम, प्राचार्य हितेंद्र आहेर, सरपंच मोहिनी आहेर, माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष भैय्यासाहेब देशमुख, उच्च माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष नितीन आहेर जितेंद्र आहेर, सतिश सोमवंशी, पर्यवेक्षक आर. एच. देसले आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.विद्यालयाच्या गीतमंचाने ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर सर्व मान्यवरांचे शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सेवापूर्ती निमित्ताने एस. यू. सागर मॅडम यांचा भेटवस्तू देऊन विशेष सत्कार करण्यात आला.ए.टी.शेवाळे, एस.आर. शेवाळे, डॉ. हर्षद सागर, साहेबराव कुवर, विनोद हिरे, विजय खैरनार, राजेंद्र गांगुर्डे, महेंद्र महाजन, कल्याणी सागर, सोनवणे मॅडम, बी. एस. सूर्यवंशी यांनी आपले मनोगत व्यक्त करून मॅडम यांच्या कार्यकर्तृत्वास मन:पूर्वक अभिवादन केले.या प्रसंगी मविप्र बागलाण तालुका संचालक डॉ. प्रसाद सोनवणे, महिला संचालिका शालनताई सोनवणे, देवळा तालुका संचालक विजय पगार आणि माजी संचालक डॉ. विश्राम निकम यांनीही आपले मनोगत व्यक्त करत एस. यू. सागर मॅडम यांच्या शिक्षणक्षेत्रातील योगदानाची प्रशंसा केली आणि त्यांच्या भावी आयुष्यास शुभेच्छा दिल्या.सत्कारमूर्ती एस. यू. सागर मॅडम यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळातील आठवणी,अनुभव आणि संस्थेविषयी कृतज्ञता भावपूर्ण शब्दांत व्यक्त केली. शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीप दळवी यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात म्हटले की,आपल्या संपूर्ण सेवाकाळात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच ध्येय ठेवून काम करणारी,कठोर शिस्त आणि मायेची उब असलेली शिक्षिका म्हणजे एस. यू. सागर मॅडम.या भावपूर्ण सोहळ्यास सागर मॅडम यांचे कुटुंबीय, आप्तेष्ट, मविप्र संस्थेचे पदाधिकारी, तसेच जनता विद्यालय, अभिनव बालविकास मंदिर, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार राकेश थोरात व सुनील एखंडे यांनी मानले.

## ओझे येथे कृषिदूतांकडून मधुमक्षिका पालनाबाबत जनजागृती

**दिंडोरी ।** दिंडोरी तालुक्यातील ओझे येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमाअंतर्गत कर्मयोगी दुलाजी सीताराम पाटील कृषी महाविद्यालयातील कृषिदुतांनी मधुमक्षिका पालनाबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली. यात मधुमक्षिकांच्या विविध प्रजाती, मधुमक्षिका पालनातून मिळणारी उत्पादने तसेच मधुमक्षिका पालनाचे फायदे सांगण्यात आले. पुरक व्यवसाय म्हणून मधुमक्षिका पालन केल्यास शेतकऱ्यांचे उत्पादनवाढीस नक्कीच मदत होईल, परागीभवनातून पीक उत्पादनात भर पढण्यास मदत होईल, असे कृषिदूतांनी सांगितले. तसेच मधुमक्षिका पालनासाठी लागणारे साहित्य, मधपेट्या व्यवस्थापन आणि मधुमक्षिका संगोपन आदी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. कृषिदूत तेजस शिरसाठ, प्रशांत सोनवणे, यश सोनवणे, कार्तिश सूर्यवंशी, प्रतिक उगले, शुभम विधाते यांनी या कार्यक्रमांचे आयोजन केले



## सेवेकऱ्यांनी जीवनात भागवत आचरणात आणावा : आबासाहेब मोरे

### सप्ताहाच्या तृतीय दिवशी पठण आणि सत्संग उत्साहात

**दिंडोरी ।** भगवान श्रीकृष्णाच्या पुण्यभूमीत मथुरा येथे श्रीमद् भागवत सप्ताह करणारे सारे सेवेकरी खरोखर पुण्यवान आणि भाग्यवान आहेत. भागवतामध्ये जीवन जगण्याचा संदेश देण्यात आला आहे. त्यामुळे सेवेकऱ्यांनी केवळ पठण करून थांबू नये तर भागवत आपल्या जीवनात प्रत्यक्ष आचरणात आणावा, असे मौलिक विचार



आबासाहेब मोरे यांनी मांडले.

मथुरा येथे सेवामार्गातर्फे भागवत सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी आबासाहेब मोरे यांचा सत्संग मोठ्या उत्साहात पार पाडला. त्यावेळी त्यांनी भागवताचे माहात्म्य सांगितले. ते म्हणाले की, भागवतात नाम आणि संगतीचे महत्त्व सांगण्यात आले आहे. आपण सतत भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे. मात्र त्याउलट आपण वागत असतो. एखाद्याचा द्वेष करून त्या व्यक्तीचे सतत स्मरण ठेवतो. आपण संपूर्ण जीवनात भगवंताचे स्मरण ठेवले तर अखेरच्या क्षणी देखील भगवंतच आपल्या स्मरणात राहील आणि आपला पुढचा प्रवास सुखकर होईल. त्यामुळे नामाशिवाय तरणोपाय नाही. भागवत पारायण केल्यानंतर इथून जाताना एक संकल्प आपण जरूर करावा की, यापुढे कोणत्याही गोष्टीचा हव्यास आपण करणार नाही. जे आहे त्यामध्ये समाधान मानू. विशेष म्हणजे परमेश्वराची सेवा करताना सुख सुविधांकडे पाहण्याऐवजी आहे त्या परिस्थितीत सेवा रुजू करावी, म्हणजे ती सेवा परमेश्वराला अधिक प्रिय होते असा उपदेश त्यांनी केला. कोणत्याही सेवेला भक्ती आणि श्रद्धेची जोड असेल तर ती सेवा फलश्रुत होते. अन्यथा कितीही मोठ्या सेवा करा त्याचा काहीही उपयोग होत नाही. भक्ती आणि श्रद्धा निर्माण होण्यासाठी आधी आपण भक्त बनले पाहिजे. त्याकरिता जीवनात एकदा तरी भागवताचे पठण करून भागवताचे सार लक्षात घेतले पाहिजे. भागवतात भक्ती मार्गाला प्राधान्य देण्यात आले आहे. भागवतामुळे भक्ती वृद्धिंगत होते असे विवेचन आबासाहेब मोरे यांनी केले.




### संतान गोपाळ मंत्रानुष्ठान, श्रीकृष्ण दोलोत्सव..

सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे उत्साहात वाचन झाले आणि दुपार सत्रात निरूपणानंतर श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त सुयोग्य संतानप्राप्तीकारक श्री संतान गोपाळ मंत्रानुष्ठान आणि श्रीकृष्ण दोलोत्सव अपूर्व उत्साहात साजरा करण्यात आला. आज (दि. ३०) कन्याविवाहकारक श्री कात्यायनी पूजन व मंत्रानुष्ठान तसेच गिरीराज गोवर्धन पूजन व अन्नकूट हा उपक्रम घेण्यात येणार आहे.

### ➤ महत्त्वाचे

## अकोले तालुक्यात रासायनिक खते उपलब्ध

**अकोले ।** अकोले आदिवासी भागातील व परिसरासह खरीप हंगामात अत्यावश्यक युरिया व इतर रासायनिक खतांचा ऐन पावसाळ्यात



तुटवडा निर्माण झाला असता अकोले तालुका ग्राहक पंचायत महाराष्ट्रासह अनेकांनी मागणी केल्याने एकूण बफर साठ्यापैकी निम्मा युरिया खुला करण्यात आला आहे. उर्वरित बफर साठा नियोजनाप्रमाणे पुढील महिन्यात खुला करण्यात येणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी यांनी दिली. तालुक्यात मंजूर असलेल्या 600 मे.टन बफर साठ्यापैकी 298.84 में.टन साठा उपलब्ध झाला आहे. त्यापैकी 50% म्हणजे 150 मे.टन बफर साठा जिल्हाधिकारी यांनी वाटपासाठी मंजूरी दिली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना रासायनिक खते युरिया वाटपास सुरुवात केली असल्याने तालुक्यातील शेतकरी ग्राहक पंचायतीचे आभार मानत आहे. तक्रार असल्यास अकोले तालुका ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्याशी संपर्क करावा.

# वस्तू व सेवा कर (जीएसटी) आठ वर्षांचा यशस्वी प्रवास

"एक राष्ट्र- एक कर" या संकल्पनेवर आधारित देशभरात एकसमान अप्रत्यक्ष करप्रणाली निर्माण करण्याच्या उद्देशाने वस्तू व सेवा कर (जीएसटी) प्रणालीचा अवलंब करण्यात आला. १ जुलै २०१७ पासून देशभर लागू करण्यात आलेल्या या कायद्यानुसार, पूर्वी अस्तित्वात असलेले विविध अप्रत्यक्ष कर रद्द करून जीएसटी हा एकमेव अप्रत्यक्ष कर देशात लागू करण्यात आला. संपूर्ण देशात एकसमान करप्रणाली निर्माण करण्याचे हे पाऊल भारताच्या आर्थिक व्यवस्थेत ऐतिहासिक ठरले.


**जीएसटी प्रणालीमुळे काय बदलले?–** जीएसटी कायद्याच्या अंमलबजावणीनंतर नवीन तंत्रज्ञान, प्रणाली आणि पोर्टल्सच्या माध्यमातून व्यावसायिकांसाठी आर्थिक व्यवहारांची नोंद, लेखा-जोखा ठेवणे अधिक सोपे झाले आहे. या रचनेमुळे, करप्रणाली अधिक सुव्यवस्थित व पारदर्शक झाली,देशाच्या कर संकलनात वाढ झाली. त्यामुळे सरकारी महसुलात लक्षणीय वाढ दिसून येत आहे.




**जीएसटी परिषद या कायद्याचा कणा–** जीएसटी परिषद ही देशातील सर्व राज्ये आणि केंद्र सरकारचे प्रतिनिधित्व करणारी एक प्रमुख समिती असून ती जीएसटी संबंधित सर्व निर्णय घेते. केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या या परिषदेचे कार्य म्हणजे कर दर निश्चित करणे, वादविवाद निवारण, कायद्याचा एकसमान वापर सुनिश्चित करणे. या परिषदेमुळे जीएसटी व्यवस्थापन अधिक समन्वय साधून पार पाडले जाते. परिषदेकडून वेळोवेळी महत्त्वाचे निर्णय घेतले गेले आहेत, जसे की, ई-वे बिल प्रणाली, ई-इनव्हॉइस प्रणाली, तसेच इलेक्ट्रिक वाहने, जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य, जीवनरक्षक औषधांवरील कर दरांमध्ये कपात.

**जीएसटी नोंदणीधारकांनी कायद्याचे अनुपालन करावे–** १ जुलै २०१७ पासून लागू झालेल्या जीएसटी कायद्याअंतर्गत, अनेक लहान-मोठ्या उद्योग व्यवसायांनी नोंदणी केलेली आहे. नोंदणी ही व्यवसायाच्या स्वरूपावर व उलाढालीवर आधारित असून काही प्रकरणांमध्ये अनिवार्य तसेच ऐच्छिक सुद्धा असते. नोंदणीधारकांनी खालील बाबींची विशेषतः काळजी घ्यावी: नियमितपणे रिटर्न भरणे, आवश्यकता नसल्यास त्वरित नोंदणी रद्द करणे, अन्यथा, जीएसटी कार्यालयाकडून दंडात्मक कारवाई होऊन आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. GST प्रणालीतील आव्हाने करसल्लागारांच्या दृष्टिकोनातून आठ वर्षांचा कालावधी पूर्ण होत असताना, जीएसटी प्रणाली ही अनेक बाबतीत फायदेशीर ठरली असली तरी काही गंभीर अडचणी व आव्हाने आजही कायम आहेत. उदा- नवीन कायदा असल्यामुळे वारंवार तांत्रिक बदल व अपडेट्स होत आहेत, जीएसटी पोर्टलवर सातत्याने बदल लागू केले जातात, असे बदल अनेक वेळा अचानकपणे व जटिल स्वरूपात लागू होतात यामुळे कर सल्लागार व व्यावसायिक दोघांवरही अनावश्यक तणाव निर्माण होऊन निर्धारित वेळेत काम पूर्ण करतांना बहुतेक वेळा दबाव निर्माण होतो.

### जीएसटी परिषदेने दखल घ्यावी



जीएसटी परिषदेने रिटर्न भरण्याच्या कालावधीसंदर्भात शिथिलता द्यावी, तसेच फॉर्ममधील माहिती व प्रक्रियांचे सुलभीकरण करावे, जेणेकरून व्यवसायिक आणि करसल्लागार दोघांनाही कायद्याचे नियमित अनुपालन करता येईल आणि त्यांच्यावरचा कामाचा बोजा कमी होईल. थोडक्यात, जीएसटी कायदा लागू होऊन आठ वर्षे पूर्ण होत आहेत. ही प्रणाली देशाच्या कर व्यवस्थेसाठी निश्चितच एक महत्त्वाचा टप्पा आहे, पण ती अधिक परिणामकारक व्हायची असेल, तर व्यवसायिक, करसल्लागार आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्यामधील समन्वय, संवाद व सहकार्य अत्यावश्यक आहे. **– योगेश भास्कर कातकाडे, कर सल्लागार**

# भ्रष्टाचाराच्या दलदलीत त्र्यंबक नगर परिषद!

## ‘देवचक्के हटवा, चौकशी वाचवा!’ संतप्त मागणी

**नाशिक ।** त्र्यंबक नगर परिषदेत सुरू असलेल्या भ्रष्टाचार व गैरकारभाराच्या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर मुख्याधिकारी श्रीया स्वप्निल देवचक्के (वसुधा कुरणावळ) यांच्यावर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. या प्रकरणातील चौकशी प्रक्रियेत अडथळा येऊ नये म्हणून, त्यांना तात्काळ पदावरून दूर ठेवण्याची आग्रही मागणी त्र्यंबक येथील किरण चौधरी यांनी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडे लेखी अर्जाद्वारे केली आहे.

देवचक्के या त्र्यंबक नगर परिषदेच्या मुख्याधिकारी असण्यासोबतच, त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्ट व संत निवृत्तीनाथ देवस्थानच्या सचिवपदावरही कार्यरत

> सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी इगतपुरी त्रंबक, यांनी ज्या नसत्यांची मागणी केलेली आहे. त्या सर्व त्यांना वेळेत उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे जी कागदपत्रे त्यांना आवश्यक होती ती सर्व उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत त्याचप्रमाणे नगरपरिषदेचे जे अधिकारी,कर्मचारी यांना त्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी आदेशित करण्यात आले होते, त्यांना देखील त्या वेळेमध्ये हजर राहायला सांगण्यात आलेले आहे.माझे काम पारदर्शक आहे त्यामुळे मी कोणत्याही प्रकारचा अडथळा यामध्ये निर्माण होईल अशा प्रकारचे काम केलेले नाही. त्यांना सर्वतोपरी सहकार्यच केलेले आहे.किरण चौधरी यांनी चुकीचे काम केलेले आहे आणि ते काम कसे बरोबर आहे हे दाखवण्यासाठी ते विनाकारण त्रास देत आहेत.
>
> **– श्रीया देवचक्के, मुख्याधिकारी, नगर परिषद त्र्यंबक**





आहेत. त्र्यंबकवासीयांनी नगर परिषदेतील भ्रष्ट कारभार व अनियमिततेबाबत थेट राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे तक्रारी केल्यानंतर, त्यांनी तत्काळ जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना चौकशीचे आदेश दिले. सध्या इगतपुरी-त्र्यंबकचे उपविभागीय अधिकारी ओंकार पवार यांच्या मार्फत या तक्रारींची चौकशी सुरू आहे. मात्र चौकशीला आवश्यक असलेली पारदर्शकता व निष्पक्षता राखायची असेल, तर मुख्याधिकारी पदावर असणाऱ्या देवचक्के यांची उपस्थिती ही संशय निर्माण करणारी ठरू शकते, असा सूर त्रंबक मध्ये उमटला आहे. "चौकशी होईपर्यंत देवचक्के यांना तत्काळ पदावरून बाजूला करावे अथवा त्यांची तात्पुरती बदली करावी," अशी ठाम मागणी करून चौकशी प्रक्रिया निर्भय व विनाव्यत्यय पार पाडण्यावर चौधरी यांनी भर दिला आहे.या मागणीमुळे त्र्यंबक नगर परिषदेच्या कारभारातील अनियमिततेच्या कथित प्रकरणावर नव्याने लक्ष केंद्रित झाले असून, आगामी काळात मोठा शासकीय भूकंप होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# नागापूर फाटा येथे डम्परच्या धडकेत शाळकरी मुलगी ठार

## नाशिक-छत्रपती संभाजी नगर राज्यमार्गावरील घटना

निफाड | तालुक्यातील चांदोरी जवळ काल ( दि ३०) सकाळी पावणेदहा वाजेच्या दरम्यान डम्पर हायवाने एकाचवेळी दुचाकीसह ११ वर्षीय शाळकरी मुलीला धडक दिली या अपघातात सिद्धी मंगेश लुंगसे ही जागीच ठार झाली आहे. अपघातानंतर संतप्त झालेल्या नागापूर ग्रामस्थांनी नाशिक ते छत्रपती संभाजी नगर राज्य मार्ग तब्बल दीड तास रोखून धरला. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार नागापूर (चांदोरी) येथील सिद्धी मंगेश लुंगशे ही सोमवारी सकाळी पावणे दहा वाजता शाळेत जात असताना नाशिक ते छत्रपती संभाजी नगर राज्य मार्गावर नागापूर फाटा येथे रस्त्याच्या कडेला उभी असताना तिला नाशिकच्या बाजूने चांदोरी कडे जाणारा हायवा डंपर क्रमांक एमएच १५ एच एच ७५७८ ने जोराची धडक दिली. या अपघातात सिद्धी डंपर च्या मागील चाकात सापडल्याने तिचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला तर तिच्यासोबत असलेली तिची शाळकरी मैत्रीण अनुष्का जमधडे ही जखमी झाली. याच दरम्यान या हायवाने डाव्या बाजूने दुचाकी वरून जात असलेले चांदोरी येथील विश्वनाथ जाधव या पती-पत्नीला धडक देत त्यांनाही गंभीर जखमी केले आहे. हायवा नाशिक कडून चांदोरी कडे जात होता, एकाच वेळेस दोन डंपर हे समांतर जात असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या अपघातानंतर नागापूर आणि चांदोरी येथील ग्रामस्थ संतप्त झाले असून घटनास्थळी संतप्त नागरिकांनी तब्बल अडीच तास रास्ता रोको आंदोलन केले. संबंधित हायवाचालकावर कठोर कारवाई व्हावी, नागापूर फाटा येथे गतिरोधक बसवून या मार्गे तसेच गोदाकाठ भागात नियमित धावणाऱ्या



हायवा डंपरच्या वेगावर नियंत्रण आणावे, नागापूर फाटा येथे ब्लींकर बसवावेत अशी मागणी यावेळी संतप्त नागरिकांनी केली. पुष्कर हिंगणे, संदीप गडाख,संदीप टर्ले, बंडू खालकर, राहुल इंगोले, शिवाजी टर्ले व नागापूर येथील नागरिकांनी छत्रपती संभाजी अगर ते नाशिक राज्य मार्ग तब्बल अडीच तास रोखून धरला. घटनास्थळी सायखेडा पोलिसांनी तात्काळ धाव घेतली. सायखेडा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विकास ढोकरे,निफाड पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांनी संतप्त नागरिकांची समजूत काढून दोषीवर कायदेशीर कडक कारवाई करून या ठिकाणी उपाय योजना करण्याचे आश्वासन दिले,निफाड चे तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी अपघात स्थळाला भेट दिली.

# केबीटी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी सुविधा केंद्राची स्थापना

**नाशिक ।** येथील गंगापूर रोडवरील मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित अॅड. बाबुराव गणपतराव ठाकरे, (के.बी.टी) अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेश सुविधा केंद्राची (फॅसिलिटी सेंटर) ची सुरुवात झालेली असून या ठिकाणी रजिस्ट्रेशन म्हणजेच प्रवेश प्रक्रिया नोंदणी, मूळ कागदपत्रे स्कॅनिंग सुविधा त्याचप्रमाणे मूळ कागदपत्र पडताळणी सुविधा इत्यादी सुविधा विनाशुल्क सुरू करण्यात आलेली असून सदर महाविद्यालय हे नाशिक शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून विद्यार्थी व पालकांना महाविद्यालयामार्फत मिळणाऱ्या या विनाशुल्क सुविधेचा अतिशय फायदा होणार असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात अधिक माहितीसाठी किंवा काही अडचणी असल्यास सुविधा केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. विनोद शेवाळे- 9860190034 तसेच प्रा. श्री निलेश खराटे - 9822767671 यांच्याशी संपर्क साधावा असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतिष देवणे यांनी म्हटले आहे.

## महत्त्वाचे

### कॅन्सरग्रस्त बालकांच्या मदतीसाठी आरडी गीतांची मैफल गाजली

**नाशिक ।** आरडी बर्मन यांच्या २७ तारखेला झालेल्या जयंतीच्या निमित्ताने काही संवेदनशील कलाकारांनी एकत्र येऊन त्यांनी संगीत दिलेल्या व गायलेल्या गाण्यांच्या मैफलीचे आयोजन केले. काल रविवारी महाकवी कालिदास कलामंदिरात दुपारी १२.३० वाजता आरडी वाईब्स ही मैफल गाजली.



कॅन्सरग्रस्त बालकांच्या मदतीसाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला. मुंबईतील लोकप्रिय पार्श्वगायिका अमृता दहिवेलकर यांच्यासह अजय पाटील, राज ढगे, जयदीप जाधव, मयूरी मुर्डेश्वर, दर्शना बडोगे, सारिका शिरुडे या कलाकारांनी दमदार स्वरात विविध लोकप्रिय गाणी सादर केली. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. आरडी बर्मन यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. ओ मांझी रे...या गीताने मैफलीचा प्रारंभ झाला. चला जाता हूँ...,कांची रे कांची..., पिया तू अब तो आजा...,हमे तुमसे प्यार कितना...,आप की आँखोमे...,जय जय शिवशंकर...,ओ मेरे सोना रे...,ओ हसीना झुल्फोवाली..., बचना ए हसिनो... या व इतर गाण्यांना रसिकांची उत्स्फूर्तपणे दाद मिळाली. किशोर शिरुडे समन्वयक होते. प्रशांत महाले यांनी वाद्यवृंद संचलन तर ध्वनी संयोजन पवन वंजारी यांनी केले. गायक व संगीतकार आरडी बर्मन यांच्या विविध आठवणी सांगून समीर देसाई यांनी सूत्रसंचालनात रंग भरले. या मैफलीतून मिळालेला नफा कॅन्सरग्रस्त बालकांच्या मदतीसाठी व प्रीत फाउंडेशन या सामाजिक संस्थेला देण्यात आला.

### 'दातृत्वाच्या ज्ञानयज्ञा'ला 'ग्रामाभिमान मंच'चा हातभार!

**नाशिकरोड ।** पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात गेल्या तीन वर्षांपासून राबविण्यात येणाऱ्या 'दातृत्वाचा




ज्ञानयज्ञ' या अनोख्या उपक्रमाला पळसे येथील उपक्रमशील ग्रामाभिमान मंचने हातभार लावत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य प्रदान केले. ग्रामाभिमान मंचचे अध्यक्ष प्रमोद गायधनी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या उपक्रमात प्रमुख पाहुणे महाराष्ट्र माझा परिवाराचे संस्थापक अध्यक्ष विकास (बंटी) भागवत यांच्या हस्ते आणि ग्रामाभिमान मंचचे सचिव प्रा.सुनील आगळे, खजिनदार समाधान गायधनी, सदस्य रवींद्र टिळे, राहुल फडोळ, ओमकार गायधनी, सोहम गायधनी यांच्या उपस्थितीत विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना स्कूलबॅगचे वाटप करण्यात आले.

# नाशिक-पंढरपूर सायकल वारकऱ्यांचा झाला सन्मान



## महाराष्ट्र पोलीस अकॅडमीत रंगला गौरव सोहळा

**नाशिक ।** नाशिक सायकलिस्ट फाउंडेशन आयोजित 13 वी पंढरपूर सायकल वारी यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या सायकल वारकऱ्यांचा यथोचित सत्कार सोहळा महाराष्ट्र पोलीस अकॅडमी नाशिक येथील ओपन एयर थिएटर हॉल येथे संपन्न झाला.

दिनांक २० ते २२ जून दरम्यान नाशिक सायकलिस्ट फाउंडेशन आयोजित सायकल वारीत 300 सायकल प्रेमींनी सहभाग घेतला होता. एक अद्वितीय भक्ती आरोग्य आणि एकतेची सायकलवारी पांडुरंगाच्या कृपेने निर्विघ्नपणे पार पडली. दि. २२ जून रोजी अखंड महाराष्ट्रातील सायकलिस्टचा रिंगण सोहळा सर्वांना अनुभवायला मिळाला. ही सायकल वारी नुसती एक धार्मिक वारी नसून ती शारीरिक, मानसिक आणि सामाजिक शिस्तीचा एक आदर्श उदाहरण बनली आहे. प्रत्येक वर्षी प्रमाणे यंदाही सायकल स्वारांनी अत्यंत निष्ठेने, सेवाभावाने आणि एकमेकांच्या सहकार्याने ही वारी यशस्वी केली. वारीच्या सांगता समारंभ कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनचे संस्थापक आयपीएस हरीश बैजल, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी नाशिक चे उपसंचालक आय.पी.एस. संजय बारकुंड, छाया बैजल, नाशिक सायकलिस्टस् फाउंडेशनचे माजी अध्यक्ष राजेंद्र वानखेडे, प्रवीणकुमार खाबिया हे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत सर्वांना तीन दिवसाच्या सायकलवारीचे छायाचित्रण पिक्सटल फ्लोचे अक्षय निंबाळकर व टीम केलेला लघुपट दाखविण्यात आला. हा लघुपट बघून सर्वांना" याची देही याची डोळा ,रंगला सायकल स्वारांचा सोहळा "अशी प्रचिती झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वारी प्रमुख माधुरी गडाख यांनी केले. काही विशेष सायकलिस्टचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते स्टेजवर करण्यात आला. प्रथम 350 की मी.चा सायकल प्रवास एका पायाने सायकल चालविणारा दिव्यांग सुनील पवार याचा करण्यात आला. सर्वांनी उभे राहून टाळ्यांचा कडकडाट करून अभिनंदन केले. त्यानंतर कृत्रिम पाय रोपण केलेले बहिरू मते यांचा सत्कार करण्यात आला. दृष्टीहीन तरूणी वैशाली सालोकर व दृष्टीबाधित सागर बोडके यांनी दोन व्यक्तींना चालवता येणारी टॅण्डम सायकलवर वारी पूर्ण केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले.

ज्येष्ठ महिला मालती भावसार व लीलावती पवार यांना सन्मानित केले. तसेच पहिल्या वारी पासून सलग तेरा वेळा सायकलवारी करणारे नरेंद्र भाई कंसारा यांचा सन्मान केला. सर्वात लहान सायकलिस्ट साईराज सूर्यवंशी, ओंकार सोनवणे सनिक जाधव यांना सन्मानित केले. सलोनी आंबेकर या तरुणीने आपल्या पहिल्या वारीचे अनुभव कथन केले. फॉक्स कंपनीचे अजय नागरे यांनी आपल्या ४० मित्रांना सोबत घेऊन यावर्षी नाशिक सायकलिस्ट आयोजित पंढरपूर सायकलवारी केली. नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनचे अध्यक्ष किशोर काळे यांनी आभार मानले व सर्व वारकऱ्यांचे अभिनंदन केले. माजी अध्यक्ष प्रवीण कुमार खाबिया यांनी वारी यशस्वीरित्या पार पडल्याबद्दल सर्वांच्या अभिनंदन केले. पंढरपूर सायकलवारीचे प्रणेते हरीश बैजल यांनी वारी बरोबर सायबर फसवणूक विषयी प्रबोधन केल्याबद्दल टीमचे कौतुक केले. नाशिक सायकलिस्ट फाउंडेशन दर दोन वर्षांनी नवीन अध्यक्ष व टीमची निवड करत असतात. यावर्षी सर्वानुमते सक्रिय सायकलिस्ट अमित घुगे यांचे नाव अध्यक्षपदी बैजल यांनी घोषित केले. अध्यक्ष किशोर काळे यांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष घुगे यांच्याकडे एन.सी.एफ. चा झेंडा सुपूर्त केला. उपस्थित सर्वांनी या निर्णयाला मान्यता दिली. अमित घुगे यांनी खंबीरपणे नवीन टीम तयार करून नाशिक सायकलिस्ट फाउंडेशन अधिक नवीन उंचीवर देण्यासाठी प्रयत्नशील राहील असे मत व्यक्त केले.

या वारीसाठी अनेकांचे हातभार लाभले. त्या सर्वांना विठू माऊलीची आकर्षक ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. सायकल वारीत सहभागी झालेल्या सर्व महिलांना संचालक सुरेश डोंगरे यांच्या वतीने सेमी पैठणी भेट देण्यात आली. नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनच्या वतीने वारी यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या सर्व सायकलिस्ट ला विठू माऊलीची आकर्षक ट्रॉफी, अडावदकर ज्वेलर्स तर्फे चांदीच्या विठू माऊली च्या पादुका देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात ए टू झेड सायकलच्या वतीने लकी ड्रॉ काढण्यात आला. भारती खांगल व शसंदीप गवळी हे भाग्यवंत विजेते ठरले. त्यांना सायकल भेट देण्यात आली.

# थकबाकीदार शेतकरी संघटनांची पिंपळगाव बसवंतला आज बैठक

**पिंपळगाव बसवंत ।** नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या ४ जुलै रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आधी नाशिक जिल्ह्यातील 56 हजार थकबाकीदार शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात सर्व शेतकरी संघटनांनी एकत्र येऊन एकमुखी ठराव करण्यासाठी आज (दि. १ जुलै) दुपारी १ वाजता पिंपळगाव बसवंत येथे विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती शेतकरी समन्वय समितीचे अध्यक्ष भगवान बोराडे यांनी दिली.

या बैठकीसाठी भगवान बोराडे, 938 आदिवासी सहकारी संस्थेचे राज्य अध्यक्ष कैलास बोरसे, विठ्ठल राजे पवार राष्ट्रीय अध्यक्ष शरद जोशी विचार मंच सुरेश परब राष्ट्रीय अध्यक्ष धनवान भारत पार्टी, बाळासाहेब रास्ते अध्यक्ष बळीराजा पार्टी महाराष्ट्र राज्य दिलीप पाटील समिती सदस्य, प्रकाश शिंदे शेतकरी नेते, अर्जुन बोराडे जिल्हा अध्यक्ष प्रणित शेतकरी संघटना, खेमराज कोर, अनंत पाटील सदस्य अर्थवादी विचार मंच, रामराव मोरे, विलास बोरस्ते, निवृत्ती गारे जिल्हाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सुधाकर मोगल, जिल्हाध्यक्ष शेतकरी संघर्ष संघटना शंकर ढिकले, कार्याध्यक्ष शेतकरी संघटना दीपक पगार जिल्हाध्यक्ष रयत शेतकरी संघटना, तुषार गांगुर्डे जिल्हा अध्यक्ष मनसे, प्रशांत कड चेअरमन कृषी उत्पन्न बाजार समिती वनी, गंगाधर निखाडे सदस्य दिंडोरी बाजार समिती, देवा बापू वाघ शिवसेना शिंदे गट, गणेश निंबाळकर जिल्हाध्यक्ष प्रहार संघटना यांच्यासह इतर शेतकरी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. चार जुलै रोजी होणाऱ्या जिल्हा बँकेच्या सर्वसाधारण सभेसाठी एकमुखी ठराव करण्यात येणार आहे त्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले की माहिती बोराडे यांनी दिली.

# यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा आज ३६ वा वर्धापन दिन

## अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांची प्रमुख उपस्थिती । पाच माजी कुलगुरुंचा होणार सत्कार

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३६ वा वर्धापन दिन येत्या मंगळवारी (दि. १ जुलै) भारताचे सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ तथा भारतीय अणुउर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठ मुख्यालयात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू दिवंगत प्रा. राम ताकवले यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण, विविध क्षेत्रातील पाच मान्यवरांना ‘यश जीवनगौरव’ पुरस्कार प्रदान करणे, पाच माजी कुलगुरुंचा सत्कार सोहळा, तसेच उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार व सर्वाधिक नोंदणी असलेले विभागीय केंद्र यांचा सन्मान अशा वैविध्यपूर्ण भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाच्या सुकाणू समितीने प्रथमच या वर्षापासून महाराष्ट्र राज्यातील विविध क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी करत विकासात योगदान देणाऱ्या महनीय व्यक्तींना ‘यश जीवनगौरव पुरस्कार’ देवून गौरवान्वित करण्याचा निर्णय



घेतला आहे. त्यानुसार यंदाच्या प्रथम जीवनगौरव पुरस्कारासाठी विद्यापीठाच्या सुकाणू समितीने यावर्षी पाच मान्यवरांची निवड केली आहे.

त्यात पद्मश्री चैत्राम पवार (पर्यावरण, वनसंवर्धन व शेती), प्रा. रंगनाथ पठारे (साहित्य), प्रकाश पाठक (अर्थकारण व उद्योजकता आणि समाजकार्य), अशोक कटारिया (उद्योग, शिक्षण) व विवेक सावंत (माहिती– तंत्रज्ञान) यांचा समावेश आहे. यावेळी विद्यापीठाचे चार माजी कुलगुरू सर्वश्री प्रा. डॉ. बी. पी. साबळे, प्रा. डॉ. राजन वेळूकर, प्रा. डॉ. माणिकराव साळुंके, प्रा. डॉ. ई. वायुनंदन व शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर) चे माजी कुलगुरू प्रा. डॉ. एम. जी. ताकवले यांचा य. च. म. मुक्त विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू प्रा. डॉ. संजीव सोनवणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात येईल, तसेच य च. म. मुक्त विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन यांच्या हस्ते विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरु तथा बिहार मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित पलांडे व य च. म. मुक्त विद्यापीठाच्या माजी प्राध्यापिका डॉ. अनुराधा देशमुख यांचाही सत्कार करण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव श्री. दिलीप भरड यांनी दिली.

### डॉ. अनिल काकोडकर यांचा परिचय



विद्यापीठाच्या या ३६ व्या वर्धापन दिनासाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणारे डॉ. अनिल काकोडकर हे प्रसिद्ध भारतीय अणुशास्त्रज्ञ आहेत. ज्यांनी भाभा अणु संशोधन केंद्राचे (बीएआरसी) संचालक आणि भारतीय अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष यासारख्या महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. डॉ. काकोडकर यांनी भारताच्या स्वावलंबी अणुऊर्जा कार्यक्रमाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली, ज्यामध्ये प्रेशराइज्ड हेवी वॉटर रिॲक्टर्स, ध्रुव रिॲक्टर आणि मद्रास अणुऊर्जा केंद्र युनिट्स १ आणि २ चे पुनर्वसन यांचा समावेश आहे. पोखरण येथे १९७४ व १९९८ मध्ये करण्यात आलेल्या दोन्ही अणुचाचण्या वेळी त्यांची भूमिका महत्वाची होती. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) येथे मार्गदर्शक प्राध्यापक (डिस्टिंग्विश्ड चेअर प्रोफेसर) म्हणून कार्य केले. ग्रामीण भागात तंत्रज्ञानाद्वारे सक्षम शाश्वत विकासासाठी शहर आणि गावातील अंतर भरून काढण्यासाठी ज्ञानावर आधारित परिसंस्था असलेल्या सिलेज या संकल्पनेचाही ते प्रचार करत आहेत.

# घोषणांची झगमग, अंमलबजावणीची अंधारी वाट

**भारतातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० हे देशाच्या शैक्षणिक इतिहासातील एक महत्त्वाकांक्षी दस्तऐवज आहे. ह्यतीन वेळा हजेरी घ्या, तीन भाषा शिकवा, व्यावसायिक शिक्षण द्या, कौशल्यविकास कराह्ण अशा घोषणांनी भरलेले हे धोरण प्रथमदर्शनी आकर्षक आणि प्रगतिशील वाटते. परंतु या घोषणांचा आभास आणि खऱ्या अंमलबजावणीतील दरी हीच चिंतेची बाब ठरते. या धोरणाच्या मुळाशी जर डोकावले, तर असे दिसते की, यातून भारतातील सामाजिक, आर्थिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक वास्तव नजरेआड केले गेले आहे.**

भारत हा शहरी नवमध्यमवर्गाच्या आकांक्षा पूर्ण करणारा देश नाही, तर तो बहुसंख्य अल्पभूधारक, गरिब, ग्रामीण आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांचा देश आहे. अशा देशात ह्यपाश्चिमात्यह्ण शिक्षणधोरणांचे अनुकरण हे धोरणात्मक दुर्भाग्य आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार, भारतातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ६८.८४% लोक ग्रामीण भागात राहतात, तर ३१.१६% लोक शहरी भागात राहतात. याचा अर्थ असा की, भारतातील बहुसंख्य जनता ग्रामीण भागात राहते लाखो विद्यार्थी अजूनही दोन वेळचे अन्न, पिण्याचे स्वच्छ पाणी, आणि चांगली शाळा यासाठी संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत शासनाने ₹नव्या धोरणांतर्गत₹ किती नवे शिक्षक नेमले? किती सरकारी शाळा उभ्या केल्या? या प्रश्नांची उत्तरे शून्यावर येऊन थांबतात.

आज एकीकडे सरकारी व अनुदानित शाळा बंद करण्याचा, तर खासगी, इंग्रजी माध्यमाच्या, विनाअनुदानित शाळा चालू करण्याचा व्यवस्थात्मक अजेंडा शासन राबवत आहे. ही दिशा केवळ बाजारीकरणाचीच नाही, तर कल्याणकारी राज्याच्या आत्म्यालाच दुर्लक्षित करणारी आहे. गरिबांच्या शिक्षणाचे हक्काचे व्यासपीठ सरकारच नष्ट करत असेल, तर सामाजिक न्याय, समतेची संकल्पना आणि ह्यसबका साथ, सबका विकास हे फक्त राजकीय घोषवाक्य ठरतात.

**शिक्षणाचा अधिकार आणि शासनाचे उत्तरदायित्व**

भारतीय संविधानाच्या कलम २१-अ नुसार प्रत्येक बालकाला ६ ते १४ वयोगटात मोफत व सक्तीचे शिक्षण मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. पण या अधिकाराला पूरक म्हणून आवश्यक असलेली व्यवस्थात्मक कुवत आपण उभी केली आहे का?

शिक्षक भरती प्रक्रिया थांबलेली आहे. शिक्षकांच्या १०० टक्के जागा भरल्या जात नाहीत. असंख्य जिल्हा परिषद शाळांमध्ये एकच शिक्षक कार्यरत आहे. मूलभूत सुविधांचा अभाव आहे. अभ्यासक्रम, प्रशिक्षण, शिक्षक व साधनसामग्री या बाबतीत शासनाचा अंमल केवळ कागदावर दिसतो.

स्थानिक अस्मिता, भाषिक गौरव, मातृभाषेतील शिक्षण यासंबंधी शासनाचा दृष्टिकोन कुठे आहे? आज इंग्रजी माध्यमातील शाळांमध्येच यशाचे गमक मानले जाते.

मराठी भाषेतील गुणवत्तावान शिक्षण राबवण्याऐवजी शासन इंग्रजी शाळा सुरू करत आहे. शिक्षणाचा उद्देश हा मातृभाषेतील सर्जनशील विचारांची अभिव्यक्ती आणि समज असावा की, फक्त जागतिक बाजारात काम मिळवण्याचे साधन? हाच प्रश्न राज्य शासनाने स्वतःला विचारायला हवा.

शाळा म्हणजे केवळ इमारत नाही, ती एक संस्कृती असते, स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेल्या जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या शाळांनी देशाला उत्तम नेते, प्रशासक, विचारवंत, डॉक्टर, शास्त्रज्ञ दिले. गावोगावी उभ्या राहिलेल्या या शाळा हे सामाजिक समतेचे, प्रगतीचे आणि लोकशाही शिक्षणाचे प्रतीक होत्या.

त्या काळात आर्थिक परिस्थिती हलाखीची असली तरी, शाळा गावाच्या जवळ होत्या, परवडणाऱ्या होत्या आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण पुरवत होत्या.

आज मात्र शासनाला या शाळा परवडत नाहीत. शिक्षणाच्या नावाखाली खाजगीकरण, केंद्रीकरण, डिजिटल विभाजन आणि स्पर्धात्मक बाजारशक्ती वाढत आहे. गावात रस्ता, ब्रिज, कॉम्प्लेक्स होतोय, पण शिक्षणाच्या शाळा मात्र बंद होतात. ही स्थिती एका उदासीन आणि बाजारपेठा चालवणाऱ्या व्यवस्थेची जाणीव करून देते.

**शिक्षणाचा उद्देश काय?**

शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व घडवण्याची, सामाजिक समतेचा पाया रचण्याची आणि राष्ट्रीय अस्मितेची उभारणी करणारी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया बाजारातील उत्पादन प्रणालीप्रमाणे आउटपुट ओरिएंटेड' म्हणजे 'फलनिष्पत्ती-केंद्रित' किंवा 'परिणाम-आधारित'. असू शकत नाही.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण



**डॉ. प्रशांत विघे**
**राज्यशास्त्र विषयाचे लेखक**
**९३२६८७७७४९**

शिक्षणात मूल्ये, समता, न्याय, सर्जनशीलता आणि भाषिक गौरव यांचा समावेश हवा. राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने शिक्षणाची दिशा केवळ जागतिक स्पर्धेसाठी नव्हे तर स्थानिक गरजांसाठी ठरवली पाहिजे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० वास्तवाचे विश्लेषण :**

**शिक्षक भरती व कमतरता :** मार्च २०२४ मध्ये अधिवेशनात लोकसभेत उत्तर देताना शिक्षण मंत्री म्हणाले की, देशात २०२३ अखेर पर्यंत ११.१६ लाख शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने मान्य केले आहे. आता तर २०२५ मध्ये १४ लाखापेक्षा जास्त शिक्षकाचा जागा रिक्त आहेत.

महाराष्ट्रात २०२३ मध्ये १.२५ लाख शिक्षकांची पदे रिक्त होते सध्या १,५०,००० पेक्षा जागा रिक्त असू शकतात. ज्यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये 'एक शिक्षक ह्न सर्व वर्ग' ही स्थिती विद्यमान आहे. रिक्त जागांमुळे सर्वसामान्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी, ज्या पालकांना समाजव्यवस्थेचे जाण आणि भान आहे, असे पालक आपला उदरनिर्वाह तुटपुंज्या उत्पन्नात करत असतानाही आपल्या मुलाला खाजगी शाळेत घालतात. कारण त्यांना आपल्या मुलाला शिकवायचे आहे, त्याचे भवितव्य घडवायचे आहे, हीच त्यांची महत्त्वाकांक्षा आहे.

मात्र, ही अशी भयावह परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झालेली असताना, जनप्रतिनिधी या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात, हे अत्यंत दुर्दैवी आहे. शिक्षण हक्काचा कायदा अस्तित्वात असतानाही, पुरोगामी महाराष्ट्रात मुलांचे शिक्षणच धोक्यात येणे ही बाब खेदजनक आणि शासनाच्या संवेदनशून्यतेचे द्योतक आहे. मात्र, हे सारे होत असताना राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, आणि शिक्षण खात्याचे अधिकारी गप्प आहेत.

कोणत्याही अधिवेशनात शिक्षक भरतीवर ठोस योजना मांडली जात नाही. दरवेळी आश्वासनांचे ढग जमतात, पण शिक्षक भरतीचा पाऊस मात्र पडत नाही. शिक्षण ही राज्याची जबाबदारी असताना राज्यच जर आपल्या जबाबदारीपासून पळ काढत असेल, तर हा लोकशाहीचा पराभव नाही का?

आज गरज आहे ती शिक्षण क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य देण्याची. शिक्षक भरती प्रक्रियेला त्वरित गती देणे, रिक्त जागा तातडीने भरून शाळांना पुन्हा सक्षम बनवणे आणि शिक्षणाचा दर्जा टिकवून ठेवणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. शिक्षक ही केवळ एक नोकरी नसून, ती समाज परिवर्तनाची बीजं पेरणारी संस्था आहे, याची जाणीव शासनाला ठेवावी लागेल.

**भारतातील ११.१६ लाख शिक्षक पदांची कमतरता (मार्च २०२४ पर्यंत)**
**प्रमुख राज्यांमधील रिक्त पदांची विभागणी**

**राज्याचे नाव अंदाजे रिक्त शिक्षक पदे (२०२३ अखेर)**

| | |
|---|---|
| उत्तर प्रदेश २.१५ लाख | राजस्थान ७५ ,000 |
| बिहार २.०७ लाख | ओडिशा ७२ ,000 |
| पश्चिम बंगाल १.१७ लाख | छत्तीसगड ६२ ,000 |
| महाराष्ट्र १.२५ लाख | आंध्रप्रदेश ५३ ,000 |
| मध्यप्रदेश ८९ ,000 | इतर राज्ये १.११ लाख |
| झारखंड ८२ ,000 | |

**शाळा बंद होण्याची स्थिती आणि वास्तवचित्र :**

भारतातील २०१० ते २०२० या दहा वर्षांच्या कालावधीत देशभरात तब्बल १.५ लाख शाळा बंद झाल्या आहेत. महाराष्ट्रात दरवर्षी सरासरी ३०० ते५०० शाळा बंद होत असल्याचा अहवाल राज्य शिक्षण आयुक्तालयाकडून प्रसिद्ध करण्यात आला आहे.

ही आकडेवारी चिंताजनक असून, ग्रामीण व वंचित भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा थेट परिणाम होत आहे. नीती आयोगाच्या २०२२ च्या शैक्षणिक गुणवत्तेच्या निर्देशांकानुसार, देशातील शाळांची पायाभूत स्थिती अतिशय दुबळी आहे. ३१% शाळांमध्ये शौचालये कार्यरत नाहीत, ४१% शाळांमध्ये सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध नाही, ५५ % शाळांमध्ये संगणक वा डिजिटल साधनांचा अभाव आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार इयत्ता ६वी पासून व्यावसायिक शिक्षण सुरू करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात केवळ १२ % शाळांमध्येच व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. त्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षकच उपलब्ध नाहीत, आणि व्यावसायिक शिक्षकांची पदे तर अस्तित्वातच नाहीत. यामुळे ही योजना केवळ कागदोपत्री मर्यादित राहिली आहे.

३ फेब्रुवारी २०२५ रोजी शासन निर्णय काढून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठी भाषेसंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र सरकारने राज्यातील सरकारी आणि निमसरकारी कार्यालयांमधील सर्व अधिकारी, कर्मचारी यांना फक्त मराठीत बोलणे बंधनकारक केले आहे. यासंदर्भात जारी केलेल्या शासन निर्णयात स्थानिक स्वराज्य संस्था, सरकारी महामंडळे आणि सरकारी अनुदानित आस्थापनांमध्ये देखील मराठी बोलणे सक्तीचे आहे.

२०२४ मध्ये मराठी भाषा धोरणात मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार व विकास होण्याच्या अनुषंगाने केवळ शिक्षणाचेच नव्हे तर सर्व लोकव्यवहाराचे होता होईल तेवढे मराठीकरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी संवाद, संपर्क आणि सर्व स्तरावरील व्यवहारासाठी मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे, असे एकीकडे म्हणतात, दुसरीकडे इंग्रजी माध्यम शाळांची संख्या २०१० मध्ये ७,००० वरून २०२३ मध्ये १३,५०० वर पोहोचली, तर मराठी माध्यम शाळांची संख्या १९,०००, वरून घटून १४,५०० वर आली आहे.

हे परिवर्तन केवळ भाषिक नसून, सामाजिक आणि सांस्कृतिक ओळखीवरही परिणाम करणारे आहे.याकडे सरकार कधी लक्ष देणार हा अत्यंत चिंतनाचा प्रश्न आहे.

१५ मार्च २०२४ ला संच मान्यतेच्या संदर्भात नवीन निर्देश जाहीर केले अनेक मराठी शाळा आणि मराठी शाळेतील शिक्षक अतिरिक्त व्हायला लागले. परंतु या मराठी शाळा जिवंत राहिला पाहिजे यासाठीच कोणते धोरण शासन अवलंबताना दिसत नाही, मराठी शाळा कशा बंद करता येईल याचा षडयंत्र सरकारच्या माध्यमातून सुरू असल्यास सातत्याने लोकांमध्ये चर्चा होत आहे.

Unified District Inormation System for Educatina Plus च्या अहवालानुसार २०१० ते २०२३ या कालावधीत शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या ३५% नी घटली, तर खासगी शाळांतील विद्यार्थी संख्या ४२ % नी वाढली. यामुळे शालेय शिक्षणाचे खाजगीकरण वाढत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

याच काळात भारत शिक्षणावर GDP च्या केवळ २.९ % इतका खर्च करतो, जे ठएढ ने शिफारस केलेल्या ६ % च्या निकषाच्या निम्म्यापेक्षाही कमी आहे. या सर्व आकडेवारीवरून स्पष्ट होते की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी अत्यंत मर्यादित स्वरूपात होत आहे.

शिक्षकांची कमतरता, शाळांची पायाभूत सुविधांची दुर्दशा, स्थानिक भाषांचे दुर्लक्षण, शाळा बंद होण्याची वाढती प्रवृत्ती आणि शिक्षणाचे आक्राळविक्राळ खाजगीकरण ही सर्व अत्यंत गंभीर समस्या आहेत.

शैक्षणिक धोरण हे केवळ घोषणापत्र न राहता सामाजिक न्यायाचे प्रभावी हत्यार असले पाहिजे, ही आज देशवासीयांची रास्त आणि टोकदार अपेक्षा आहे. भारताच्या शैक्षणिक धोरणाला नव्या दृष्टिकोनाने तपासण्याची गरज आहे.

शिक्षणाच्या प्रश्नांमध्ये सामान्य नागरिक, पालक, शिक्षक, समाजशास्त्रज्ञ आणि विधिज्ञ यांचा सहभाग हवा. शासनाच्या प्रत्येक निर्णयावर प्रश्न विचारणारे, अभ्यास करणारे आणि सजग राहणारे नागरिक निर्माण झाले, तरच ख?या अथार्ने शिक्षण लोकशाहीचे माध्यम बनू शकेल. अन्यथा ही धोरणं केवळ घोषणाच राहतील.

# चैतन्याची सळसळती मशाल अरूणभाऊ अडसड

आज आदरणीय भाऊंचा वाढदिवस भाऊ आपणांस वाढदिवसाच्या शुभेच्छा....

पाण्यालाही पेटवणारा वक्ता,चैतन्याची सळसळती मशाल, प्रगल्भ विचार दिलदार मन रोखठोक भूमिका, प्रशुब्ध मनाची निशब्द हूंकार म्हणजे आदरणीय भाऊ विदर्भाची मुलख मैदानी तोफ, विकासाचा महामेरू, विदर्भाचा बुलंद आवाज, कार्यकर्त्यांना कार्यकर्ता नव्हे तर स्वतःच्या लेकराखेरीज सदैव पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे व्यक्तीमत्व म्हणजे आदरणीय अरूणभाऊ अडसड..



अरूणभाऊ अडसड विदर्भाचा बुलंद आवाज म्हणून ख्याती प्राप्त. ही ख्याती नव्हे तर तमाम कार्यत्यांनी भाऊंना घातलेली प्रेमळ साद आहे. ज्या व्यक्तीमत्वाने कित्येकांना घडवल कित्येकांना तारल कित्येकांची भवितव्ये घडवली. कारण सदैव मनी एकच विचार कार्यकर्ता हा कार्यकर्ता नसून आपल्याच कुटूंबातील सदस्य आहे अशी ज्यांची वागणूक, सर्वांस पोटास लावणे आहे, या छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रल्गभ विचाराचा हाच वारसा अंगी तेवत समाजात प्रत्येक घटकांत वावरतांना भाऊंची हि भूमिका आपणांस बघावयास मिळते.

*फिटे अंधाराचे जाळे*
*झाले मोकळे आकाश..*


बस याच काळ्या किभ्भीन्न अंधारात प्रकाशाचा एक ओघ एक प्रकाशाचा किरण स्वतःच बुलंद अस व्यक्तीमत्व निर्माण करणारा माणूस म्हणजे भाऊ, साधं आणि सरळ म्हणायचं झाल्यास दिवाणखान्यात लोक निरोपयोगी मनी प्लॅन्टला पाणी घालतात पण त्याच घराच्या त्याच दिवाणखान्याच्या गॅलरीमध्ये संबंध ताकतिनीशी चारही खाने चित करीत त्या सिमेंटच्या भिंतीला जणू भूकंपाचा हादरा बसावा त्याप्रमाणे सिमेंट फोडून पिंपळाप्रमाणे स्वबळावर स्वतःच एक आगळ वेगळ अस्तित्व निर्माण करत वरती येतो. ज्याला खत पाणी कोणीही घातलेल नसत तरी तो प्रस्थापित भिंती फोडून जगाला दाखवतो आपल स्वतंत्र अस्तित्व.

आता चंदेरी दूनियेचा काळ आहे. ज्यांना देश सुद्धा त्यावेळी स्विकारायला तयार नव्हता. आता असे कितीतरी लोक सांगतील दूनियेला वेड लावणारे, आता चालतीचा काळ आहे तो पडतीचा काळ होता आणि त्याकाळात विदर्भात ज्याच अस्तित्व नव्हतं ज्याच नावलौकिक विदर्भात उदयास नव्हतं त्याकाळात धामणगाव तालुक्यातच नव्हे तर संबंध विदर्भ आपल्या वाणीने, तेजोमय वृत्तीने, अथक संघषार्तून भारतीय जनता पक्षाचे नेतृत्व स्विकारत एक अशी कार्यकर्त्यांची माळ त्यांनी गुंफली की ती तुटता तुटेना. अखेर खरा विदभार्चा बुलंद आवाज उदयास आला.

त्या काळी भाऊंनी धुरा सांभाळत पक्षाला ज्या उच्चांकावर नेऊन ठेवले की जिथून आता परतीची तमा नाही. माझ्या शब्दांत भाऊंच वर्णन म्हणजे भारदस्त व्यक्तीमत्व, अत्यंत महत्वकांशी, धुरंधर राजकारणी, प्रभावी नेतृत्व आणि वकृत्वाने जनसमुदायाला आपलस करणारे व्यक्तीमत्व आमचे प्रितृतुल्य अरूणभाऊ अडसड.

प्रत्येक विजयात संघर्ष अन संघर्षात विजय म्हणजे भाऊ... प्रवाहाच्या विरूद्ध दिशेने पोहण्याच धाडस करून प्रवाह बदल्याणी अफाट ताकत म्हणजे भाऊ... आपल्या कार्यकर्त्यांना भरल्या अंतकरणाने सांगतात की आता रडायचं नाही तर लढायचं हा प्रबळ विश्वास आत्मविश्वास म्हणजे भाऊ... कार्यकर्त्यांना पाठीवर शाबासकीची थाप मारली की त्याला देवरूपी आशीवार्दाचा भास म्हणजे भाऊ... दुर्भाग्याच रूपांतर भाग्यात करणारा परिवर्तनवादी विचार म्हणजे भाऊ... कधी अडवाणी कधी अटलजी तर कधी मोदीजींच्या खांद्यास खांदा लावून लढणारा माणूस म्हणजे भाऊ... बहिरमच्या यात्रेत शेतकऱ्यांसाठी गोळ्या झेलणारा माणूस म्हणजे भाऊ... शिमला कराराच्या वेळेस तुरूंगवास भोगणारा माणूस म्हणजे भाऊ... साधू संताच्या चरणी नतमस्तक होणारा माणूस म्हणजे भाऊ... सरतेशेवटी कधी काळ्या पैशाच्या अभावी तर कधी स्वतःच मोठ्या केलेल्या आपल्याच माणसांच्या फितुरीपणानी हरणारा माणूस म्हणजे भाऊ... ज्याची किर्ती आणि यशोगाथा आज मला लिहताना कुठे आनंद तर अश्रू अनावर होतात तर शब्द अपूरे पडतात असे हे अफाट व्यक्तीमत्व म्हणजे भाऊ आदरणीय अरूणभाऊ...

भाऊ आपणांस जुना धामणगाव देशमुख परिवाराकडून वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दीक हार्दीक शुभेच्छा....



**वैभव मीनाक्षी सुभाषराव देशमुख**
**जुना धामणगाव, जि.अमरावती.**
**एक कार्यकर्ता**
**९६६५७९६१२४**

# सामान्य माणूस आणि विश्व बँक

सामान्य माणसाला बँक हा शब्द फक्त बचतीचे पासबुक त्यातील सरकारी योजनेचे खात्यात जमा झालेले पैसे, मासिक पगार, पेन्शन, ठेवीवरील व्याज, आवर्त ठेव, गृह कजार्चा हप्ता एवढ्याच पुरता शक्यतो मर्यादित असतो. वर्ल्ड बँक म्हणजेच विश्व बँक याविषयी तर वर्तमानपत्रातून किंवा वृत्तवाहिन्यांवरून कानावर पडते तेवढेच. आपल्या दैनंदिन आयुष्याशी याचा काय संबंध? याचा आपल्याला काय उपयोग असे अनेक वेळा प्रश्न पडतात. १ जुलै विश्व बँकेच्या स्थापना दिनानिमित्त हा लेख सामान्य माणूस आणि विश्व बँक यांच्यातील नात्याचा वेध घेण्यासाठी लिहीत आहे. सदर लेख लोकांच्या अधिकारांविषयी जागरूक करतो. त्याचा उद्देश कोणावरही टीका नसून आपल्या लोकशाही प्रक्रियेचा भाग मजबूत करणे आहे .

--------------------

विश्व बँकेची स्थापना १ जुलै १९४४ रोजी अमेरिकेतील ब्रेटन वुड्स या शहरात झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेवेळी झाली. या परिषदेत भारतासह ४४ देशांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला होता.

बँकेचा मूळ हेतू दुसऱ्या महायुद्धानंतर नुकसान झालेल्या देशांच्या पुनर्बांधणीसाठी आर्थिक मदत करणे हा होता. ही संस्था आंतरराष्ट्रीय पुनर्बांधणी आणि विकास बँक (IBRD) म्हणून ओळखली जात होती. नंतर ती विश्व बँक गट म्हणून विकसित झाली ज्यामध्ये आज खालील पाच संस्था आहेत. आय बी आर डी, आय डी ए, आयएफसी, एम आय जी ए, आणि आयसीएसआयडी.

आज विश्व बँक विकसनशील देशांना कर्ज, ,तांत्रिकसहाय्य, ज्ञान व धोरणात्मक मार्गदर्शन पुरविते. बँकेचे मूळ उद्दिष्टे दारिद्र्य निर्मूलन, शाश्वत विकास, आरोग्य, शिक्षण, पाणी,ऊर्जा, पायाभूत सुविधा, पर्यावरण, संरक्षण यांना मदत करणे हा आहे. आज एकूण १८९ देश विश्व बँकेचे सभासद आहेत.

भारत २७ डिसेंबर १९४५ रोजी विश्व बँकेचा अधिकृत सदस्य बनला. सदस्यत्वानंतर भारताने १९४९ मध्ये पहिले कर्ज रेल्वे पुनर्बांधणीसाठी घेतले. सन २०२४ अखेरपर्यंत भारताने विश्व बँकेकडून एकूण सुमारे १०५ अब्ज डॉलर इतकी मदत कर्ज व अनुदानासह घेतली आहे. ग्रामीण रस्ते, जलसंपदा व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण, शहरी पायाभूत सुविधा, हरित ऊर्जा ,डिजिटल प्रकल्प इत्यादीसाठी हे कर्ज घेतले आहे.



**संदीप यशवंत मोने**
**8698779546**

विश्व बँक देशांना कर्ज देताना काही अटी व सामाजिक जबाबदा?या यांची बंधनेही घालते. ज्यात पर्यावरण संरक्षण, पुनर्वसित नागरिकांचा हक्क, पारदर्शक प्रशासन, स्थानिक जनतेचा सहभाग अशा प्रमुख बाबी असतात जे पाळणे कर्ज घेतलेल्या देशाला बंधनकारक असते. प्रकल्प मंजूर करताना प्रभावित नागरिकांवर काय परिणाम होईल, पर्यावरणावर कसा परिणाम होईल हे सर्व पैलू तपासले जातात. हे प्रकल्प अनेक वेळा स्थानिक जनतेच्या जीवनावर, पर्यावरणावर व उपजीविकेवर परिणाम करू शकतात. हे परिणाम नकारात्मक ठरत असतील तर जनतेला तक्रार नोंदविण्याचा अधिकार असतो.

कोणत्याही सार्वजनिक प्रकल्पामुळे नुकसान झाल्यास किंवा अन्याय होत असल्यास प्रकल्पग्रस्तास न्याय मागण्यासाठी शासन व न्यायपालिका या दोन घटनात्मक मार्गांचा अवलंब करता येतो. मात्र या तक्रारीच्या निवारणाला नेहमीच ठोस काल मर्यादा नसते. न्यायालयीन प्रक्रिया वर्षानुवर्षे चालू शकते. प्रशासकीय यंत्रणांमध्येही अनेक वेळा विलंब होऊ शकतो. अशावेळी विशिष्ट कालमर्यादेनुसार काम करणारी व पारदर्शकतेचा आग्रह धरणारी विश्व बँकेची जी आर एस प्रणाली (GRS) एक प्रभावी पर्याय ठरू शकते.

स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवरील अनेक प्रकल्पांमध्ये तक्रारीचे निवारण केवळ प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रियेवर अवलंबून रहात नाही. अनेकदा त्यावर राजकीय समीकरणांचा ही प्रभाव जाणवतो. विश्व बँकेकडून घेतलेले कर्ज सरकारचे असले तरी त्याची परतफेड थेट सरकारी महसुलातून म्हणजेच नागरिकांनी भरलेल्या करातून केली जाते. मग तो थेट कर असो किंवा अप्रत्यक्ष कर असो.

या माध्यमातून जमा होणारा निधी हे कर्ज फेडण्यासाठी वापरला जातो . त्यामुळे या प्रकल्पाबाबत विशेषतः त्यांच्या अंमलबजावणीतील त्रुटींबाबत प्रश्न विचारण्याचा अधिकार सामान्य जनतेचा आहेच.

तक्रार, चौकशी किंवा पुनर्विचारासाठी उपलब्ध असलेला विश्व बँकेचा हा तिसरा दरवाजा अजूनही अनेकांसाठी अपरिचित आहे. या दरवाजाचे नाव आहे वर्ल्ड बँक ग्रीव्हियन्स रिड्रेस सिस्टीम. या प्रणालीचा जन्म १० वर्षांपूर्वी झाला.

सन २०२४ या वर्षात जागतिक पातळीवर ७२३ तक्रारी या संस्थेस प्राप्त झाल्या. सन २०२३ च्या तुलनेत यात सुमारे ३४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. याचाच अर्थ या तक्रार प्रणालीची विश्वासार्हताही वाढली आहे .

जागतिक बँक, कर्ज घेणारे देश आणि बाह्य भागधारकांच्या सक्रिय सहभागामुळे तक्रारींचे निराकरण करण्यात जीआरएसला यश प्राप्त झाले आहे. यामुळे प्रकल्पग्रस्त आणि जागतिक बँकेमध्ये विश्वास निर्माण झाला आहे . जीआरएस प्रणाली ही जागतिक बँकेकडे थेट तक्रारी करण्याचा एक मार्ग आहे .

तुम्ही grievances @worldbank.org या संकेतस्थळावर तुमची तक्रार नोंदवू शकता. तक्रार कोणत्याही भाषेत करता येते. एक व्यक्तीही तक्रार नोंदवू शकते. नोंदविलेल्या तक्रारीबाबत पूर्ण गोपनीयता बाळगली जाते. प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे मूल्यांकन करण्यात येते. जीआरएस कडे प्राप्त झालेल्या अनेक तक्रारींचा संबंध हा भूसंपादन प्रक्रियेशी असतो.

येथे केवळ जागतिक बँकेने कर्ज दिलेल्या प्रकल्पांची तक्रार स्वीकारण्यात येते. जे प्रकल्प होऊ घातले आहेत किंवा त्यांचे काम चालू आहे तसेच १५ महिन्यापेक्षा कमी काळाकरिता बंद असलेल्या प्रकल्पांचीच दखल घेण्यात येते. तक्रार स्वीकारल्यानंतर प्रकल्पाचा आढावा घेण्याकरिता पथक नेमण्यात येते.

सदरचे पथक तक्रारींची गंभीर दखल घेऊन काम करते. एकाच प्रकल्पाबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्यास जागतिक बँक संबंधित देशाच्या सरकारला जाब विचारून योग्यती कार्यवाही करावयास भाग पाडते . काही तक्रारींची दखल घेऊन जागतिक बँकेने प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याच्या दृष्टीने अतिरिक्त भरपाई मिळवून दिली आहे.

कोणतेही प्रकल्प जाहीर झाल्यावर जमीन अधिग्रहणाबाबत प्रकल्पग्रस्तांना सरकारकडून कळविले जाते. तसेच त्यांच्या काही हरकती असल्यास त्याची नोंद करण्यात येते. सरकार प्रकल्पग्रस्तांच्या या हरकतींवर सुनावणी घेते. हीच वेळ साधून प्रकल्पग्रस्तांनी सरकारने सदर प्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून कर्ज घेतले आहे का? याची विचारणा करायला हवी. त्याबाबतची कागदपत्रांची मागणी करायला हवी. जागतिक बँकेला तक्रार करणे म्हणजे आपल्या देशाचे विषय बाहेर चव्हाट्यावर आण्यासारखे बिलकुल ठरणार नाही. तो आपला अधिकार आहे. शेवटी कर्ज देणारे तेच आहेत. त्यांच्यापर्यंत या गोष्टी पोहोचायलाच हव्यात. हे कळविल्यामुळे विश्व बँकेला काही आवश्यक ध्येयधोरणे बदलण्यास ही मदत मिळेल.

आपण पुढे जात असताना आपल्या देशात, राज्यात जिल्ह्यात आणि आपल्या तालुक्यात विश्व बँकेच्या निधीतून चालू असलेल्या प्रकल्पांची माहिती ठेवणे आणि सतर्क राहणे अत्यंत गरजेचे आहे .विकास आवश्यक आहे पण तो सर्वसमावेशक, पारदर्शक असला पाहिजे. खरा प्रश्न विकास व्हावा का? असा नसून तो कसा व्हावा असा आहे .

हे लक्षात ठेवा खरा विकास म्हणजे फक्त रस्ते किंवा पूल बांधणे नव्हे तर विश्वास, न्याय आणि सर्वांसाठी संधी निर्माण करणे हा आहे .तुमचा आवाज महत्त्वाचा आहे त्याचा योग्य वापर करा आणि बदल घडवा. तर बघा हा विश्व बँकेचा तिसरा दरवाजा ठोठावून.

■ ■ ■

# नाश्त्यात बनवा आरोग्यदायी आणि चविष्ट पदार्थ



नाश्ता हा दिवसातला सगळ्यात पहिला आहार असतो. दिवसाची सुरूवात करताना नाश्ता हा पोटभर करायचा असतो आणि त्याचवेळी पौष्टिक असणं फार महत्वाचं आहे. अशातच आपण रोज असा नाश्ता करावा जो आपल्या शरीराला आवश्यक सर्व पोषण त्यात मिळतील. त्यातच रोज नाश्ताला काय बनवायचं हे प्रत्येक महिला रोजचा प्रश्न पडत असतो. त्यात घरातील मंडळी हे दररोज नाश्त्यात काहीतरी नवीन असेल तर सगळ्यांनाच ते खायला खूप आवडतं. त्यात घरच्यांना काहीतरी पौष्टिक खाऊ घालावं असं महिलांना वाटत असतं.

१. जर काही हेल्दी खायचे असेल आणि ते पदार्थ चविष्टही हवे असेल, तर ओट्स विथ फ्रूट्स अॅड सीड्स पासून तयार नाश्ता तुमच्यासाठी एक चांगला पर्याय आहे. ते बनवण्यासाठी ओट्स ५-७ मिनिटे दुधात उकळवा.

ते थंड झाल्यावर त्यावर बारीक तुकडे केलेली फळे, चिया/अळशीचे बिया आणि ड्रायफ्रुट्स मिक्स करा. चव वाढवण्यासाठी तुम्ही थोडे मध देखील त्यात टाकू शकता. हा पौष्टिकतेने समृद्ध नाश्ता पचनापासून ते ऊर्जा वाढवण्यापर्यंत सर्व गोष्टींसाठी खूप चांगला आहे.

२. ग्रीक दही पार्फे हा पदार्थ नाश्त्यात खाण्यासाठी एक अतिशय चविष्ट आणि आरोग्यदायी पर्याय आहे. उन्हाळ्यात ग्रीक दही पार्फे हा पदार्थ खाणे आणखी फायदेशीर आहे. यासाठी प्रथम एका ग्लासमध्ये दह्याचा थर टाका. नंतर ग्रॅनोला, नंतर फळे आणि वरून त्यावर मध आणि सीड्स टाका. त्यानंतर हे ५ मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा आणि सर्व्ह करा. उच्च प्रथिने, हेल्दी फॅट आणि फायबरने भरलेला हा नाश्ता चवीलाही अद्भुत आहे.

३. होल ग्रेन टोस्टसह व्हेजिटेबल ऑम्लेट बनवण्यासाठी, अंडी फेटून त्यात चिरलेल्या भाज्या, मीठ आणि मिरपूड टाका. नॉन-स्टिक पॅनवर तेल लावा आणि ऑम्लेट बनवा. टोस्टसोबत सर्व्ह करा. अंडी प्रथिनांचा एक उत्तम स्त्रोत आहे तर ब्रेडमध्ये फायबर असते. पौष्टिकतेने समृद्ध हा नाश्ता चवीलाही खूप चांगला आहे.


४. पॅनकेक्स फक्त मुलांनाच आवडत नाहीत तर मोठ्यांनाही आवडतात. ते हेल्दी पद्धतीने बनवण्यासाठी तुम्ही त्यात बेसन वापरू शकता. ते बनवण्यासाठी तुम्हाला बेसनाच्या पिठात कांदा, टोमॅटो आणि हिरवी मिरची मिक्स करा आणि त्यात हळद, मीठ आणि जिरे टाकूल चांगले मिक्स करा. थोडे तेल लावून ते तव्यावर टाकून शिजवून दोन्ही बाजुंनी चांगले भाजा. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी हा कमी कार्ब आणि हेल्दी फॅटचा नाश्ता चांगला आहे.

५. मल्टीग्रेन टोस्टवर बनवलेला अॅव्होकॅडो देखील खूप चविष्ट असतो. हा नाश्ता तयार करण्यासही कमी वेळ लागतो. यासाठी, तुम्ही फक्त अॅव्होकॅडो मॅश करा आणि त्यात मीठ, लिंबू आणि मिरची टाका. आता हे मिश्रण टोस्टवर पसरवा. त्यात हेल्दी फॅट असतात जे हृदयाच्या आरोग्यासाठी आणि वजन कमी करण्यासाठी फायदेशीर असतात.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## आंधळं दळतय अन..!

**आंधळ दळतय**
**कुत्रं पिठ खातय**
**शासकीय योजनेचं**
**हे असच असतय ... !**
**रेशनचं धान्य असो की**
**लाडकी बहीण योजना**
**पात्र लाभार्थ्यांच्या पदरात**
**पडतेय का ते पहा ना?**

**योजनांचा हेतू खरचं**
**कितपत होतोय सफल**
**पुनर्मुल्यांकनाची शासन**
**कां घेत नाही दखल?**

# उल्हासनगरमध्ये काँग्रेसला झटका

## माजी उपमहापौर ज़या साधवानी यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**उल्हासनगर, दि. ३० : प्रतिनिधी**

स्थानिक काँग्रेस मधील गटबाजी व अंतर्गत वादा ला कंटाळून काँग्रेसच्या माजी उपमहापौर व प्रदेश काँग्रेस महिला उपाध्यक्ष जया साधवानी आणि उल्हासनगर काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन साधवानी यांनी त्यांच्या समर्थका सह शिवसेनेत प्रवेश केल्याने उल्हासनगर काँग्रेस ला मोठा झटका लागला असून येत्या काही दिवसात काँग्रेस आणि इतर पक्षातून काही कार्यकर्ते व पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती शिवसेना शिंदे गटाचे प्रदेश प्रवक्ते किरण सोनवणे यांनी दिली आहे. १९९२ साली पहिल्यांदा उल्हासनगर नगरपालिकेच्या निवडणुकीत जया साधवानी काँग्रेसच्या तिकिटा वर भारी मतांनी निवडून आल्या होत्या. १९९६ साली महापालिका स्थापना झाल्या नंतर पुन्हा नगरसेविका झाल्या असुन २००२ साली झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस कडे फक्त सात नगरसेवक असताना साधवानी यांनी महापौर आणि उपमहापौर पद खेचून आणले होते. त्यावेळी मालती करोतिया महापौर तर जया साधवानी उपमहापौर झाल्या होत्या. काँग्रेसला उतरती कळा लागली असताना देखील सौ . साधवानी यांनी काँग्रेस मधुन बाहेर पडण्याचा कधी ही विचार केला नाही, मात्र गेल्या काही महिन्या पासून स्थानिक काँग्रेस मधील गटबाजी, कमजोर नेतृत्व, नैराश्य या अपूर्ण कामगिरी ला कंटाळून काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेताना अंतःकरण भरून आले असल्याची प्रतिक्रिया सौ .जया साधवानी यांनी दिली आहे . त्यांनी काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समक्ष मुक्तागिरी बंगल्यात आयोजित छोटेखानी कार्यक्रमात शिवसेनेत प्रवेश केला. त्यांच्या सोबत त्यांचे पती माजी नगरसेवक मोहन साधवानी समवेत ॲड . पवन साजनानी, प्रसिद्ध सिंधी गायक राजेश जुरांनी यांची पत्नी पूजा जुरानी, डॉक्टर एसोशियशन चे अध्यक्ष प्रसिद्ध डॉक्टर नरेंद्र पंजवानी यांची पत्नी जयवीता पंजवानी यांनी प्रवेश केला आहे . या वेळी शिवसेना महानगर प्रमुख राजेंद्र चौधरी , मनोज शिंदे उपस्थित होते. दरम्यान जया साधवानी यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याने काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे चे अनेक कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.



# आणीबाणी स्मृतीदिनी समाजवादी कामगार संघटनांचा लढण्याचा निर्धार

## ■ जॉर्ज फर्नांडिस यांच्या संघर्षाच्या जागवल्या आठवणी
## ■ शरद पवार यांच्या हस्ते जॉर्ज यांच्या लढाऊ सहकाऱ्यांचा गौरव

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

जॉर्ज फर्नांडिस यांचे खऱ्या अर्थाने स्मरण करायचे असेल तर, काय वाटेल ती किंमत देऊ. पण, हा देश संसदीय लोकशाहीवादी देश म्हणून अखंड राहील. त्यासाठी जे करावे लागेल, ते करण्याची तयारी आम्हा सगळयांची राहील, या शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे अध्यक्ष आणि खासदार शरद पावर यांनी मुंबईतील मेळाव्यात अघोषित आणीबाणीवर हल्ला चढवला.

मुंबई लेबर युनियनच्या पुढाकाराने आणीबाणीच्या पन्नासीबद्दल मुंबईतील समाजवादी कामगार संघटनांचा संयुक्त मेळावा के. सी. कॉलेज येथे आयोजित करण्यात आला होता. तेव्हा शरद पवार बोलत होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी हिंद मजदूर किसान पंचायतचे राज्य अध्यक्ष आणि समाजवादी नेते कपिल पाटील होते. मुंबई लेबर युनियनचे जनरल सेक्रेटरी संजीव पुजारी या मेळाव्याचे निमंत्रक होते. आणीबाणी इंदिरा गांधींनी लावली होती. मात्र पराभव झाल्यानंतर इंदिरा गांधींनी देशाची क्षमा मागितली. ही गोष्ट विसरता कामा नये. नंतरच्या काळात जनतेने त्यांना पुन्हा संधी दिली. आणि चित्र बदलले होते, असेही शरद पवार यांनी यावेळी पुढे ब बोलताना आवर्जून नमूद केले.



समाजवादी नेते कपिल पाटील यांनी यावेळी सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण, कष्टकरी कामागारांच्या अन्य प्रश्नांवरून जोरदार प्रहार केला. जॉर्ज यांना मानणाऱ्या समाजवादी संघटना पुन्हा एक झाल्या आहेत. बेस्ट आणि सफाई कामगारांच्या कंत्राटीकरणाने खाजगीकरणाला सुरवात झाली आहे. मुंबई महानगरपालिकेचे खाजगीकरण रोखण्यासाठी त्या सर्व संघटना रस्त्यावर उतरतील, असा इशाराही कपिल पाटील यांनी दिला. मराठीचा कैवार घेणारे पक्ष सत्तेवर असताना कष्टकरी मराठी माणूस मुंबईतून बदलापूरला हाकलला गेला. सरकार कंत्राटीकरण करून कामगार, कष्टकऱ्यांना देशोधडीला लावत आहे. त्याविरोधात उभे रहावे लागेल. जॉर्ज फर्नांडिस म्हणजे संघर्ष. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन लढण्याचा निर्धार करुया, असेही कपिल पाटील यांनी म्हटलं. आणीबाणीत तुरुंगवास भोगलेले आणि बडोदा डायनामाईट केसमधील जॉर्ज यांच्या सहकाऱ्यांचा यावेळी जॉर्ज फर्नांडिस जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. शरद पवार यांच्या हस्ते सुभाष मळगी, पद्मनाभ शेट्टी, विजय नारायण सिंह, मोतीलाल कनोजिया, देवी गुजर, शंकर साळवी, शंकर शेट्टी, फेड्रिक डिसा, संजीव पुजारी, सुरेश ठाकूर यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान केला गेला.

या मेळाव्यात राज्य सरकारी कर्मचारी समन्वय समितीचे नेते विश्वास काटकर, माजी खासदार अनिल हेगडे, म्युनिसिपल मजदूर युनियनचे सरचिटणीस अशोक जाधव, वामन काविस्कर, दी म्युनिसिपल युनियनचे रमाकांत बने, बेस्ट कर्मचाऱ्यांचे नेते रंगनाथ सातवसे, एसटी कर्मचाऱ्यांचे नेते हनुमंत ताटे, शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक भारतीचे अध्यक्ष नवनाथ गेंड, जॉर्ज यांचे सहकारी अभिषेक रंजन, क्रांती प्रकाश, एस. एस. मेहरा, शब्बीर अहमद विद्रोही, घरकामगारांच्या नेत्या मधू बिरमोळे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नेते शिवाजी खांडेकर, एचएमकेपीचे पी. व्ही. फडतरे, प्रफुल्ल म्हात्रे, बीएमसी कर्मचारी नेते रमेश भुतेकर, आरएमयूचे राजेंद्र सिंह यांच्यासह अनेक कामगार नेते, कार्यकर्ते उपस्थित राहिले होते. छात्र भारतीचे राज्य अध्यक्ष रोहित ढाले यांनी सूत्रसंचालन केले.

# महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेमध्ये पर्यावरणस्नेहींनी गाठला 5 लाखांचा टप्पा

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडणाऱ्या लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेमध्ये ५ लाखांचा टप्पा गाठला आहे. या योजनेत सोमवार (दि. ३०)पर्यंत सहभागी झालेल्या ५ लाख ३ हजार ७९५ वीजग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या मोबाईल ॲप व www.mahadiscom.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी केले आहे. वार्षिक १२० रूपयांचा फायदा - महावितरणकडून पर्यावरणपूरक 'गो-ग्रीन' योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे. पूर्वी ही सवलत प्रत्येकी १० रुपये प्रत्येक बिलामध्ये मिळत होती. पर्यावरणस्नेही ५ लाख ग्राहकांचा प्रतिसाद - वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. या योजनेत आतापर्यंत ५ लाख ३ हजार ७९५ पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या ग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार ४०० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. यामध्ये (कंसात आर्थिक फायदा रूपयांत) पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक २ लाख १ हजार २३३ (२.४२ कोटी), कोकण- १ लाख १३ हजार २५४ (१.३६ कोटी), उत्तर महाराष्ट्र- ७० हजार २२६ (८४.२७ लाख), विदर्भ- ६३ हजार ७३१ (७६.४७ लाख) तसेच मराठवाड्यामध्ये योजनेत सहभागी ५५ हजार ३५१ वीजग्राहकांना ६६ लाख ४२ हजार रूपयांचा वार्षिक फायदा होत आहे. गो-ग्रीन योजनेचे फायदे - महावितरणच्या संगणक प्रणालीमध्ये वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही वीजबिल तात्काळ ऑनलाईनद्वारे भरणे सोयीचे झाले आहे. वीजग्राहकांना इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येते. यासह महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे असे एकूण १२ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

# शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने खारघर मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान संपन्न



**पनवेल, दि. ३० : प्रतिनिधी**

खारघर हे शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. या परिसरात बहुतांश नामांकित विद्यालय आणि महाविद्यालय आहेत याचमुळे येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना मला आनंद होत असे प्रतिपादन माजी आमदार बाळाराम पाटील यांनी केले ते काल दिन दिनांक २८ जून २०२५ रोजी खारघर मधील उत्कर्ष हॉलमध्ये खारघर मधील दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्यात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायणशेठ घरत, पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, शिवसेनेचे जिल्हा अध्यक्ष शिरीष दादा घरत, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती डॉक्टर दत्तात्रय पाटील, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवेंद्र मढवी, शेकाप रायगड जिल्हा महिला सहसचिव तेजस्विनी घरत, माजी आमदार दत्तूशेठ पाटील शिक्षण संस्थेचे सीईओ रा. गो. पाटील, खारघर शहर अध्यक्ष अशोक गिरमकर, नरेश पाटील सर आदी मान्यवर उपस्थित होते.

या सदर कार्यक्रमात दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी माननीय डॉक्टर सुनील धापटे यांचा मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्यांनी आपल्या भाषणात सांगितले पालकांनी मुलांवर कोणतेही बंधन न लादता त्याची आवड कशामध्ये आहे हे लक्षात घेऊन त्याला प्रोत्साहन द्यावे जेणेकरून तो त्या कलेमध्ये प्राविण्य मिळवेल. विद्यार्थ्यांनी आपल्या कामाचे योग्य रीतीने नियोजन केले तर यश हे त्यांना हमखास मिळेलच.

यावेळी खारघर मधील इंग्रजी माध्यमाच्या शाळा, सीबीएससी बोर्ड, मराठी माध्यमाच्या शाळा, आणि महाविद्यालया मधून आलेल्या प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या विद्यार्थी गुणगौरव सन्मान सोहळयासाठी जगदीश घरत, प्रविण कदम, महेंद्र सोनावणे,जयेश कांबळे, प्रतीक ढोबळे आदींनी विशेष मेहनत घेतली.

# तेरा वर्षांपासून फरार मारेकरी अखेर जेरबंद

**भाईंदर, दि. ३० : प्रतिनिधी**

भाईंदर पूर्वेकडील साईबाबा नगर येथे २०१२ साली एका ३४ वर्षीय इसमाची अतिशय निर्घृणपणे हत्या करून पसार झालेल्या मारेकऱ्याला गुन्हे शाखा १ काशिमीराच्या पथकाने दिल्ली येथून अटक केली आहे. गोविंदकुमार उर्फ जगतनारायण चौधरी असे मारेकऱ्याचे नाव आहे.

भाईंदर पूर्वेकडील साईबाबा नगर येथे राहणाऱ्या ३५ वर्षीय चौधरी याची त्याच्या राहत्या घरी इलेट्रीक वायरने गळा आवळून, तोंडावर चिकटपट्टी बांधून, खलबत्त्याच्या लोखंडी दांड्याने डोक्यावर गाव करतर चाकूने छाती, पोट, तोंडावर वार करून अतिशय निर्घृणपणे हत्या केली होती. याप्रकरणी नवघर पोलिसांनी चौधरी यामारेकऱ्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. मात्र, हत्या केल्यानंतर मारेकरी पसार झाला होता. गेली तेरा वर्षे तो बिहार, दिल्लीसह विविध राज्यात स्वतःची ओळख लपवून राहत होता.

वरिष्ठांच्या आदेशानंतर गुन्हे शाखा 1 च्या काशिमीरा युनिटच्या पथकाने तपास सुरु केला होता. तांत्रिक माहिती आणि खबऱ्यांच्या मदतीने पथकाने गोविंदकुमार चौधरीचा ठावठिकाणा शोधून काढला. त्यानंतर दिल्ली येथून त्याला अटक केली. पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, उपायुक्त अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा येथील पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन सानप, पोलीस उपनिरीक्षक उमेश भागवत, सहाय्यक फौजदार संदीप शिंदे, अशोक पाटील, अविनाश गर्जे, संजय शिंदे,संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, पोलीस हवालदार मनोज चव्हाण, सचिन हुले, सुधीर खोत, अश्विन पाटील, सनी सुर्यवंशी, प्रशांत विसपुते, गौरव बारी, सौरभ इंगळे, धिरज मॅगाणे, सायबर गुन्हे शाखेचे संतोष चव्हाण सायबर यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

## आज का अंदाज

मंगळवार १ जुलै २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| ४९९ | १५९ | १५० | २७० | २३८ | ११२ | १७७ | २६० |
| ३९० | २४९ | २६८ | ४६९ | ५८० | २२० | ४४७ | ४५९ |
| २०० | ३५७ | ३३० | ३७९ | ३३७ | ३३८ | ३६६ | ३५० |
| २० | ५० | ६४ | ९४ | ३२ | ४२ | ५१ | ८९ |
| २१ | ५१ | ६३ | ९३ | ३६ | ४६ | ५७ | ८७ |
| २७ | ५७ | ६८ | ९८ | ३० | ४० | ५९ | ८९ |

**१ जुलै : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४६ | ७६ |
| ०५ | १५ | ४९ | ७९ |
| ०८ | १८ | ४३ | ७३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## आम्हा तिघांना फन मस्केटियर्स म्हणतात

**मुंबई, ३० जून :** सोनी सबवरील तेनाली रामा ही मालिका त्यातील सुरस कथांमुळे प्रेक्षकांना आवडते आहे. सुजाणता आणि बुद्धीचातुर्य हा मालिकेचा मूलभूत गाभा असला, तरी ही मालिका तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज), लक्ष्मणाप्पा (कुणाल करण कपूर) आणि कोतवाल (निखिल आर्या) या त्रिकुटासह प्रेक्षकांना एका रोमांचक शोध प्रवासावर घेऊन जाते. पारंपरिक पठडीचे बुद्धीचातुर्य आणि तर्कनिष्ठा वापरुन हे तिघे खूप गुंतागुंतीची प्रकरणे सोडवताना दिसतात.

पण, जर कॅमेऱ्याच्या मागे पाहिलेत तर एक अगदी वेगळेच दृश्य तुम्हाला दिसेल. इथे न संपणारा हशा असतो, सतत विनोद आणि कोट्या होत असतात. हे त्रिकूट म्हणजे सेटवरील मस्तीचे केंद्र बनले आहे. ते या शो चे फन मस्केटियर्स आहेत, जे पडद्यावरील हेरगिरीचे गांभीर्य पडद्याच्या मागील मस्तीने संतुलित करतात. एकमेकांच्या खोड्या काढणे, मीम्स शेअर करणे किंवा स्वतःच्याच चुकांवर हसणे या त्यांच्या मस्तीमुळे शूटिंगचे वातावरण मात्र हलके-फुलके आणि प्रसन्न राहते.

पडद्यामागच्या फन मस्केटियर्सच्या नात्याविषयी बोलताना कृष्ण भारद्वाज म्हणाला, कुणाल आणि मी सेटवर खूप धमाल करतो. दोन खोडकर मुलांचा जसा उच्छाद असतो, तसाच आमचा या सेटवर उच्छाद असतो. निखिल आर्या आमचे आवडते टार्गेट आहे. आमच्या हसण्या-खिदळण्यामुळे तो नेहमी गोंधळात पडलेला असतो, पण आमची मस्ती तो मनावर घेत नाही. जेव्हा आम्ही तिघे एकत्र येतो, तेव्हा आमची पडद्यामागची केमिस्ट्री इतकी धमाल आणि संसर्गजन्य असते की आम्हाला मिळालेले या शो चे फन मस्केटियर्स हे नाव आम्हाला अगदी साजेसेच आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला अडकलेले पैसे मिळतील. काही महत्त्वाच्या कामात यश मिळाल्याने आर्थिक लाभ होतील. तुमच्या वडिलांकडून अपेक्षित आर्थिक मदत मिळेल. उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**वृषभ :** तुमच्या मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष द्या. तणाव कमी करण्यासाठी आणि स्वत:ला फ्रेश ठेवण्यासाठी काळजी घ्या. कठीण परिस्थितीला सामोरे जाऊन त्यावर मात कराल.

**मिथुन :** आज कुटुंबात अनावश्यक तणाव निर्माण होऊ शकतो. तुम्ही तुमचा राग आणि कठोर शब्दांवर नियंत्रण ठेवावे. अन्यथा भांडणे गंभीर वळण घेऊ शकतात. तुम्हाला नोकरीच्या संधी मिळतील.

**कर्क :** तुमच्या बॉसशी बोलताना किंवा महत्त्वाच्या चर्चा करताना शहाणपणाने आणि विचारपूर्वक बोला. तुमच्या शब्दांनी परिस्थिती बिघडणार नाही याची काळजी घ्या.

**सिंह :** कुटुंबासोबत विशेषत: आई-वडिलांसोबत वेळ घालवाल. यामुळे नातेसंबंध अधिक मजबूत होतील. आर्थिक बाबतीत चढ-उतार दिसू शकतात. त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे आहे.

**कन्या :** आपल्या प्रियजनांसोबत वेळ घालवण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी हा एक उत्तम दिवस आहे. आज तुम्हाला आरोग्याच्या किरकोळ समस्या सतावतील. खाण्यापिण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** स्वत:च्या आरोग्याकडे आणि मानसिक स्थितीकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आज तुम्हाला कामात भरपूर उत्साह जाणवेल. तुम्ही तुमच्या जबाबदाजया अत्यंत चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**वृश्चिक :** आज तुमचा नोकरीचा शोध पूर्ण होईल. चांगलं काम मिळेल. महत्त्वाच्या कामात येणारे अडथळे दूर होतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना बाहेरच्या देशात जावे लागू शकते.


**धनु :** आज व्यवसायात चांगले उत्पन्न असल्याने आर्थिक स्थिती मजबूत असेल. पैशाच्या मदतीने काही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. यामुळे भविष्यात आर्थिक लाभ होतील.

**मकर :** कामाच्या ठिकाणी जास्त मेहनत करावी लागेल. सहकाजयांशी समन्वय साधण्याची गरज भासेल. कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. यामुळे नात्यात गोडवा येईल. उत्पन्नाचे स्रोत वाढतील.

**कुंभ :** आज तुमची आर्थिक परिस्थिती थोडी गडबडू शकते. त्यामुळे कोणत्याही मोठ्या निर्णयांमध्ये सावधगिरी बाळगा. सतत काम करण्याऐवजी छोटे ब्रेक घ्या. यामुळे तुमची कार्यक्षमता टिकून राहील.

**मीन :** आपल्या कामाचे संतुलन योग्य प्रकारे राखण्याचा प्रयत्न करा. करिअरमध्ये पुढे जाण्यासाठी विचारपूर्वक आणि रणनीती आखा. कोणताही निर्णय घाईघाईने घेऊ नका. आर्थिक स्थिती चांगली आणि मजबूत राहील.

## शब्दकोडे क्रमांक २१५१




**आडवे शब्द :-**
१) ओळखीचा
३) राजाचे निवासस्थान
७) रक्षण करणारा
१०) काढलेली सुट्टी
११) नष्ट झालेले मेलेले
१३) प्रतिदिनी
१६) बस्तान
१७) शरीरावरील माराची खूण
१८) उपवन
१९) काटकसर
२२) टरफल
२३) मनातील विचार मन
२४) फांदी तुटतानाचा आवाज
२६) मासिक भत्ता
२८) स्थिती, अवस्था
२९) कौसल्यापुत्र
३०) गोमाता
३१) शर्करा
३३) जय
३४) प्रजा, कुळावरील सरकारी कर
३७) फिकीर, गुणांची पारख
३९) मनाचा झालेला ग्रह
४०) एक शिकारी पक्षी
४२) सिंहासन
४३) *** राम--गोसावी, भटक्या मनुष्य
४४) अर्जुनाचा रथ चालविणारा श्रीकृष्ण
४६) आजच्या आधीचा दिवस
४७) जेवणातील रसरशीत तोंडी लावणे
४९) पती, यजमान
५०) मला
५१) वेळेचा कमीतकमी भाग
५२) नगरवासी, एक आडनाव
५५) मल्ल
५७) अनाथ
५८) दोन डोंगरामधील अरुंद रस्ता
५९) कविता, गीत
६०) बारा महिन्याचा काळ
६१) लटलटणे, धैर्य सुटणे
६२) तृण, चारा
६४) उत्तराधिकारी
६६) मत देण्याची क्रिया
६८) मुक्तता
६९) बारीकसारीक
७०) जाडसर पीठ

**उभे शब्द :-**
१) कमळ
२) पुष्कळ
३) भूपती
४) नंतर
५) वर्ष
६) वाईट सवय, खोड
७) मनावर ठेवला आवर
८) निमग्न
९) आपल्या कठीण प्रसंगास कोण मदत करतो ? रामदासस्वामीची एक विचारणा
१०) चांदी
१२) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
१३) पत्थर
१४) रोख रक्कम
१५) एक औषधी हळद प्रकार
१७) सिंह
१८) वाकलेला
२०) लक्ष्मी
२१) पोळ्या भाजण्याचे पात्र
२५) च्या साठी
२७) पृथ्वी
३२) वाळा
३३) वाटप
३५) योग्य, उचित
३६) दिवस
३७) मणका
३८) अर्धा शेर
४१) जोडीदार
४४) बाजीप्रभूंच्या रक्ताने पवित्र झालेली जागा
४५) दर्या, अर्णव
४६) वेळेचा अपव्यय
४७) रात्री चमकणारा किडा
४८) रंग
५०) अधिक महिना
५१) नष्ट होणारे
५३) ढगांचा आवाज
५४) भांडण, तंटा
५६) लोणी
६३) डोळ्यातील बुब्बुळावर येणारा कवडा
६४) चणचण, उणीव
६५) लोखंड
६६) अंत:करण
६७) दरवाजा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# नाशिक मनसेतर्फे आनंदोत्सव साजरा

## त्रिभाषा सूत्र जीआर रद्द निमित्ताने




**नाशिक ।** राज्य सरकारच्या त्रिभाषेच्या हिंदी भाषेच्या सक्ती विरोधात ठाकरे बंधुंनी पुकारलेल्या आंदोलनाला यश आले असून, राज्य शासनाने या आंदोलनाचा धसका घेऊन ; हिंदी भाषेच्या सक्ती चा जीआर अखेर रद्द केला. या निमित्ताने महाराष्ट्र नवनिर्माण सेना नाशिक शहराच्यावतीने ढोल वाजून, पेढे वाटून जल्लोष साजरा करण्यात आला .

या प्रसंगी बोलतांना प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांनी हा विजय मराठी अस्मितेचा असून, राज ठाकरे यांनी केलेल्या राज्य सरकारच्या अनाठाई निर्णयाला विरोधाचा हा विजय आहे. ५ जुलै ला होणाऱ्या मोर्चाला यश मिळेल हे राज्य सरकारच्या लक्षात आल्याने हा जीआर रद्द करावा लागला. या पुढे जेव्हा जेव्हा मराठी भाषेला मराठी माणसाला गृहीत धरले जाईल त्या प्रत्येक वेळी या पद्धतीने कडकडून विरोध केला जाईल.

या प्रसंगी प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील,प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, शहर समन्वयक भाऊसाहेब निमसे, महिला सेना उपाध्यक्ष सुजाता डेरे, जिल्हा उपाध्यक्ष नामदेव पाटील, संदीप किर्वे, मनोज घोडके, विभाग अध्यक्ष सत्यम खंडाळे, सचिन सिन्हा, नितीन माळी, बंटी कोरडे, योगेश दाभाडे, धीरज भोसले, संदीप दोंदे, शहरउपाध्यक्ष विशाल भावले, मिलिंद कांबळे, गणेश जायभावे, ज्ञानेश्वर बगडे, विजय ठाकरे, किशोर वडजे, सचिन रोजेकर, अर्जुन वेताळ, प्रफुल बनभेरू, सौरभ खैरनार, राकेश परदेशी, जावेद शेख, विश्वास तांबे, कौशल पाटील, राहुल पाटील,अरुणा पाटील, कामिनी दोंदे, स्वागता उपासानी, पद्मिनी वारे, भानुमती आहिरे, रागिणी कोदे, मीरा आवारे, कविता कुकारणी, प्रीती आव्हाड, गोपी पगार, संदीप दराडे, संदीप मालवणकर, उदय नवले, अमोल गोजरे, सुजीत बडगुजर, वैभव रौंदल, धरम गोविंद, नितीन सूर्यवंशी, लक्ष्मण साळवे, जनार्दन खाडे, विशाल चौधरी, हर्शल कुलकर्णी, पदाधिकारी व मनसे सैनिक तसेच मराठी प्रेमी उपस्थित होते.

## शिवसेना उबाठा गटाला खिंडार; मधुकर तळपाडे शिंदे गटात



**अकोले ।** अकोले विधानसभेची शिवसेनेकडून दोनदा निवडणूक लढविलेले व आताची विधानसभा अपक्ष लढवलेले माजी पोलीस अधीक्षक मधुकर तळपाडे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची साथ सोडत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेते प्रवेश केला.

यामुळे अकोले तालुक्यात शिवसेना शिंदे पक्षाची ताकद वाढली आहे. शिंदे यांच्या हस्ते त्यांचा प्रवेश करण्यात आला. यावेळी शिक्षणमंत्री दादा भुसे, डॉ. जालिंदर भोर, उपजिल्हाप्रमुख मारुती मेंगाळ, महिला आघाडीच्या राज्य सचिव शर्मिला येवले, युवासेना जिल्हाप्रमुख महेश देशमुख तालुकाप्रमुख सुशांत गजे, तालुका कार्याध्यक्ष जगन देशमुख, तालुका सहसचिव सुभाष येवले, अकोले इ गटप्रमुख प्रकाश पाचपुते आदी उपस्थित होते. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिर्डी संस्थानचे माजी विश्वस्त डॉ. जालिंदर भोर यांनी तालुक्यातील शिवसेनेच्या पक्षबांधणीत विशेष लक्ष घातले आहे. त्यांच्या पुढाकारातून काही दिवसांपूर्वी माजी उपसभापती मारुती मेंगाळ यांच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यापाठोपाठ मधुकर तळपाडे यांनीही शिंदे शिवसेनेत प्रवेश केला आहे.

# वखार महामंडळाच्या साठा अधीक्षकासह सहा जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**मनमाड ।** श्रीरामपूर येथील अंबिका महिला नागरी सहकारी पतसंस्थेची तब्बल ७ कोटी ४४ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मनमाड येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या साठा अधीक्षकासह सहा जणांवर फसवणुकीचा गुन्हा मनमाड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार आण्णासाहेब कचरू जाधव (वय ५६, रा. श्रीरामपूर) हे अंबिका महिला पतसंस्थेचे व्यवस्थापक असून, त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणात उद्योजकांबरोबरच वखार महामंडळातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने झालेल्या घोटाळ्याचा पर्दाफाश झाला आहे.श्रीरामपूर येथील श्री बालाजी ऑईल मिल या फर्मचे भागीदार रायभान नाथु बावके, महेश दत्तात्रय मगर, प्रशांत ज्ञानेश्वर कासार असून, सागर रघुनाथ बावके हे फर्मचे अधिकृत प्रतिनिधी होते. या फर्मने विविध ठिकाणांहून कापूस खरेदी करून तो मनमाड येथील वखार महामंडळाच्या गोदामात साठवून तारण कर्जासाठी वापरला.फर्मने २०२३ पासून सुमारे ७००० कापूस गाठी वखार महामंडळाच्या मनमाड येथील गोदामात ठेवून, त्यावरील तारणाखाली ३१२ कर्ज




> या प्रकारामुळे अंबिका महिला पतसंस्थेचे ठेवीदार प्रचंड चिंतेत असून, संस्थेच्या निधीवरील संभाव्य धोका पाहता संस्थेवरील विश्वासाला तडा गेला आहे. पोलिसांनी तपास सुरू केला असून, इतक्या मोठ्या घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर वखार महामंडळाच्या कार्यपद्धतीवर व पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

प्रकरणांद्वारे एकूण १६.४० कोटी रुपये कर्ज अंबिका पतसंस्थेपासून घेतले. ३१२ पैकी २०६ कर्ज प्रकरणांची परतफेड झाली असून संबंधित गाठी परत घेतल्या गेल्या, मात्र उर्वरित १०६ कर्ज प्रकरणांतील २६५० गाठी अजूनही तारणाखाली होत्या. या गाठींवरील थकीत कर्जाची ७.१४ कोटी रुपये रक्कम होती.फेब्रुवारी २०२५ मध्ये अंबिका पतसंस्थेने मूळ पावत्यांचे नुतनीकरणासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या मनमाड व नाशिक कार्यालयांकडे पाठवले होते. मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी या पावत्या परत न करता गाठी सुरक्षित असल्याचा खोटा अहवाल दिला.त्यानंतर पतसंस्थेचे कर्मचारी गोदामात पाहणीसाठी गेले तेव्हा साठा अधिक्षक प्रल्हाद अंबालाल चौधरी आणि तत्कालीन व्यवस्थापकांनी पाहणीस विरोध केला. फेब्रुवारीमध्ये तपासणी केल्यानंतर धक्कादायक बाब समोर आली २६५० गाठींपैकी तब्बल २६२५ कापूस गाठी तारणाखाली असताना परस्पर विकल्या गेल्या होत्या. ही विक्री पतसंस्थेच्या संमतीशिवाय आणि नियमबाह्य पद्धतीने करण्यात आली होती.या प्रकरणी श्री बालाजी ऑईल मिलचे भागीदार रायभान नाथु बावके , महेश दत्तात्रय मगर, प्रशांत ज्ञानेश्वर कासार, सागर रघुनाथ बावके, मनमाडच्या महाराष्ट्र राज्य वखार महामंडळचे साठा अधीक्षक प्रल्हाद अंबालाल चौधरी, वखार महामंडळ नाशिकचे तत्कालीन व्यवस्थापक या सहा जणांविरोधात फसवणुकीसह विविध कलमांव्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक विजय करे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मधुकर उंबरे हे तपास करत आहे.

# महाकवी कालिदास कवी कुळाचे कुलगुरू : प्रा. मुंगसे

**सिन्नर ।** महाकवी कालिदास हे भारतीय साहित्यातील मानबिंदू आहेत. त्यांचे साहित्य कालातीत असून आजदेखील तितकेच ते लोकप्रिय आहे. विरह भावना ही महत्त्वाची प्रेरणा त्यांच्या साहित्यातून प्रकट होताना दिसते. जगभरातील विद्वान साहित्य रसिकांनी त्यांचे साहित्य डोक्यावर घेऊन मिरवले आहे. कालिदास हे कवी कुळाचे कुलगुरू आहेत. त्यांचा समृद्ध वारसा आजच्या साहित्यिकांनी पुढे चालवायला हवा, असे प्रतिपादन प्रा. राजाराम मुंगसे यांनी केले.

सिन्नर तालुका साहित्य भारती आणि सिन्नर सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "साहित्य चर्चा" या कार्यक्रमात "महाकवी कालिदास यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान" विषयावर ते बोलत होते. कालिदासांच्या मालविकाग्नीमित्र, विक्रमोर्वशीय, अभिज्ञान शाकुंतल या नाटकांची ओळख करून देऊन रघुवंश, कुमारसंभव, ऋतुसंहार व मेघदूत या महाकाव्यांविषयी व विविध साहित्यकृतींची प्रा.मुंगसे यांनी श्रोत्यांना आपल्या रसाळ वाणीने विस्तृत ओळख करून देत



उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. मेघदुतातील श्लोकांचा समश्लोकी मराठी काव्यानुवाद सादर करत शापदग्ध यक्षाचा करूणाविलाप सादर करून श्रोत्यांची मने जिंकून घेतली. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सिन्नर सार्वजनिक वाचनालयाचे उपाध्यक्ष नरेंद्र वैद्य, म.सा.पचे कार्याध्यक्ष प्रसिद्ध कवी रवींद्र कांगणे. म.सा.प.चे उपाध्यक्ष किरण भावसार उपस्थित होते. डॉ. श्यामसुंदर झळके यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. कार्यक्रमासाठी मोहन वाकचौरे, शाहीर स्वप्निल डुंबरे, प्रा. जावेद शेख, मनीषा उगले, जयश्री चव्हाणके,रोहिणी मिठे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महाकवी कालिदास यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली, कार्यक्रमाचे प्रास्तविक कवी किरण भावसार यांनी केले. कवी कालिदासांच्या कलाकृतींना आज २००० वर्षे झाली तरी त्यांचे काव्य अजरामर आहे. ही त्यांच्या काव्याची खरी ओळख आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात झळके यांनी सिन्नर मधील महाराष्ट्र साहित्य परिषद व साहित्य भारती यांचे साहित्य क्षेत्रातील कार्य अतिशयचांगले असून,साहित्य निर्मितीची प्रेरणा या कार्यातूनच मिळते .त्यासाठी सिन्नर मध्ये साहित्य चर्चा व्हायला हवी असे मत मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृक्षमित्र विष्णू वाघ यांनी केले तर आभार कवी उत्तम खताळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी सोमनाथ चव्हाणके, विशाल चव्हाण, विनय गुजराथी व नव साहित्यिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवाजी मराठा इंग्लिश स्कूलमध्ये छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

**देवळा ।** राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे खरे लोकशाहीवादी आणि समाजसुधारक मानले जातात. ते एक सक्षम राज्यकर्ते होते. त्यांच्या राजवटीत अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबवली.१८९४ मधील त्यांच्या राज्याभिषेकापासून ते १९२२ मध्ये त्यांच्या निधना पर्यंत त्यांनी राज्यातील मागास जातींतील लोकांसाठी काम केले.



जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले. सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना "राजर्षी" ही पदवी त्यांच्या राज्यभिषेकाच्या वेळी त्यांना त्यांच्या गुरुने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाज सुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास "फुले- शाहू- आंबेडकरांचा महाराष्ट्र" असेही म्हणतात. त्यांच्या जयंती निमित श्री शिवाजी मराठा इंग्लिश स्कूल मध्ये मुख्याध्यापक संजय पगार, जेष्ठ शिक्षिका आहेर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. उपशिक्षक जाधव यांनी महाराजांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्य या विषयावर विचार मांडले. मांडवडे यांनी प्रास्ताविक केले, तर आभार मेघा पवार यांनी मानले. यावेळी शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# 'सेवाभावी विठ्ठलवारीतून विद्यार्थ्यांना शिक्षणाची उभारणी'

## नमस्ते नाशिक फाउंडेशनचा पावसाळी साहित्य वाटप उपक्रम



**निफाड ।** 'जिथे कमी, तिथे आम्ही' या सेवाभावी ब्रीदवाक्याला अनुसरून नमस्ते नाशिक फाउंडेशन, नाशिक यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाचोरे बुद्रुक (ता. निफाड) येथील २७५ गरजू विद्यार्थ्यांना पावसाळी साहित्य (रेनकोट, छत्र्या) व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विठ्ठल भक्तीच्या आणि सेवाभावाच्या संगमातून साकारलेला हा उपक्रम म्हणजे एक सामाजिक विठ्ठलवारीच! विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येऊ नये यासाठी फाउंडेशनच्या अध्यक्षा स्नेहल देव यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. त्यांच्या मते, "मुलांच्या डोळ्यांतील चमक आणि चेहऱ्यावरील हसू – हाच खरा सन्मान!" याप्रसंगी प्रमुख पाहुणे निवृत्त विंग कमांडर प्रदीप बागमार, डॉ.पल्लवी बागुल यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी वातावरण भक्तीमय व आनंदी केले.

# हिंदी सक्तीविरोधात निफाडमध्ये सर्वपक्षीय आंदोलन



**निफाड ।** मराठी भाषेवर वाढत्या हिंदी सक्तीविरोधात निफाड शहरात जोरदार आंदोलन करण्यात आले. माजी आमदार अनिल कदम यांच्या नेतृत्वाखाली विविध पक्षांचे कार्यकर्ते एकत्र येत शासकीय आदेशाची होळी करून महाराष्ट्र सरकारचा तीव्र निषेध नोंदवण्यात आला.

## शासकीय जीआरची होळी करत सरकारचा निषेध

या आंदोलनात ज्येष्ठ नेते भास्कर बनकर शिवसेना (उबाठा), जिल्हाप्रमुख नितीन आहेर, दिगंबर गीते, वैशाली कदम, विक्रम रंधवे, खंडू बोडके यांच्यासह इतर सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी भाग घेतला."मराठीचा अपमान सहन केला जाणार नाही", "हिंदी सक्ती हटवा", "मराठीला न्याय द्या" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनादरम्यान शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), मनसे या पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठी भाषेवरील प्रेम आणि अस्मितेच्या भावनेने प्रेरित होऊन अनेक मराठीप्रेमी नागरिकांनीही आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. आंदोलनकर्त्यांनी शासकीय जीआरची होळी करत महाराष्ट्र सरकारचा निषेध केला आणि निफाड पोलीस स्टेशनमध्ये निवेदनही सादर केले. यावेळी बोलताना अनिल कदम म्हणाले, "महाराष्ट्रात मराठी ही अभिमानाची भाषा असून तिच्यावर अन्य भाषांची सक्ती खपवून घेतली जाणार नाही. सरकारने त्वरित ही हिंदी सक्ती मागे घ्यावी अन्यथा यापुढे अधिक तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.आंदोलन शांततापूर्ण पद्धतीने पार पडलं.

## ➢ महत्त्वाचे

### मुख्यमंत्र्यांचे वैभव पिचड यांच्याकडून स्वागत

**अकोले ।** अनुसूचित जमाती आयोगाच्या स्थापनेस दिलेली मंजुरी ही अनुसूचित जमातींच्या न्याय, हक्क व विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण



पाऊल आहे.हा ऐतिहासिक निर्णय असल्याची भावना व्यक्त करत हा निर्णय घेतल्याबद्दल वैभव पिचड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले असून, त्याबद्दल सत्कार केला. वैभव पिचड यांनी यावेळी अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने झालेले नुकसानाची भरपाई तसेच तालुक्यातील सिंचन, रस्ते विकास, आरोग्य सुविधा या प्रश्नांसह विविध विकास कामांसदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा करत निवेदन दिले. पिचड यांनी मुंबई येथे फडणवीस यांची भेट घेऊन अकोले तालुक्यातील विविध प्रश्न, शेतकऱ्यांची नुकसानभरपाई तसेच रखडलेली व प्रास्तावित सिंचन, रस्त्यांची कामे, आरोग्याच्या सुविधा आदी विषयासंदर्भात भेट घेऊन चर्चा केली.

# कसमादेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती कौतुकास्पद : डॉ. निमसे

**नाशिक ।** विद्यार्थ्यांनी आपली क्षमता, आवड आणि कुवत ओळखूनच अभ्यासक्रमाची निवड केली पाहिजे. सध्याची शिक्षण पद्धती काळानुरू नसल्याने युवकांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेत बदल करून काळानुरूप शिक्षण व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. कसमादे भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत केलेली प्रगती कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांनी केले.



कसमादे मराठा उत्कर्ष संस्थेच्या वतीने गंगापूर रोडवरील आय एम आर टी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित गुणगौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना डॉ.निमसे बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार डॉ.राहुल आहेर होते. डॉ.निमसे पुढे म्हणाले, "आपली बौद्धिक भूक, कार्य तत्परता आणि महत्त्वाकांक्षा जोपासणाऱ्या व्यक्तींना जीवनात यश मिळवणे सहज शक्य होते. बदलत्या युगात यशस्वी होण्यासाठी केवळ प्रमाणपत्र नव्हे तर ज्ञान, कौशल्य आणि मूल्यांची गरज आहे. शिक्षण संस्थांनीही आता केवळ पारंपरिक शिक्षणापुरते न राहता विद्यार्थ्यांना व्यावसायिक आणि प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षण देण्यावर भर द्यावा." यावेळी व्यासपीठावर मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप भाऊसा दळवी, संचालक ॲड.आर. के.बच्छाव, विजय पगार, डॉ. प्रसाद सोनवणे, बाळासाहेब मगर, कसमादे उत्कर्ष संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.बी.जी.वाघ, कार्याध्यक्ष प्राचार्य गुलाबराव भामरे,सचिव डॉ.प्रशांत सूर्यवंशी उपस्थित होते. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराज व राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक अध्यक्ष डॉ.बी.जी.वाघ यांनी केले. प्रास्ताविकात डॉ. वाघ यांनी संस्थेची ध्येय धोरणे, उद्दिष्टे व राबवलेले उपक्रम याबाबत माहिती दिली. पाहुण्यांचा परिचय ॲड. रवींद्र निकम आणि डॉ. रमेश खैरनार यांनी करून दिला. यावेळी ॲड. नितीन ठाकरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, कसमादे भागातील विद्यार्थ्यांची शिकण्याची जिद्द चिकाटी खरोखरच प्रेरणादायी व कौतुकास्पद आहे. यावेळी आमदार डॉ.राहुल आहेर यांनी कसमादे उत्कर्ष मराठा संस्थेच्या उपक्रमाबद्दल व कार्याबद्दल कौतुक करून गुणवंत विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी युपीएससी, एमपीएससी, पीएचडी, जेईई ॲडव्हान्स, नीट ,सेट आदी विविध स्पर्धा परीक्षा तसेच माध्यमिक उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या शंभरहून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. सुरज निकम यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांच्यावतीने संस्थेचे ऋण व्यक्त करणारे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी हिरामण आबा सोनवणे, इंजि. संजय अहिरराव, प्रमोद अहिरराव, पंडितराव वाघ, डॉ. शिवराम हिरे, राजेंद्र पगार, चंद्रशेखर सोनवणे, डॉ. नंदू पवार, दीपक चव्हाण, मधुकर पवार, रवींद्र मोरे, राजेंद्र देसले, रमेश पवार, डॉ. किशोर पवार, डॉ. बी. व्ही.कापडणीस यांच्यासह कसमादे संस्थेचे सभासद, हितचिंतक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनीत पवार आणि प्रा. दिलीप अहिरे यांनी केले. प्राचार्य गुलाबराव भामरे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.




# टॉमेटो गार्लिक पास्ता



झटपट रेसिपी

दोस्तांनो, पावसाळ्यात गरमागरम पण वेगळं काही खावंसं वाटतं. अशावेळी मस्तपैकी टॉमेटो गार्लिक पास्ता बनवता येईल.

**सामग्री:** ४०० ग्"म स्पॅगेटी पास्ता, दोन चमचे पार्मिसन चीझ, एक टी स्पून काळीमिरी, अर्धा किलो चेरी टोमॅटो, अर्धा टेबलस्पून लसूण, ६ ते ७ तुळशीची पानं किंवा बासिल हर्ब, एक टी स्पून सोया सॉस, एक टेबलस्पून टॉमेटो सॉस, एक टीस्पून ग'ीन चिली सॉस, मीठ, तेल आणि सजावटीसाठी कोथिंबिर

**कृती:** एका भांड्यात पाणी उकळायला ठेवा. त्यात थोडं मीठ घाला. पाणी उकळल्यानंतर त्यात स्पॅगेटी पास्ता घालून शिजवून घ्या. पाणी गाळून पास्ता गार करायला ठेवा. एका कढईत दोन टेबलस्पून तेल गरम करा. त्यात लसूण आणि टॉमेटो घालून शिजवून घ्या. टॉमेटो मऊ शिजल्यानंतर त्यात मिरपूड,मीठ, ग'ीन चिली सॉस, सोया सॉस घालून परतून घ्या. मसाला तयार झाल्यानंतर त्यात पास्ता घाला. यात टोमॅटो सॉस, बासिल किंवा तुळशीची पानं, चीझ आणि कोथिंबिर घालून पाच ते आठ मिनिटं शिजवून घ्या. तुमचा पास्ता तयार आहे. गरमागरम खा.

# लॉकर ठरले यशाची गुरुकिल्ली

अचिव्हर

सनत जैन आणि विशाल जैन हे दोघे मेहुणे आहेत. दोघेही पूर्वी दिल्लीतील चांदणी चौकात सीसीटीव्हीचे दुकान चालवत होते. परंतु या क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेमुळे त्यांना हे दुकान बंद करावे लागले. त्यानंतर दोघांनी 'लवना स्मार्ट डोअर लॉक्स' नावाचा एक नवीन ब्रँड सुरू केला. ते डिजिटल लॉकर बनवतात. आज हा ब्रँड कोट्यवधी रुपयांचा बनला आहे.

सनत जैन आणि विशाल जैन यांनी बाजारपेठेतील वाढत्या स्पर्धेमुळे चांदणी चौकातील सीसीटीव्हीचे दुकान २०२० मध्ये बंद केले. या काळात ते चीनला गेले आणि दोघांनाही डिजिटल स्मार्ट लॉकर व्यवसाय सुरू करण्याची कल्पना सुचली. डिजिटल स्मार्ट लॉकरने प्रभावित होऊन त्यांनी प्रथम ते त्यांच्या घरात बसवले आणि त्याचा अनुभव घेतला. अशा प्रकारे त्यांनी 'डिजिटल स्मार्ट लॉकर'चा व्यवसाय सुरू केला. दोघांनीही हे क्षेत्र समजून घेण्यासाठी बाजारात जाऊन खूप



अभ्यास केला. विविध ब्रँडसाठी स्मार्ट लॉक बनवणारे ओईएम (मूळ उपकरण उत्पादक) म्हणून काम करण्यास सुरुवात केली.


दोघांनीही २०२१ मध्ये लवना स्मार्ट डोअर लॉक्स नावाचा स्वतःचा ब्रँड सुरू केला आणि या व्यवसायात प्रत्येकी ५० लाख रुपये गुंतवले. त्यांच्या मूळ कंपनीचे नाव भगवान श्री लॉक्स प्रायव्हेट लिमिटेड असे आहे. विशाल जैन यांनी खरेदी आणि सर्व्हिसिंग पाहिले तर सनत जैन यांनी विक्री आणि मार्केटिंगकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. परंतु हळूहळू लोकांचा त्यांच्या उत्पादनांवर विश्वास बसला आणि त्यांचा व्यवसाय वाढला.

**डिजिटल लॉकर्समध्ये प्रगत तंत्रज्ञान**

त्यांच्या डिजिटल स्मार्ट लॉकर्समध्ये प्रगत तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. त्यात वाय-फाय आणि ब्लूटूथ, ०.४ सेकंदात फिंगरप्रिंट डिटेक्शन, ओटीपी सारखी वैशिष्ट्ये आहेत. आज भारतातील १२० स्टोअरमध्ये लवना स्मार्ट डोअर लॉक्सची विविध उत्पादने उपलब्ध आहेत. लवना स्मार्ट डोअर लॉक्सची उत्पादने ऑनलाइनदेखील विकली जातात. फक्त तीन वर्षात या कंपनीची उलाढाल सात कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

## टेक टॉक

### एआय चॅटबॉट्सही धोकादायक




नवीन एआय चॅटबॉट्स आणि लेखन साधनांचा व्यापक वापर कंपन्यांना डेटा लीकचे बळी बनवू शकतो. हॅकर्स संवेदनशील कॉर्पोरेट तपशीलांमध्ये प्रवेश करण्यासाठी किंवा कंपनीविरुद्ध कारवाई करण्यासाठी चॅटबॉट्सना लक्ष्य करू शकतात, अशी भीती आहे. चॅटबॉट्समध्ये असलेली गोपनीय माहिती आता भविष्यात एआय कंपन्या चॅटबॉट्सना प्रशिक्षण देण्यासाठी वापरतील, अशीही चिंता आहे. अशा परिस्थितीत डेटा सुरक्षिततेची कोणतीही हमी नाही. 'मायक्रोसॉफ्ट कॉर्प आणि अल्फाबेट इंकसह प्रमुख टेक कंपन्या चॅटबॉट्स आणि सर्च इंजिन अधिक अद्ययावत करण्यासाठी 'जनरेटिव्ह एआय'चा वापर करत आहेत. यासाठी, ते इंटरनेटवर विचारल्या जाणाऱ्या प्रश्नां चा वापर करत आहेत. अशा परिस्थितीत चॅटबॉट्सना विचारलेले प्रश्नकदेखील संग्रहित केले जात आहेत आणि त्यातून 'एआय'ला प्रशिक्षण दिले जात आहे, असे गृहीत धरले जाऊ शकते. या साधनांमध्ये गोपनीय किंवा वैयक्तिक डेटा भरला जात असेल तर डेटा हटवणे खूप कठीण असू शकते, असे अहवालात म्हटले आहे.

## ॲप वर्ल्ड

### आता 'एआय' करेल व्हिडीओ एडिटिंग

व्हिडिओ बनवणाऱ्यांसाठी 'मेटा एआय'ने एक उपयुक्त फिचर आणले आहे. व्हिडिओ बनवून एडिटिंगची गुंतागुंत नको असणाऱ्यांचे काम आता सोपे झाले आहे. आता फक्त व्हिडीओ अपलोड केला तरी नंतर 'मेटा एआय'च्या मदतीने ५० पेक्षा जास्त प्रॉम्प्टस वापरून त्यात हवे ते बदल करता येतात. या फीचरचा वापर करून आपण व्हिडिओतल्या व्यक्तींचे कपडे, पार्श्वभूमी, शैली



आणि अगदी वातावरणदेखील बदलू शकतो. हे फिचर 'मेटा एआय ॲतप' आणि वेबसाइटवर अगदी सहजपणे कार्य करते. युजरला फक्त त्याचा व्हिडीओ अपलोड करायचा आणि त्यात काय बदलायचे आहे, ते ठरवायचे आहे. म्हणजे तुम्हाला टी-शर्ट इतर रंगाचा हवा असेल किंवा पार्श्वआभूमीत समुद्राऐवजी पर्वत दिसावेत, असे वाटत असेल तर फक्त संबंधित प्रॉम्प्ट निवडा आणि एआय काही सेकंदात तो बदल करेल.

## नवे काही

### कुलरमधून घ्या एसीची हवा!

कुलरमध्ये बर्फासोबत दोन ते तीन चमचे मीठ टाकल्यावर कुलर एसीपेक्षाही थंड हवा देते. तसेच याचा वीजबिलावर कोणताही परिणाम होत नाही. बर्फ आणि मिठाचे मिश्रण कूलरमध्ये टाकल्यानंतर थोड्याच वेळातच पूर्वीपेक्षा अधिक थंड हवा येत असल्याची जाणीव होईल. जवळपास एसीमधून येते तेवढीच थंड हवा कुलरमधून येईल. अनेक जण या ट्रीकवर संशय व्यक्त करतात. मात्र




ही ट्रीक काम करते. यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे, तुम्ही बर्फामध्ये मीठ टाकता तेव्हा तो बर्फ अधिक वेगाने वितळू लागतो. बर्फ वितळल्यामुळे कुलरमधून एसी इतकी थंडी हवा मिळते. मात्र हा प्रयोग करताना केवळ दोन ते तीन चमचे एवढेच मीठ टाकावे. त्यापेक्षा अधिक टाकल्यास मीठाच्या पाण्यामुळे कुलरमधील काही इलेक्ट्रिकल पार्ट्स खराब होण्याची शक्यता असते. काही लोखंडांच्या पार्ट्सवर यामुळे गंज चढतो.

# केसाचा लूक बदलण्याची योग्य वेळ

ग्रुमिंग

पुरुषांच्या लूकमध्ये केसांची मोठी भूमिका असते. पण बर्याचि पुरुषांना हेअरस्टाईलबद्दल योग्य माहिती नसते. त्यामुळे त्यांचा लूकही खराब होतो. लग्न-समारंभाच्या किती दिवस आधी केस कापणे योग्य आहे, याचाही कोणी फारसा विचार करत नाही. सहसा मुले सलूनमध्ये जातात आणि लग्नाच्या एक-दोन दिवस आधी केस कापतात. तुम्हीही अशी चूक करणार असाल तर थांबा.



सर्वप्रथम एखाद्या समारंभाला जाण्यापूर्वी किती दिवस आधी केस कापले पाहिजेत हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. जेणेकरून समारंभाच्या मुख्य दिवशी तुमची हेअरस्टाईल योग्य दिसेल आणि तुमचा लूकही अपेक्षेप्रमाणे दिसेल. लग्न किंवा साखरपुड्यासारख्या खास समारंभाच्या आधी पुरुषांनी निश्चितच केस कापले पाहिजेत. पुरुषांचे केस लवकर वाढतात आणि त्यांना योग्य आकारात ठेवणे महत्त्वाचे आहे. परंतु समारंभाच्या फक्त एक-दोन दिवस आधी केस कापल्याने संपूर्ण चेहर्यावचा लूक खराब होऊ शकतो.

**५-६ दिवस आधी केस कापा**

पुरुषांना एखाद्या विशेष समारंभाला किंवा स्वतःच्या लग्नाला उपस्थित राहायचे असते तेव्हा त्यांनी केसांचा उत्तम लूक येण्यासाठी सुमारे ५ ते ६ दिवस आधी केस कापून घ्यावेत. केस कापल्यानंतर, योग्य आकारात येण्यासाठी थोडा वेळ लागतो. त्यामुळे समारंभाच्या दिवशी हेअर स्टाईल परिपूर्ण दिसते. तसेच, इतके दिवस आधी केस कापण्याल्यामुळे केस कापताना झालेल्या चुकादेखील दुरुस्त करता येतात.

# अक्षम्य चूक झाली!

मॅच मेकिंग

प्रेयसीसोबतचं तीन वर्षांचं नातं संपवून मी दुसऱ्याच मुलीकडे आकर्षित झालो. नातं संपवताना माझी प्रेयसी खूप रडली. पण काही काळानंतर तिने हा निर्णय स्वीकारला. मी शिक्षणानिमित्त दुसऱ्या शहरात गेल्यानंतर नवं नातं जोडलं. पण फक्त दहा महिन्यातच हे नातं संपलं. कॉलेज संपल्यानंतर ती मुलगीही मला सोडून गेली. आधीच्या प्रेयसीसोबतचं नातं संपवून मी खूप मोठी चूक केली आहे. ती आता आयुष्यात पुढे निघून गेली आहे. माझ्याशी बोलण्यात तिला रस नाही. मी काय करू?

**उत्तर :** सर्वात आधी तू समुपदेशकांना भेट. तुला नात्यामधून नेमकं काय हवं आहे, हे जाणून घे. याबाबतची स्पष्टता तुझ्याकडे असायला हवी. सद्यपरिस्थितीत तू स्वत:ला वेळ दे. काही काळ कोणत्याही



नात्यात अडकू नकोस. स्वयंविकासावर भर दे. तुझी प्रेयसी आयुष्यात पुढे निघून गेली आहे. त्याचप्रमाणे तूही भविष्याचा विचार कर. आता भूतकाळ बदलता येणार नाही. पण भविष्य आपल्या हातात आहे. उज्ज्वल भवितव्यासाठी आपण नक्कीच प्रयत्न करू शकतो.

# इथे चुकू नका

फॅशन पॅशन

आपण फॅशनच्या बाबतीत काही चुका करत असतो. चुका करायला हरकत नाही पण त्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. अर्थात अजाणतेपणीही काही चुका होतात. त्या टाळल्या तर आपण नक्कीच स्मार्ट दिसू शकतो.



* दोस्तांनो, पँटचे खिसे वस्तू ठेवण्यासाठी असले तरी ते फुगता कामा नयेत. पँटच्या शिखातून बाहेर येणार्यां चाव्या, वॉलेट फार वाईट दिसतात. वॉलेट उगाचच खिशात कोंबू नका. बॅकपॅकच्या कप्प्यात टाका. कार्ड ठेवण्यासाठी लेदरच्या कार्ड होल्डरचा वापर करा.

* फार लांब ट्राउझर्स घालू नका. यामुळे तुमच्या लूकचा पार विचका होईल. पँट पायात येणार नाही याची काळजी घ्या.

* 'स्क्वेअर टो ड्रेस' हा बुटांचा प्रकार आता बराच मागे पडला आहे. हे बूट आउट ऑफ फॅशन आहेत. त्यामुळे ते कॅरी करू नका. त्याऐवजी पुढच्या बाजूने गोलाकार असणारे शूज घ्या.

* एकाच वेळी जास्त ॲक्सेसरीज घालून नका. त्याऐवजी छानसं घड्याळ, पॉकेट स्वेअर, ट्रेंडी टाय, कफलिंक्स यापैकी काहीतरी ट्राय करा.

* मोज्यांची निवड योग्य असायला हवी. ट्राउझरला साजेसे न्यूट्रल रंगाचे मोजे घ्या. बुटांना शोभणारे भडक रंगाचे मोजे अजिबात घेऊ नका. कॉन्ट्रास्ट सॉक्सही चालून जातील. पण असे सॉक्स कॅज्युअल ऑकेजनसाठी ठेवा.

* खोल व्ही नेक असणारा टी शर्ट अजिबात घालू नका. असे टी शर्ट चांगले दिसत नाहीत. त्याऐवजी हेन्ले स्टाईल टी शर्टस ट्राय करा.

# जिने चढा, फिट रहा

फिटनेस फंडा



फिटनेस राखण्यासाठी, वजन कमी करण्यासाठी आपण बरंच काही करतो. ट्रेडमीलसारखी महागडी उपकरणं विकत घेतो. जीमच्या मेंबरशीपसाठी बरेच पैसे खर्च करतो. पण तुम्ही स्वस्तात फिट राहू शकता. यासाठी हवी समर्पित वृत्ती, जिद्द आणि जिने. तुमच्या इमारतीला भरपूर जिने असतील तर कॅलरी जाळण्यासाठी तुम्हाला दुसरीकडे कुठेही जावं लागणार नाही. जिन्यावरून धावणं हा एक उत्तम व्यायाम ठरू शकतो. फक्त अर्धा तास जिन्यावरून धावल्याने ५०० कॅलरी खर्च होतात, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. त्यामुळे तुम्ही जिन्यांवरून धावण्याचा व्यायाम सुरू करू शकता. याबाबतच्या काही टिप्स...

* इतर कोणत्याही व्यायाम प्रकाराप्रमाणे जिन्यावरून धावण्याचा व्यायाम सुरू करण्याआधी 'वॉर्म अप' म्हणजे पूर्वतयारी करणं गरजेचं आहे. धावणं सुरू करण्याआधी ३ ते ४ मिनिटं जिन्यांवरून चढउतार करा. हळूहळू वेग वाढवा.

* जिन्यांवर तुम्ही पुश-अपही करू शकता. नेहमीच्या पुश-अप्सप्रमाणेच हा व्यायाम करायचा आहे. खालच्या पायरीवर उभे रहा. हात तिसऱ्या किंवा चौथ्या पायरीवर ठेवा आणि पुशअप्स करा.

* व्यायाम करायला फार वेळ नसला तरी काळजी करू नका. पाच मिनिटं जिन्यांवरून चढउतार करा. मग वेग वाढवा. त्यानंतर पुढची पाच मिनिटं जिन्यांवरून जोरात धावा. फक्त दहा मिनिटांत तुमचा व्यायाम होईल.

* तुमच्याकडे २० मिनिटं असतील तर एक पायरी सोडून जिने चढण्याचा व्यायाम करा. सुरूवातीला वेग कमी ठेवा. मग दोन पायर्यार सोडून जिने चढण्याचा प्रयत्न करा.

# 'न्यूक्लिअर इंजिनीअरींग'चा आकर्षक पर्याय

करियर वाटा

आजच्या युगात ऊर्जा ही सर्वात मोठी गरज बनली आहे. वाढत्या मागणीमुळे पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि टिकाऊ ऊर्जा स्रोतांची आवश्यकता अधिक तीव्र झाली आहे. अशा परिस्थितीत 'न्यूक्लियर इंजिनीअरींग' ही शाखा करिअरसाठी एक महत्त्वपूर्ण आणि आकर्षक पर्याय ठरते. ही शाखा केवळ वीज निर्मितीपुरती मर्यादित नसून वैद्यकीय क्षेत्र, संशोधन, संरक्षण आणि औद्योगिक विकासातही मोठ्या प्रमाणात योगदान देते.

**न्यूक्लियर इंजिनिअरिंग म्हणजे काय?**

'न्यूक्लियर इंजिनीअरींग' या विज्ञानशाखेत अणुऊर्जेचा वापर करून वीज निर्मिती, रेडिएशन नियंत्रण, अणुउर्जा रिएक्टरचे डिझाइन, आणि कचरा व्यवस्थापन (वेस्ट मॅनेजमेन्ट) यासारखी कामे केली जातात. यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित यांचा समावेश असतो.

**न्यूक्लियर इंजिनिअरिंगमध्ये हे कोर्सेस उपलब्ध आहेत.**

*बी. टेक-चार वर्षांचा

*एम. टेक/एम. एस.-एक ते दोन वर्षांचा

* पीएच. डी- संशोधनासाठी तीन ते पाच वर्षांचा कोर्स

भारतामध्ये प्रवेशासाठी जेईई, गेट, किंवा सीयूईटी परीक्षांमधून पात्रता मिळवावी लागते. बारावीत पीसीएम (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित) असणे आवश्यक आहे.

**अभ्यासक'मासाठी प्रमुख शैक्षणिक संस्था**



**भारतात :**

*आयआयटी - रिएक्टर फिजिक्समध्ये विशेष अभ्यासक'म

* जादवपूर विद्यापीठ -एम. टेक. साठी उत्कृष्ट पर्याय

* भाभा ॲवटॉमिक रिसर्च सेंटर - संशोधन व प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध

*पंडित दीनदयाळ ऊर्जा विद्यापीठ - खासगी क्षेत्रात आघाडीवर

**परदेशात:**

*एमआयटी(अमेरिका) - रिएक्टर डिझाइनसाठी जागतिक मान्यता

*यूसी बर्कली (अमेरिका)- न्यूक्लियर फ्युजन संशोधन

*इम्पिरिअल कॉलेज, लंडन (बि'टन) - डीकमिशनिंग आणि सेफ्टी कोर्सेस

*मॅकमॉस्टर विद्यापीठ (कॅनडा) - मेडिकल ॲप्लिकेशन्सवर भर

*केआयटी (जर्मनी) - वेस्ट मॅनेजमेंटसाठी प्रसिद्ध

भारतात केवळ मोजक्याच संस्था न्यूक्लियर इंजिनिअरिंग कोर्सेस देतात. त्यामुळे प्रवेशासाठी मोठी स्पर्धा असते. परदेशात प्रवेशासाठी जीआरई, टोफेल, किंवा इलेट्स स्कोअर लागतो. परदेशातील वार्षिक फी सुमारे २०-५० लाखादरम्यान असते, तर भारतात ती दोन ते आठ लाखांदरम्यान असते.

**पगार आणि करिअर संधी**

'न्यूक्लियर इंजिनीअरींगच्या क्षेत्रात नोकरी मिळाल्यावर भारतात चार ते सहा लाख रुपये इतका वार्षिक पगार मिळतो. अनुभव वाढल्यावर तो १०-१५ लाखांपर्यंत जातो. अमेरिकेत सरासरी पगार १.०५ ते १.६० लाख डॉलर (८५ लाख ते १.३ कोटी) पर्यंत असतो. ब्रिटनमध्ये मिड-लेव्हल इंजिनीअर्सना ३५ ते पन्नास हजार पौंड (३७ ते ५३ लाख) पगार मिळतो.

**मुख्य करिअर पर्याय :**

*न्यूक्लिअर इंजिनीअर- पॉवर प्लँट्समध्ये रिएक्टर डिझाइन आणि ऑपरेशन

*सेफ्टी इंजिनीअर- रेडिएशन नियंत्रण आणि पर्यावरण सुरक्षा

*रिसर्च सायंटिस्ट - न्यूक्लियर फ्युजन/वेस्ट मॅनेजमेंट

*मेडिकल फिजीस्ट - रेडिएशन थेरपी उपकरणांचे डेव्हलपमेंट

*प्रोजेक्ट इंजिनीअर - न्यूक्लियर प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणी.

# लोणावळ्यात काय पाहाल?

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीतून थोडा वेळ स्वत:साठी काढणे खूप महत्त्वाचे असते. त्यामुळे निश्चियतच आपल्या डोक्यावरील ताण कमी करण्यास मदत होते. तसेच बाहेर फिरायला गेल्याने आपण ताजे तवाने होऊन पुन्हा जोमाने कामाला लागू शकतो. त्यामुळे लोक अनेकदा शनिवार-रविवारी फिरायला जाण्यासाठी बाहेर पडतात. असेच एक ठिकाण म्हणजे लोणावळा.

लोणावळा मुंबईपासून १२० किलोमीटर तर पुण्यापासून साठ किलोमीटर अंतरावर आहे. पार्टी करण्यापासून निसर्गाचा आनंद घेण्यापर्यंत सर्व गोष्टींसाठी हे ठिकाण परिपूर्ण आहे. लोणावळ्याला फिरायला जाण्यासाठी सकाळी लवकर निघा. इथे पोहोचून नाश्ता केल्यानंतर तुम्ही काही वेळ विश्रांती घेऊ शकता. यानंतर, साइटसीइंगला सुरुवात करा. इथे तुम्हाला भुशी धरण पाहायला मिळेल. ते पावसाळ्यात खूप सुंदर दिसते. याशिवाय, तुम्ही सनसेट पॉइंट/ टायगर पॉइंट, लायन पॉइंटवरून अद्भुत दृश्याचा आनंद घेऊ शकता.




भटकंती

लोणावळ्यात दुपारपर्यंत फिरल्यानंतर तुम्ही कोणत्याही प्रसिद्ध रेस्टॉरंट किंवा कॅफेमध्ये दुपारचे जेवण करू शकता. तुम्हाला हवे असल्यास कोणत्याही फार्महाऊस किंवा रिसॉर्टमध्ये बुफे लंचदेखील बुक करू शकता. किंवा तुम्ही स्ट्रीट फूडचा आनंद घेऊ शकता. दुपारी पुन्हा फिरायला जा. या वेळी तुम्ही लोणावळा तलाव, विसापूर किल्ला नक्की पाहा. लोणावळ्याला वॅक्स संग्रहालय आहे. ते मुलांना नक्कीच आवडेल. खरेदी करायची असेल तर तुम्ही स्थानिक चिक्की मार्केटमध्ये तेथील स्पेशल चिक्की व इतर खरेदी करू शकता.

**संध्याकाळी हिल व्ह्यू पॉइंटचा आनंद घ्या**

संध्याकाळी कोणत्याही हिल व्ह्यू पॉईटवर चहा आणि भज्यांचा आस्वाद घ्या. हवामान चांगले असेल तर तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या स्टॉलवर थांबून खाऊ-पिऊ शकता. गर्दी आणि रहदारी टाळण्यासाठी सकाळी लवकर निघणे महत्त्वाचे आहे.



# सेंसेक्समध्ये 452 अंकांची घसरण निफ्टीने 25,500 पातळी राखली

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी


सोमवारी शेअर बाजाराने सलग चार दिवस चाललेल्या वाढीचा कल खंडीत केला आणि घसरणीसह बंद झाला. दोन्ही बेंचमार्क निर्देशांक – सेंसेक्स आणि निफ्टी ५० – हे लाल चिन्हावर बंद झाले.

सोमवारी सेंसेक्सने ८४,०२७ या पातळीवर व्यवहारास सुरुवात केली आणि दिवसाअखेर ०.५४ टक्क्यांच्या घसरणीसह ८३,६०६ या पातळीवर बंद झाला. त्याचप्रमाणे, निफ्टी ५० ने २५,६६१ वर उघडून ०.४७ टक्के घसरणीसह २५,५१७ वर क्लोजिंग घेतले.

या घसरणीच्या दरम्यानही स्मॉलकॅप आणि मिडकॅप निर्देशांकात वाढ झाली. मिडकॅप निर्देशांक ०.६७ टक्क्यांनी आणि स्मॉलकॅप निर्देशांक ०.८१ टक्क्यांनी वधारले.

या कालावधीत, बीएसईवर लिस्ट असलेल्या सर्व कंपन्यांचे एकूण बाजारमूल्य मागील सत्रातील ४६० लाख कोटी रुपयांवरून वाढून ४६१ लाख कोटी रुपये झाले. त्यामुळे गुंतवणूकदारांना एका सत्रातच १ लाख कोटी रुपयांचा नफा झाला.

निफ्टी ५० मधील टॉप गेनर्सकडे पाहिल्यास ट्रेंटचा शेअर सर्वाधिक वर गेला, ज्यात ३.२९ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर एसबीआयमध्ये १.८६ टक्के, भारत इलेक्ट्रॉनिक्समध्ये



सेन्सेक्स 83,606

निफ्टी 25,517

१.६९ टक्के, इंडसइंड बँकेत १.६८ टक्के आणि जिओ फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये १.०३ टक्क्यांची वाढ झाली.

निफ्टी ५० मधील टॉप लूझर्समध्ये टाटा कंझ्युमरचा सर्वाधिक तोटा झाला, ज्यात २.२६ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर ॲक्सिस बँक २.१२ टक्के, कोटक बँक २.०२ टक्के, हिरो मोटोकॉर्प १.९३ टक्के आणि मारुती सुझुकी १.९२ टक्क्यांनी घसरले.

सोमवारी सर्व सेक्टोरल निर्देशांकांचे संमिश्र प्रदर्शन दिसून आले. काही निर्देशांक हरे चिन्हावर, तर काही लाल चिन्हावर बंद झाले. सर्वाधिक फायदा निफ्टी पीएसयू बँक निर्देशांकाला झाला, ज्यामध्ये २.६६ टक्क्यांची जोरदार वाढ झाली. त्यानंतर निफ्टी इंडिया डिफेन्समध्ये ०.९३ टक्के, निफ्टी कॅपिटल मार्केटमध्ये ०.८१ टक्के आणि निफ्टी फार्मामध्ये ०.५० टक्क्यांची वाढ झाली.

# भारताने 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान काही लढाऊ विमाने खरंच गमावली का?

## नौदल अधिकाऱ्याने केला मोठा खुलासा

नवी दिल्ली, दि. ३० वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या हल्ल्यानंतर संपूर्ण देशात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात अनेक महत्वाचे निर्णय घेत पाकिस्तानची कोंडी केली होती. तसेच भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिलं होतं. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांवर मोठी कारवाई करत ते उद्धवस्त केले होते.

भारताने पाकिस्तानच्या विरोधात राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने काही लढाऊ विमाने गमावल्याचा दावा केला जात होता. मात्र, हा दावा केंद्र सरकारने फेटाळून लावला होता. मात्र, ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने काही फायटर जेट्स गमावल्याचा आरोप करण्यात येत होता. असं असतानाच आता इंडोनेशियातील एका कार्यक्रमात बोलताना कॅप्टन शिव कुमार यांनी मोठा खुलासा केला आहे.

कॅप्टन शिव कुमार हे नौदलातील कर्नल रँकचे अधिकारी आहेत. ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानशी झालेल्या लष्करी संघर्षाच्या पहिल्या दिवशी भारताने काही लढाऊ विमाने गमावल्याचं कॅप्टन शिव कुमार यांनी मान्य केलं आहे. भारत सरकारने पाकिस्तानी लष्करी आस्थापनांवर हल्ला करण्यावर आधी निर्बंध लादले होते आणि फक्त दहशतवादी पायाभूत सुविधांवर हल्ला करण्याचे आदेश दिले होते, त्यामुळे भारताने काही लढाऊ विमाने गमावल्याचं शिव कुमार यांनी मान्य केलं आहे. कॅप्टन शिव कुमार म्हटलं की, "भारताने इतकी विमाने गमावली याबाबत मी सहमत नाही. पण मी हे मान्य करतो की आपण काही विमाने गमावली आहेत आणि ते केवळ राजकीय नेतृत्वाने लष्करी आस्थापनांवर आणि पाकिस्तानच्या हवाई संरक्षण यंत्रणेवर हल्ला न करण्याच्या निर्बंधामुळे घडलं आहे", असं कॅप्टन शिवकुमार यांनी सांगत मान्य केलं आहे. दरम्यान, एका भारतीय नौदलाच्या अधिकाऱ्याने हे मान्य केल्यानंतर आता नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून याच मुद्यावरून काँग्रेसने देखील सरकारला अनेक सवाल विचारले होते. मात्र, काँग्रेसच्या प्रश्नांनंतर केंद्र सरकारने कोणतंही प्रत्युत्तर दिलं नव्हंत. पण आता कॅप्टन शिव कुमार यांनी केलेल्या या दाव्यानंतर आता काँग्रेस पुन्हा एकदा आक्रमक झालं असून सरकारला पुन्हा सवाल विचारले आहेत.

# मायाश्री इंडस्ट्रीज गृपच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी

## देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेंची प्रधान सचिवांकडे मागणी

देसाईगंज, दि. ३० प्रतिनिधी

गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज येथील मायाश्री राईस इंडस्ट्रीज,मायाश्री फुड इंडस्ट्रीज तसेच मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीज या एकाच परिवारातील वेगवेगळ्या नावावर असलेल्या राईसमिल संचालकांनी पुरवठा विभागाचे अधिकारी,आदिवासी विकास महामंडळाचे अधिकारी तसेच स्थानिक गुणनियंत्रण अधिकारी यांना हाताशी धरून प्रचंड गैरव्यवहार करून शासनाची कोट्यावधी रुपयाने फसवणूक केली आहे.त्यामुळे मायाश्री इंडस्ट्रीज गृपच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी अन्न,नागरी व पुरवठा विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

दिलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी नमूद केले आहे की गडचिरोली येथील शासकीय गोदामात २४ फेब्रुवारी २०२२ मध्ये मायाश्री राईस इंडस्ट्रीज व मायाश्री फुड इंडस्ट्रीज यांचा मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ गडचिरोली येथील नागरीकांनी पकडला होता.त्या प्रकरणी तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी तत्कालीन पुरवठा निरीक्षक युवराज बोरकर यांना दोषी ठरवून त्यांचेकडून ६८ हजार ४६० रपये दंडाची रक्कम वसूल केली आहे.

हंगाम २०२२ मध्ये फुड कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या पथकाने मायाश्री राईस इंडस्ट्रीज, मायाश्री फुड इंडस्ट्रीज व मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीजच्या राईसमिल मधुन तपासणीकरीता तांदळाचे नमुने घेतले असता या तीन मिलचा एकूण ९१.३,मेट्रिक टन तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य आढळून आल्याने केंद्र शासनाच्या सुचनेनुसार अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे आदेश क्र. खरेदी-२६२२/प्र.क्र ९९/नापु २९ दि.२० जुलै २०२२ च्या पत्राद्वारे उपरोक्त सर्व राईसमिलवर जीवनावश्यक वस्तु कायदा १९८०/१९५५ कलम ३(i) व त्यामधील सुधारणा २०२० तसेच अन्य कायद्यान्वये असलेल्या तरतुदीनुसार कारवाई करून त्यांचेवर केंद्र शासनाच्या १६,जुलै २०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनुसार कारवाई करावी व कारवाई करून त्याबाबतचा सविस्तर कृती अहवाल स्वयंस्पष्ट अहवालासह शासनास ७ दिवसात सादर करण्याचे आदेश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे सहसचिव सुधीर तुंगार यांनी दिले होते. तसेच अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे कक्ष अधिकारी यांचे पत्र क्र. खरेदी-२६२२/प्र.क्र.९९/नापु २९ दि.१० ऑगस्ट २०२३ च्या पत्रानुसार सदर तीनही मिलवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.परंतु तत्कालीन जिल्हाधिकारी संजय मिना व तत्कालीन प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी दर्शन निकाळजे यांनी राईसमिलर्स सोबत संगनमत करून त्यांचेवर कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे आजमितीसही त्यांचेसोबत भरडाईचे करारनामे करून संगनमताने भरडाई मध्ये गैरव्यवहार सुरु आहे.

तत्कालीन लोकसभा सदस्य रामदास तडस यांनी दि.३० जुलै २०२२ रोजीच्या पत्राद्वारे आरमोरीच्या शासकीय गोदामातून वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा होत असल्याबाबत जिल्हाधिकारी वर्धा,जिल्हाधिकारी गडचिरोली तसेच अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे सहसचिव सुधीर तुंगार यांना दि.५ ऑगस्ट २०२२ रोजीच्या पत्रान्वये आरमोरीच्या शासकीय गोदामातून हिंगणघाट येथे निकृष्ठ दर्जाच्या तांदळाचा देसाईगंज येथील मायाश्री राईस इंडस्ट्रीज व मायाश्री फुड इंडस्ट्रीज यांनी शासकीय गोदाम आरमोरी येथे जमा केलेल्या तांदळाचा पुरवठा करण्यात येत असल्याने याबाबत सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते मात्र आजतागायतही कारवाई करण्यात आलेली नाही.तसेच मायाश्री राईस इंडस्ट्रीज व मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीज हे उसणा तांदूळ तयार करणारे राईसमिल असुन शासकीय धानापासुन उसणा तांदूळ तयार करून मार्केटमध्ये विकत आहेत. व त्या बदल्यात काळ्या बाजारातील मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून शासनाला जमा करीत आहेत.त्यामुळे त्यांनी शासनाकडून भरडाई करीता किती धान घेतले तसेच खुल्या बाजारातुन किती धान खरेदी केले याची पणन हंगाम २०२१-२२,२०२२-२३,२०२३-२४ व २०२४-२५ या हंगामाची चौकशी करून धान भरडाई करीता किती विज खर्च केले याबाबत चौकशी करण्यात यावी.

मायाश्री फुड इंडस्ट्रीज या राईसमिल तर्फे शासनाकडून भरडाई करीता मिळालेला धान परस्पर काळ्या बाजारात विकत आहेत.मायाश्री राईस इंडस्ट्रीज,मायाश्री फुड इंडस्ट्रीज व मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीज हे तीनही राईसमिल एकाच परिवारातील असुन पुरवठा विभागातील अधिकारी,आदिवासी विकास महामंडळाचे अधिकारी तसेच मार्केटिंग फेडरेशनच्या अधिकाऱ्यांसोबत संगनमत करून शासनाची दिशाभूल करून फसवणूक करीत आहेत.तसेच शासनाला वारंवार मानवी खाण्यास अयोग्य तांदुळ जमा करून शासनाची फसवणूक करीत असल्याने उपरोक्त तीनही मायाश्री इंडस्ट्रीज गृपच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी दिलेल्या तक्रारीतुन केली आहे. याबाबत प्रधान सचिव काय कारवाई करतात याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.

# प्रियकरासोबत मिळून पतीला मधुचंद्राच्या रात्रीचं संपवले

कुशीनगर, दि. ३० वृत्तसंस्था

उत्तर प्रदेशच्या कुशीनगर जिल्ह्यात हृदयद्रावक घटना घडली आहे. याठिकाणी सुकरौली येथील मझना नाल्यात ६ जून रोजी जबलपूरच्या युवकाची हत्या करून त्याचा मृतदेह फेकण्यात आला होता. या प्रकरणी रविवारी पोलिसांनी खुलासा केला. या हत्या प्रकरणी एका महिलेसह तिघांना पोलिसांनी अटक केली. यांना पुराव्यासह कोर्टात हजर करून पोलीस कोठडीत पाठवले आहे. बनावट लग्न करून युवकाची संपत्ती हडप करण्याचा हा प्लॅन असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याबाबत एसपी संतोष कुमार मिश्रा म्हणाले की, सुकरौली येथे सापडलेल्या मृतदेहाची ओळख आणि संपूर्ण घटनेचा तपास करण्यासाठी पोलिसांची ३ पथके बनवली होती. मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी विविध अँगलने चौकशी केली गेली. त्यानंतर हा मृतदेह मध्य प्रदेशातील जबलपूर येथील युवक इंद्रकुमार तिवारी याचा असल्याचे समोर आले. मृतदेहाची ओळख त्याच्या कुटुंबाने पटवली. हा युवक बेपत्ता झाल्याची तक्रारही स्थानिक पोलीस स्टेशनला देण्यात आली होती. या प्रकरणी पोलिसांनी एका महिलेसह तिघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून युवकाचे



आधार कार्ड, लग्नात वापरलेले दागिने, रोकड आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या.

पोलिसांच्या चौकशीत आरोपी महिला खुशी तिवारी हिने तिचे खरे नाव साहिबा बानो असल्याचं सांगितले. काही दिवसांआधीच सोशल मीडियावर तिची ओळख देवरिया जिल्ह्यात राहणाऱ्या कौशल गौंडसोबत झाली होती. सुरुवातीला या दोघांची ओळख झाली. त्यानंतर दोघांनी लग्न केले. गोरखपूर येथे भाड्याने खोली घेऊन ते राहत होते. त्यातच एकेदिवशी दोघांनी सोशल मीडियावर इंद्रकुमार तिवारी याचा व्हायरल व्हिडिओ पाहिला. या व्हिडिओत तो १८ एकर जमीन असूनही माझे लग्न होत नसल्याचे सांगितले. ही कहाणी ऐकून साहिबा आणि कौशलने एक प्लॅन बनवला. त्यानुसार इंद्रकुमारसोबत बनावट लग्न करून त्याची संपत्ती हडप करण्याचा डाव दोघांनी आखला.

# अशक्तपणा कारण,लक्षण आणि उपचार


**मानवी शरीर हे अत्यंत गुंतागुंतीचे आहे,त्यामुळेच अनेकदा कोणतेही बाह्य लक्षण नसताना किंवा आजार सदृश परिस्थिती नसताना देखील आपल्याला अचानक प्रचंड थकवा जाणवतो. शरीरात अशक्तपणाची जाणीव होते. अशक्तपणाची हि जाणीव विशेषत: स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणात असते. हा अशक्तपणा रक्तातील पांढऱ्या किंवा लाल पेशींच्या कमतरतेमुळे देखील असू शकतो. यालाच ऍनिमिया असे संबोधतात. शरीरातील हा अशक्तपणा नेमका कोणत्या करणामुळे येतो?या अशक्तपणाची लक्षण काय आहेत?आणि यावर उपचार काय करायचे? याच प्रश्नाची उकल करण्यासाठी डॉ.निनाद जोगळेकर यांच्याशी बातचीत.**

१] अशक्तपणा म्हणजे नेमके काय?

शरीरातील अशक्तपणा हा एक विकार आहे जो शरीरातील रक्तातील लाल पेशींचे प्रमाण अत्यंत कमी होते तेंव्हा जाणवतो. या लाल रक्तपेशींचे कार्य सुरळीत नसेल तेंव्हा अशक्तपणा जाणवतो. काही लोकांमध्ये हा अशक्तपणा अनुवांशिक पद्धतीने आलेला असतो. परंतु अनेकदा काही प्रकारच्या आजारामुळे अशक्तपणा येऊ शकतो. याचे वेगवगेळे प्रकार असले तरी काही प्रकारच्या अशक्तपणामध्ये कर्करोग सारख्या गंभीर आजराची चाहूल असते. त्यामुळे अशा शारीरिक अशक्तपणाचे वेळीच निदान करणे गरजेचे असते.

२]अशक्तपणाची लक्षण नेमकी काय असतात?

अशक्तपणामध्ये प्रचंड शारीरिक थकवा जाणवणे हे अत्यंत सामायिक लक्षण असते. त्याशिवाय छातीत दुखणे,चक्कर येणे,वारंवार कोणत्याही गोष्टीचा आजाराचा संसर्ग होणे,हृदयाचे ठोके



हॅलो डॉक्टर

वाढणे,डोकेदुखी,त्वचेचा रंग फिकट होणे,श्वास लागणे इत्यादी लक्षण असू शकतात.

३]अशक्तपणा या आजाराची कारण काय आहेत?

अशक्तपणा हा अनेक गोष्टीमुळे होऊ शकतो. आपल्या शरीरातील लोहाच्या कमतरतेमुळे जाणवणारा अशक्तपणा हा सामान्य प्रकारचा अशक्तपणा आहे. एखादा दीर्घकालीन आजार असेल तरी अशक्तपणा जाणवू शकतो. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती लाल पेशींवर हल्ला करते तेंव्हा अशक्तपणा जाणवतो. याला ऑटो इम्यूईंन ऍनिमिया म्हणतात. लाल पेशींची कमतरता,व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता,यकृताचे विकार,थायरॉईड,कर्करोग,दाहक आतड्यांचा आजार,मूत्रपिंडाचे आजर,अशा अनेक कारणामुळे अशक्तपणा हा विकार उद्भवू शकतो.

४]अशक्तपणा या विकारावर कोणते उपचार आहेत?

अनेकदा शारीरिक अशक्तपणा हा शरीरातील विशिष्ट घटकांच्या कमतरतेमुळे येऊ शकतो. शरीरात लोहाची कमतरता असेल तर पूरक कॅप्सुल किंवा गोळ्या देऊन हि कमतरता भरून काढता येते. आपल्या शरीरातील लाल रक्तपेशींची कमतरता भरून काढण्यासाठी व्हिटॅमिन बी ९ हे जीवनस्तव आवश्यक आहे. शिवाय व्हिटॅमिन बी १२ देखील तितकेच पूरक आहे. शारीरिक अशक्तपणासाठी एरिथ्रोप्रोएटिन ,इमिनोसप्रेसनंट्स,हि औषध डॉक्टर लिहून देतात. मात्र या सर्व औषधोपचारा बरोबरच आपला आहार जर पूरक आणि परिपूर्ण असेल म्हणजे त्यामध्ये कड धान्य,पालेभाजा,फळभाजा,दुग्धजन्य पदार्थ यांचा पूरक समावेश असेल तर आपल्याला अशक्तपणा हा विकार होणार नाही.

लोकारोग्य

# पुण्यात हवेचे प्रदूषण ८० टक्क्यांनी घटले

पुणे, दि. ३० प्रतिनिधी

शहरात मे आणि जून महिन्यात सरासरीपेक्षा ८० टक्के अधिक पाऊस झाल्याने हवेतील धूलिकणांचे प्रमाण ७० टक्क्यांनी घटले आहे. कोरोनाच्या लाटेत शहरातील वाहतूकच थांबल्याने २०२० मध्ये अशी स्थिती तयार झाली होती. त्यानंतर यंदाचा जून हा सर्वांत कमी धूलिकणांचा महिना ठरला आहे. प्रामुख्याने शिवाजीनगर, स्वारगेट, कोथरूड या अतिप्रदूषित भागांतील प्रदूषणही खूप कमी झाले आहे. शहरातील हवेचे प्रदूषण तब्बल ७० टक्क्यांनी घटले आहे. पृथ्वी मंत्रालयाच्या पुण्यातील 'सफर' या संस्थेने ही नोंद केली आहे. सध्या पुणे शहराची हवा देशात सर्वांत शुद्ध असून, शहराला छान (गुड) असा शेरा मिळाला आहे, तर दिल्ली, मुंबई, अहमदाबाद या सतत वाहन धूलिकणांत अतिप्रदूषित ठरणाऱ्या शहरांत पुणे शहराने बाजी मारली आहे. बाकी सर्व शहरांना समाधानकारक असा शेरा आहे. मात्र, पुण्याची हवा अतिशुद्ध गटांमध्ये गेली आहे. याचे मुख्य कारण शहरात मेमध्ये झालेला २७५ टक्के पाऊस, तर जूनमध्ये झालेला ८० टक्के जास्त पाऊस, हे आहे. कारण, यंदा १५ मेपर्यंत शहराचे हवाप्रदूषण धोक्याच्या पातळीवर होते.


# कुंभमेळ्यात गर्दी नियंत्रणासाठी पोलिसांना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मदत

नाशिक, दि. ३० प्रतिनिधी

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात गर्दी नियंत्रणाची जबाबदारी पोलिसांसमवेत नाशिकमधील पाच हजार महाविद्यालयीन विद्यार्थी सांभाळणार आहेत. संबंधितांना त्यासंदर्भात शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यासाठी नाशिक पोलिसांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चर्चा केली असून संबंधित विद्यार्थ्यांना श्रेणी किंवा विशेष गुण मिळतील याचे नियोजन करण्यात आले आहे.

प्रयागराज कुंभमेळ्यातील गर्दी, चेंगराचेंगरी या पार्श्वभूमीवर, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्यात नाशिक पोलिसांसमोर गर्दी नियंत्रणाचे आव्हान आहे. त्यामुळे संभाव्य दुर्घटना रोखण्यासाठी मुबलक कुशल मनुष्यबळ निर्मितीवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्यासाठी विविध स्तरावर काम केले जात असून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधून प्रशिक्षित स्वयंसेवक तयार करण्यात येणार आहे. पाच हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची तयारी नाशिक शहर पोलिसांनी सुरू केली आहे. कृत्रिम बुध्दिमत्ता, विद्यार्थ्यांचे कौशल्य, त्यांची आवड लक्षात घेत त्यांना स्वयंसेवा, गर्दी व्यवस्थापन, सुरक्षा, चेंगराचेंगरी, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चर्चा करुन कार्यक्रमास अंतिम रुप देण्यात आले आहे.

# ॲडोलेसंट इडिओपॅथिक स्कोलियोसिस आजाराने त्रस्त मुलीवर यशस्वी उपचार



जन आरोग्य

नोएडातील १५ वर्षीय आद्या ही तिची १०वीची बोर्ड परीक्षा संपली तेव्हा तिला ॲडोलेसंट इडिओपॅथिक स्कोलियोसिस असल्याचे निदान झाले, ज्यामध्ये पाठीचा कणा असामान्यपणे वळतो. हे निदान धक्कादायक होते, कारण उपचार न केल्यास या आजारामुळे दीर्घकालीन शारीरिक समस्या उद्भवू शकतात.आद्या हिने फरीदाबाद येथील रुग्णालयात पाठीच्या कण्यातील सुधारणा शस्त्रक्रिया केली. या प्रक्रियेत सुरक्षितता आणि अचूकता सुनिश्चित करण्यासाठी प्रगत साधने आणि तंत्रांचा समावेश होता. तिला पाच दिवसांतच डिस्चार्ज देण्यात आला आणि शस्त्रक्रियेनंतर फक्त तीन आठवड्यांनी ती शाळेत परतली. त्यानंतर तिने तिचे नियमित वर्ग पुन्हा सुरू केले आहेत.

"जेव्हा आद्या आमच्याकडे आली तेव्हा तिच्या पाठीच्या कण्यातील वक्रता जवळजवळ ५० अंशांपर्यंत पोहोचली होती, शस्त्रक्रियेच्या मर्यादेपलीकडे. ही विकृती केवळ सौंदर्यप्रसाधनात्मक नव्हती; उपचार न केल्यास ती फुफ्फुस आणि हृदयाच्या कार्यावर परिणाम करू शकते," असे अमृता हॉस्पिटल फरीदाबाद येथील स्पाइन सर्जरीचे प्रमुख डॉ. तरुण सुरी म्हणाले. "बोर्ड परीक्षा आणि सामाजिक दबावांना तोंड देणाऱ्या एका तरुण मुलीसाठी, आम्हाला माहित होते की भावनिक दावे वैद्यकीय परीक्षांइतकेच उच्च आहेत. आमच्या टीमचे ध्येय केवळ क्लिनिकल उत्कृष्टताच नाही तर संपूर्ण पुनर्प्राप्ती प्रदान करणे होते."स्कोलियोसिस १० पैकी १ मुलाला प्रभावित करते, तरीही ते अनेकदा दुर्लक्षित केले जाते. १० ते १५ वयोगटातील हे सर्वात सामान्य आहे.

# आरोग्यवर्धक खजूर

आरोग्यम् धनसंपदा

खजूर खाण्याच्या बाबतीत अनेक समज-गैरसमज आहेत. खरंतर आरोग्य चांगले राखणं हे सध्या आव्हान ठरतंय.त्यातही खजूर आपल्या शरीरासाठी उष्ण ठरतो असा अनेकांना समज आहे. पण खजूर हा केवळ तुमच्या हृदयासाठीच नाही तर मानसिक फिटनेससाठीही तितकाच महत्त्वाचा ठरतो. आयुर्वेदापासून खजूराचे महत्त्व सांगण्यात आले आहे. भिजलेले खजूर खाण्याचे आरोग्यदायी फायदे आहेत.

खजुरामध्ये गॅस्ट्रोइंटेस्टाईन संक्रमण संतुलित करणारे गुण असतात. तसंच यामध्ये फायबरचे प्रमाण अधिक असल्यामुळे बद्धकोष्ठता सुधारण्यासाठी खजुराचा फायदा करून घेता येतो. रोज ३५ ग्रॅम फायबर खाल्ल्याने संडासला स्वच्छ होते आणि पचनक्रियेमध्ये कोणतीही समस्या निर्माण होत नाही. तसंच पोटासंबंधित कॅन्सर रोखण्यासाठीही याचा उपयोग होतो.हृदय आपल्या शरीरातील महत्त्वाचे अंग आहे. याच्या आरोग्यावर जास्त लक्ष द्यावे लागते. हृदयाच्या आरोग्यात सुधारणा आणण्यासाठी तुम्ही दिवसभरात मुठ्ठीभर खजुराचे सेवन करू शकता. खजुरातील असणारे अँटीऑक्सिडंट गुण हे आर्टरी सेल्समधून कोलेस्ट्रॉल घालविण्यास मदत करतात.खजूर रक्तदाबाचा स्तर नियंत्रित करण्यासाठी फायदेशीर ठरतात. कारण यामध्ये पोटॅशियम आणि मिनरल्स अधिक प्रमाणात आढलतात. साधारणतः २४ ग्रॅम मेडजूल खजुरामध्ये १६७ मिलिग्रॅम पोटॅशियम असतात. अन्य फळांच्या तुलनेत हे अधिक असून शरीरातील पोटॅशियमचे प्रमाण यातून अधिक संतुलित राहाते त्यामुळे रक्तदाब वाढत नाही.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# पोलिसांनी गाडी अडवल्याने संतापले ताजमहालजवळ केला गोळीबार

आग्रा, दि. ३० वृत्तसंस्था

सोमवारी सकाळी ताजमहालच्या पश्चिम प्रवेशद्वाराजवळ थरारक घटना घडली. एका एर्टिगा कारमधून आलेल्या दोन तरुणांना पोलिसांना अडवल्याने, त्यांनी हवेत तीन राऊंड गोळीबार केला, ज्यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अमरूद टीला येथील पोलीस बॅरियरजवळ एक कार प्रतिबंधित क्षेत्रात घुसण्याचा प्रयत्न करत असताना हा प्रकार घडला.

सकाळी ९ वाजताच्या सुमारास, यूपी ८५ क्रमांकाची एक कार सुरक्षा कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालून पुढे जाण्याचा प्रयत्न करत होती. पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता, कारमधील तरुणांनी प्रथम कर्मचाऱ्यांशी वाद घातला. त्यानंतर त्यांनी गाडी वळवली आणि काही अंतरावर जाऊन हवेत तीन गोळ्या झाडल्या. गोळीबाराच्या आवाजाने घटनास्थळी उपस्थित पर्यटक आणि स्थानिकांमध्ये प्रचंड भीती निर्माण झाली. गोळीबारानंतर आरोपी तात्काळ घटनास्थळावरून पसार झाले.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांमध्ये एकच खळबळ उडाली. तात्काळ घटनास्थळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, संपूर्ण परिसराला वेढा घालण्यात आला आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला असून, कारच्या नंबरवरून आरोपींची ओळख पटवण्यात आली आहे. मथुरा पोलिसांशी संपर्क साधून आरोपींचा कसून शोध सुरू करण्यात आला आहे. या घटनेमुळे ताजमहालसारख्या जगप्रसिद्ध आणि संवेदनशील ठिकाणाच्या सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. डीसीपी सिटी सोनम कुमार यांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेतली असून, आरोपींना लवकरच अटक करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल असे म्हटले.

# आयुष शेट्टीने जिंकले पहिले BWF वर्ल्ड टूर विजेतेपद

आयोवा, दि. ३० वृत्तसंस्था

भारताचा युवा बॅडमिंटनपटू आयुष शेट्टीने यूएस ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कॅनडाच्या ब्रायन यांगचा थेट सेटमध्ये पराभव करून विजेतेपद पटकावले. ही त्याच्या कारकिर्दीतील आतापर्यंतची सर्वात मोठी कामगिरी आहे. या दमदार कामगिरीमुळे तो भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा पुरुष एकेरी खेळाडू बनला आहे.

अमेरिकेच्या आयोवा राज्यातील काउन्सिल ब्लफ्स कोर्टवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात, २० वर्षीय आयुष शेट्टीने आक्रमक खेळ दाखवत २१-१८, २१-१३ अशा फरकाने सामना आपल्या नावे केला. ब्रायन यांगने सामना टिकून राहण्याचा प्रयत्न केला; पण आयुषच्या आक्रमक खेळीसमोर त्याचा टिकाव लागला नाही.

मंगळूरच्या २० वर्षीय आयुषसाठी २०२५ हे वर्ष



कारकिर्दीला कलाटणी देणारे ठरले आहे. या हंगामाच्या सुरुवातीला शेट्टीने ऑर्लिन्स मास्टर्स सुपर ३०० स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली होती. या प्रवासात त्याने माजी विश्वविजेता लोह कीन येव आणि रासमस गेम्के यांचा पराभव केला. मे महिन्यात, त्याने वरिष्ठ सहकारी किदाम्बी श्रीकांतला हरवून तैपेई ओपनच्या उपांत्य फेरीत धडक मारली होती. आता BWF वर्ल्ड टूर विजेतेपदावर नाव कोरत त्याने इतिहास घडविला आहे.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**